Osmania University Library

Call No
Name Of Book
Name Of Authur

UNIVERSAL LIBRARY
OU_192281
UNIVERSAL LIBRARY

सागर साहित्य प्रकाशन : ९

# कि ना ऱ्या व र

(लघुनिबंध संग्रह)

प्रो. वि. द. साळगांवकर,
बडोदें

बा. द. सातोस्कर, बी. ए.
मुंबई १९३९.

: प्रकाशक :
बा. द. सातोस्कर, बी. ए.
'सागर साहित्य' कार्यालय,
किसन महाल, त्रिभुवन रोड, मुंबई ४.

Checked 1960

CHECKED 1956

ह्यापुढील आवृत्तीचे सर्व हक्क लेखकाकडे आहेत.

किंमत १ रु.

: मुद्रक :
ज. द. सातोस्कर
सागर साहित्य छापखाना,
किसन महाल, त्रिभुवन रोड, मुंबई ४.

मातृदेवतेच्या चरणीं

# चारच शब्द

प्रस्तुत लघुनिबंध संग्रहामध्यें कित्येक मराठी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले माझे लघुनिबंध एकत्रित केलेले आहेत. फक्त या संग्रहाकरितां त्यांच्यामध्यें थोडी छाटाछाट करून ते खरोखरच लघु केले आहेत.

या पुस्तकाच्या प्रकाशनाचें काम 'सागर साहित्या'चे चालक श्री. बा. द. सातोस्कर यांनीं अनेक अडचणी असतांनादेखील मोठ्या आपुलकीनें कबूल करून, छपाईचें काम थोड्या वेळांत सुबकपणें केलें याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्याचप्रमाणें श्री. आर. आर. प्रभु यांनीं आपण घेतलेलें सुंदर छायाचित्र मुखपृष्ठावरील चित्रासाठीं दिल्याबद्दल त्यांचाहि मी फार आभारी आहें.

नर्कचतुर्दशी, १८६१
दांडयाबाजार, बडोदें

**विश्वनाथ द. साळगांवकर.**

# जुनीं पुस्तकें.

मुंबईंतील कांहीं रस्त्यांतून फिरतांना त्या मायानगरींतील मोहिनी घालणाऱ्या असंख्य दुकानांकडे पहात मी जाऊं लागलों, कीं नकळतच माझे पाय पुष्कळदां जुन्यापुराण्या पुस्तकांच्या दुकानाकडे वळतात. आणि त्या कानाकोपऱ्यांत मधून मधून किंचित् नजरेआड दडून बसलेल्या दुकानांत डोकावून पाहिल्याशिवाय मला पुढें जाववत नाहीं. तेथील काळोखांत अर्धवट दिसणाऱ्या जुनाट, फाटक्या पुस्तकांकडे पाहाण्यांत काय मौज आहे, असें मला पुष्कळ लोक विचारतात. कित्येकांना तर एखाद्या जुन्यापुराण्या पुस्तकाच्या दुकानांत जाणें म्हणजे उकिरड्यावर जाण्याइतकें घाणेरडें वाटतें. आणि कोणी साधारण व्यवस्थित पोषाख केलेला माणूस, एखाद्या जुन्या पुस्तकांच्या दुकानांत पाहिला, कीं ही स्वारी बहुतकरून एखादें महाग पुस्तक अगदीं स्वस्ताईनें खरेदी करण्याकरितां किंवा घरच्या वाचनालयाचा कांहीं भाग अडचणीमुळें विकण्याकरितां आली असावी, असाहि तर्क अनेक प्रतिष्ठित शिष्ट लोक केल्याशिवाय रहात

नाहींत. मी एकदां असाच लॅमिंग्टन रोडवरील एका जुन्या पुस्तकांच्या दुकानांत गेलों व त्या ठिकाणीं कांहीं पंचचे जुने अंक खरेदी केले. ते मला फारच स्वस्त दरानें मिळाले आणि आपण आज चांगलाच सौदा केला अशा आनंदांत मी दुकानाबाहेर पडतों तोंच वरच्या जातीचे एक गृहस्थ भेटले. माझ्या हातांतील तें पुडकें पाहतांच जरा कुचेष्टेनें हांसत ते म्हणाले, "आतांच ही सचित्र रद्दी खरेदी केली वाटतें? फारच स्वस्त मिळतात इथें जुनीं पुस्तकें; येतां वाटतें मधूनमधून इथें?" मीहि यावर जरा हंसत हंसतच म्हटलें, "हो, मुंबईत आलों कीं पुष्कळदां येतों या बाजूला. मला या स्वस्त रद्दींत पुष्कळशीं रत्नें सांपडतात. शिवाय अगदीं थोडक्यांत करमणुकहि होते."

मी जुन्यापुराण्या पुस्तकांच्या दुकानांत जातों याचें कारण त्यांचा स्वस्तपणा हें तर खरेंच. परंतु त्याचबरोबर दुसरेंहि असें एक कारण आहे कीं, या जुन्या पुस्तकांच्या दुकानांत जो मोकळेपणा व आपलेपणा मला वाटतो तो नव्या व कोऱ्या पुस्तकांच्या दुकानांत वाटत नाहीं. त्या ठिकाणचा दुकानदार अगर अशिक्षित व घाणेरडा मियांभाई नव्या पुस्तकांच्या दुकानदाराइतका तज्ञ व गोड बोलणारा नसतो ही गोष्ट खरी आहे. परंतु खरोखर जुन्या पुस्तकांच्या दुकानांत जें एक प्रकारचें परिचित असें वातावरण दिसतें तें दुसरीकडे कधीं दिसून येत नाहीं. तुम्ही एखाद्या नव्या पुस्तकांच्या दुकानांत जा. तेथील कपाटांतून तुमच्याकडे कटाक्ष फेंकणारीं, मोहक बांधणीचीं व सुंदर सचित्र वेष्टणांनीं अवगुंठिलेलीं अशीं असंख्य नवीं पुस्तकें तुम्हांस दिसतील. जणूं काय, सरस्वतीच्या दरबारांतील भरजरी पोषाख केलेली उमराव मंडळीच ती! त्यांत तुमच्या आवडीचे व रोजच्या परिचयाचे अनेक कवी, कादंबरीकार, निबंधलेखक

आहेत; पण आपआपल्या स्वतंत्र कपाटांतून किती स्नेहशून्य दृष्टीनें तुमच्याकडे पहातात ते! त्यांच्याकडे पाहून जुन्या ओळखी काढण्याचा आपण प्रयत्न करूं लागलों कीं जणूं काय, अगदीं अपरिचित मंडळीमध्यें जाऊन पडल्यासारखें आपल्याला वाटूं लागतें.

पण तुम्हीं एकाद्या जुन्या पुस्तकांच्या दुकानांत जा. तिथें चकचकाट, स्वच्छता, फॅशन अगर नवी नवलाई यांचें नांव नाहीं. इतकेंच नव्हे, तर अनेक प्रतिभाशाली कलावंतांच्या जीवनांत दिसून येणारा व्यवस्थितपणाचा मूर्तिमंत अभावच तुम्हांस त्या ठिकाणी दिसून येईल. परंतु त्यामुळें बिचकून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. सध्यां साम्यवाद जिकडे तिकडे पसरूं पहात आहे. व खुद्द लेनिनला आपल्या साम्यवादाचीं सुखस्वप्नें पडावयाच्या आधीं प्रत्यक्ष सरस्वतीच्या साम्राज्यांत त्याचें आचरण केलेलें तुम्हांस पहावयाचें असेल तर तें याच दुकानांत तुम्हांस दिसून येईल. कारण येथें उच्च नीच, श्रीमंतगरीब, उमरावमजूर, इत्यादि भेदभाव तुम्हांस दिसणार नाहीं. तेथील सारें वातावरण खेळीमेळीचें, समानतेचें व मोकळेपणाचें आहे. तिथें पॅराडाइस लॉस्ट किंवा महाभारत या सारख्या महाकाव्याशेजारीं एकादें तिसऱ्या दर्जाचें कवितांचें चोपडें, हरिभाऊंच्या एकाद्या उत्तम कादंबरीबरोबर कसलातरी गचाळ लघुकथासंग्रह, शेक्सपीयरच्या खांद्यावर हात ठेवून उभा असलेला एकादा एकांकिकांचा ग्रंथ, इतिहासाशेजारीं लैंगिक विषयांवरील कांहीं पुस्तकें, आणि कायद्याबरोबर त्यांच्या लठ्ठपणाशीं स्पर्धा करणारे विज्ञानशास्त्रावरील मोठे ग्रंथ, याप्रमाणें सर्व प्रकारचें वाङ्मय एकत्र मोठ्या प्रेमानें गळ्यांत गळा घालून बसलेलें तुम्हांस दिसून येईल. येथें किती मोकळेपणा वाटतो! तुम्ही कोणत्याहि बाजूस पहा. तुम्हां-ला तुमच्या जिवाभावाचे व रोजच्या परिचयाचे चिरमित्र मोठ्या

स्नेहभावानें बोलवीत आहेत असेंच तुम्हांस वाटेल. तुम्हीं त्यांच्याशीं कितीदां तरी मोकळ्या मनानें गुजगोष्टी केल्या आहेत आणि त्यांच्या सहवासाचा अवर्णनीय आनंद अनेकदां अनुभविलेला आहे. त्यामुळें त्यास आतां या ठिकाणीं एकत्र पाहिल्यावर त्या आनंदाचा थोडासा तरी पुनर्लाभ तुम्हांस झाल्यावांचून राहणार नाहीं.

परंतु ज्या वाचकाची सौंदर्यदृष्टि फारच तीक्ष्ण व नाजूक आहे त्यांना या ठिकाणीं थोडासा धक्का बसेल हें मी कबूल करतों. कारण मला असें माहित आहे कीं हे लोक पुष्कळदां बाह्यसौंदर्यालाच जास्त महत्त्व देतात, आणि गडकऱ्यांच्या सुदामानें दामिनीस सांगितलेलें "तूं बरी असतेस तेव्हां बरी दिसतेस, पण तूं बरी दिसतेस तेव्हां बरी असतेस असें नाहीं" हें कटुसत्य त्यांना फारसें पटत नाहीं. यामुळेंच नवें दिसणारें, सुंदर व आकर्षक वेष्टनानें मोहविणारें व चांगल्या छपाईचें एकादें पुस्तक दिवसभर हातातून नाचवितांना त्यांना एक विशिष्ट आनंद वाटत असतो. आणि त्या पुस्तकाचें अंतरंग त्याच्या गोड व आकर्षक बहिरंगाशीं पूर्णपणें विसंगत असलें तरी त्याची त्यांना फारशी दिक्कत वाटत नाहीं. माझा एक अगदीं रसिक स्नेही वरील वृत्तीच्या लोकांप्रमाणें पुस्तकांच्या अंतरंगाच्या बाबतींत पुरा उदासीन नसला तरी सौंदर्यदृष्टींत त्यांच्या वृत्तीचा आहे. सुंदर छापलेलें, गोड दिसणारें व अगदीं नवीनच प्रसिद्ध झालेलें एकादें पुस्तक दुकानांत दिसलें कीं त्यास जो मोह होतो तो एकाद्या युवतीस देखील जवाहिऱ्याच्या दुकानांतील दागिने पाहून होत नसेल. पुष्कळदां खिसे अगदीं हलके असतांनाहि तो पटकन् त्या दुकानात शिरतो, पुढचा महिना अजून दूर आहे याचा फारसा विचार न करताच तो चट्‌कन् तें गोजिरवाणें पुस्तक खरेदी करतो आणि कोळशाच्या खाणींत अकस्मात् बहुमोल हिरा सांपडणाऱ्या

मालकासहि होत नसेल इतक्या आनंदानें तो तिथून निघून जातो. मग तें पुस्तक हातांत घेऊन अत्यंत काळजीपूर्वक चाळतांना व त्यांतील अपरिचित मजकुरावरून नजर फिरवितांना त्याला कोणी पाहिलें तर तो एकाद्या सुंदर व गोड बालकासच खेळवतो आहे असें त्यांना वाटल्यावांचून राहणार नाहीं.

पण मला मात्र एवढी सौंदर्यदृष्टी नसल्यामुळें म्हणा किंवा विशिष्ट मनोरचनेमुळें म्हणा, कोणतेंहि नवें पुस्तक वाचतांना पहिल्याप्रथम अगदीं चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. आणि त्यांतल्यात्यात ग्रंथकार जर ओळखीचा नसेल तर मग अगदींच अज्ञात प्रदेशांतून मार्ग क्रमणाऱ्या प्रवाशासारखी माझी स्थिति होते. कारण कोणत्याहि पुस्तकाचें वाचन म्हणजे एक प्रकारें त्याच्या ग्रंथकाराशीं पूर्ण परिचय करून घेणें आणि तो आपणांस आवडला तर त्याच्याशीं तादात्म्य पावणें. आणि यामुळें तो जर अगदीं नवखा असेल किंवा कोणी परिचित लेखक नव्या अवतारांत आपल्यासमोर आला असेल तर त्याच्याशीं हितगुज करण्यापूर्वी आपली विशिष्ट मनोवृत्ति आपणास बनवावी लागते. शेक्सपीयर, शॉ, कालिदास, गडकरी, कोल्हटकर, इत्यादि भिन्नभिन्न प्रकारच्या लेखकांचें कोणतेंहि पुस्तक हातांत घेण्यापूर्वी आपण आपल्या मनासभोंवतीं त्या ग्रंथकाराच्या वाचनास पोषक असें विशिष्ट वातावरण निर्माण करतों आणि त्याच भूमिकेवरून त्या त्या लेखकाशीं गुजगोष्टी करूं लागतों. मला वाटतें कीं याचमुळें कित्येक लोक आपलें वाचन कांहीं ग्रंथकारांपुरतेंच मर्यादित करतात. अनेक साहित्यिकांशीं मैत्री संपादन करण्याचा प्रयोग करण्यापेक्षां जुन्या खात्रीच्या ग्रंथकारांबरोबर आपली जुनी मैत्री सुदृढ करण्याचेंच ध्येय ते आपल्या वाचनांत आपल्यापुढें ठेवतात. माझ्या वाचनाच्या बाबतींत मी या लोकांच्या वृत्तीचा

नसलें तरी एकदां, दोनदां किंवा अनेकदां वाचलेल्या माझ्या जुन्या पुस्तकांबद्दल मला जो आपलेपणा वाटतो आणि त्यांच्या वाचनांत जो विशिष्ट आनंद मिळतो तो नव्या पुस्तकांत सहसा मिळूं शकत नाहीं. मी एकदां शेक्सपीयरची एक सुंदर सचित्र प्रत खरेदी केली. परंतु मला कोणत्याहि कारणानें शेक्सपीयर वाचावासा वाटला किंवा त्यांतील एकादा संदर्भ शोधावा लागला कीं माझा हात आपोआपच माझ्या जुन्या, फाटक्या, चिरपरिचित ग्रंथाकडे जाई आणि त्या नव्या प्रतीचा माझ्या पुस्तकांस शोभा आणण्यापलीकडे किंवा त्यांतील सुंदर चित्रें पहाण्यापलीकडे फारसा उपयोग होत नसे.

जुन्या पुस्तकांत मला जें वैशिष्ट्य वाटतें तें हें कीं त्यांच्यासभोंवतीं काळाचें व अनेक प्रसंगांचें एक प्रकारचें अद्‍भुतरम्य वातावरण असतें. आणि तें पुस्तक आपण परत वाचूं लागलें कीं, त्यांतील सौंदर्याबरोबर त्या कल्पनारम्य स्मृतीला जागविणाऱ्या अशा वातावरणाचा आपण अनुभव घेत असतों. जुनीं व पुन्हांपुन्हां वाचलेलीं व चाळलेलीं पुस्तकें मला आवडतात. तीं फार जीर्ण झालेलीं असतात, सुबकपणाचा सराव झालेल्या आपल्या डोळ्यांना तीं किंचित् ओंगळ वाटतात व त्यांच्यावरचा कचरा झाडून तीं चाळूं लागलें कीं कालांतरानें त्यांच्यावर आलेला काळेपणा पाहून थोडा खेदहि होतो. पण तोहि किती, अगदीं क्षणभर. कारण आपल्या आवडीचे प्रसंग, अनेकदां गुणगुणलेल्या ओळी, आपणास सतत सहवासामुळें चिरमित्र वाटणारीं पात्रें, आपल्या मनाची एकदम पकड घेणारे प्रगल्भ विचार व सुंदर कल्पना यांवरून आपण आपले नेत्र फिरवूं लागलों कीं त्यापूर्वी त्याच स्थळीं लाभलेल्या आनंदाच्या अर्धस्फुट स्मृतीनें हा ताजा आनंद अनेकपट वृद्धिंगत झाल्यावांचून रहात नाहीं.

मी एकदां घरीं जुनीं पुस्तकें चाळीत असतांना रागिणी कादंबरी

माझ्या हातास मिळाली. मी बसल्याबसल्या तिच्या पानांवरून नजर फिरवूं लागलें, आणि पाहतां पाहतां जणूं काय उत्तरा, रागिणी, भय्यासाहेब, जनुभाऊ, वगैरे सारी अगदीं ओळखीची मंडळी त्यावेळीं कित्येक वर्षांनीं माझ्यासमोर उभी राहिली. मी तें पुस्तक पूर्वीं वाचलें त्यावेळीं त्यांत अनेक खुणा केलेल्या होत्या. आपल्या नेहमींच्या फिरावयाच्या जागीं असलेल्या विश्रांतिस्थळासारखींच स्थानें तीं. आपण फिरावयास गेलों कीं नेहमींच्या जागीं बसतों, आजुबाजूची वनश्री किंवा देखावा पाहतों व तोच तो अवीट आनंद अनुभवतों, त्याच-प्रमाणें मी त्या खुणांवरून भराभर दृष्टि फिरवितांना मला रागिणीच्या वाचनाचा आनंद परत मिळाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

हा अनुभव जरी आपल्याला स्वतःच्या जुन्या पुस्तकांच्या बाबतींत मिळतो तरी एखाद्या सेकण्डहँड पुस्तकांच्या दुकानांत घेत-लेल्या पुस्तकांच्या वाचनांत तो मिळणार नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु या जुन्या विकत घेतलेल्या पुस्तकांची किमया वेगळीच आहे. अशीं स्वस्त दरानें विकत घेतलेलीं पुस्तकें म्हणजे उच्छिष्ट आहेत किंवा त्यांत कांहीं वाचनीय नाहीं असें कोणीच समजण्याचें कारण नाहीं. आपल्या जुन्या पुस्तकांप्रमाणें त्यांच्याहि सभोंवतीं एकप्रकारच अद्भुत-रम्य वातावरण असतें. मी एकदां एका जुन्यापुराण्या पुस्तकांच्या दुकानांत गेलों असतां त्या सुवर्णागारांतून कोल्हटकरांचें साहित्य-बत्तिशी हें पुस्तक खरेदी केलें. कोणा अरसिकानें क्षणिक लाभाच्या मोहानें तें सोनें ताम्राकरितां त्या दुकानदारास विकलें होतें कुणास ठाऊक! मीं त्याचें पहिलें पान उघडलें तों "ग. श्री. देसाई" अशीं त्याच्या मालकाच्या नांवाचीं मराठी अक्षरें ठळकपणें माझ्या दृष्टीस पडलीं. जणूं काय, त्या सुंदर पुस्तकाचा मालक केंविलवाण्या पण नापसंतीच्या मुद्रेनें माझ्याकडे पहात आहे असा भास मला

झाला. मला त्याच्यावरचें तें नांव असलेलें पान अजिबात फाडून टाकण्याचा मोह झाला. पण तो किंचित् आवरून मी "ग. श्री. देसाई" याच्याखालीं "यांच्याकडून भेट" असे शब्द लिहिले व वर माझें नांव घातलें. त्या गृहस्थानें मोठ्या आपुलकीनें तें अत्यंत काळजीपूर्वक वापरलेलें होतें. ते घेऊन मी वाचूं लागलों तों मला हांसूं आवरेना. निर्मल आनंदाचा केवढा हा ठेवा! त्यांत शल्य नाहीं, व्यक्तिद्वेष नाहीं, कुटाळकी नाहीं. शुद्ध मौजेची व हास्याची ती केवळ गंगा! वाचतां वाचतां याच पुस्तकानें माझ्या हातात येण्यापूर्वी किती अनेक लोकांस असाच आनंद दिला असेल अशी कल्पना पटकन् माझ्या मनांत येऊन गेली. खरोखर त्यानें अनेक लोकांचीं उद्विग्न मनें प्रफुल्लित केलीं असतील, अनेकांचा आनंद द्विगुणित केला असेल व कित्येकांना तर हास्याची दीक्षाच दिली असेल. या कल्पनेबरोबर असाहि एक विचार माझ्या मनांत डोकावून गेला कीं कोणतेंहि पुस्तक वाचीत असताना त्यानें वाचकाच्या मनात जागृत केलेल्या विकारांचें चित्र जर एखाद्या किमयेनें त्या पुस्तकावर उमटेल तर किती तरी चांगलें होईल. कारण त्यामुळें एखाद्या पुस्तकाच्या बरेवाईटपणाची किंवा त्याच्या कामगिरीची साक्ष त्यावरच पहावयास सांपडेल. मग लेखकाना आपल्या कार्याच्या मोठेपणाचे वादविवाद करण्याचें कारण पडणार नाहीं व अनेकांनीं अनेकवार वाचलेल्या पुस्तकांतच खरा आनंद वाचकाना प्राप्त होईल.

म्हणूनच मला असें वाटतें कीं जुन्या पुस्तकांच्या बाबतींत जुनें तें सोने ही केवळ पुराणवस्तुसंचयी वृत्ति ठेवणें किंवा अल्लाउद्दिनच्या गोष्टींतील दिवेवाल्याप्रमाणें नवें देऊन जुनें घेण्याचा आग्रह धरणें अगदीं चुकीचें होईल. माझ्या माहितीच्या एका गृहस्थाजवळ त्याच्या वाडवडिलांचा मोठा पुस्तकसंग्रह आहे. तो

त्यानें आपल्या वडिलांच्या वतनाप्रमाणें जतन करून ठेवला आहे. वर्षां तून तीन वेळ तो सर्व संग्रह बाहेर काढून उन्हांत पूर्णपणें तापवतो व मग पूर्ववत् कडीकुलुपात व्यवस्थितपणें ठेवून देतो. या गृहस्थाच्या बहुमोल संग्रहाबद्दल कोणीहि त्याचा हेवा करणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

पुस्तकें हीं आपले मित्र आहेत, आणि जितका आपला त्यांच्याशीं सहवास अगर विचारविनिमय वाढेल तितकी ती मैत्री वृद्धिंगतच होत राहणार. जुन्या पुस्तकांबद्दल जो आपलेपणा वाटतो तो याचकरितां कीं तीं आपल्या जुन्या मित्रासारखीं असतात. आपल्या जीवनांत व्यवसायामुळें, परिस्थितीमुळें अगर स्थळकाळा प्रमाणें आपण अनेक नवे मित्र जोडतों. पण जुन्यांचा तिरस्कार करीत नाहीं किंवा त्यास परकेहि लेखीत नाहीं. माझ्या जुन्या पुस्तकांवर माझ्या भूतजीवनाचा छाप असतो, त्यांतील खुणांमध्यें माझ्या जुन्या मनाचें चित्र मला स्पष्टपणें दिसतें आणि त्याच्या वाचनांत मला अनेकपट आनंद होतो. आणि जुन्यापुराण्यावाल्याकडे घेतलेल्या पुस्तकांत जें जादूमय वातावरण असतें तें आपोआपच माझें मन खेंचून घेतें. मग मला जुनीं पुस्तकें आपलींशीं कां नाहीं वाटणार!

प्रतिभा

१-८-१९३६

# आयुष्याचा सायंकाळ

कांहीं दिवसांपूर्वी सहज शाकुंतल घेऊन मी तें उघडलें तोंच त्यांतील ह्मातार्‍या कुंचुकीच्या 'आचार इत्यवहितेन मया गृहीता' या श्लोकावर माझी दृष्टी गेली. शाकुंतलांतील अत्यंत सुंदर श्लोकांपैकीं हा श्लोक नव्हे, परंतु दोनचारदां तो श्लोक मी वाचतांच पुढें वाचण्याऐवजीं पुस्तक माझ्या मांडीवरच राहिलें आणि माझ्या मनांत विचारचक्र सुरू झालें. उत्कृष्ट वाङ्मय हें नेहमीं संगीतासारखें असतें. वीणेच्या एका नाजूक झंकाराबरोबर ज्याप्रमाणें मनाची वीणाही आंदोलित होऊन मधुर गीतें गुणगुणूं लागते, त्याचप्रमाणें सुंदर कल्पना आणि प्रगल्भ विचार यांच्या माधुर्यानेंही अनेक कल्पनांचें संगीत आपोआपच आपल्या अंतःकरणांत सुरू होतें. याचमुळें शाकुंतलांतील केवळ औपचारीकरीत्या हातांत घेतलेल्या काठीवर आपल्या शरीराचा

म्हातारपणामुळें भार टाकण्याचे प्रसंग आल्याबद्दल काळाला दोष देणाऱ्या कंचुकीची कहाणी वाचून लहानपणीं पाहिलेल्या एका वृद्ध गृहस्थाची मला एकदम आठवण झाली.

हा वृद्ध गृहस्थ म्हणजे आनन्दाची व हास्यविनोदाची चालती बोलती मूर्तीच होती. दुर्दैवानें आजपर्यंत त्याच्यावर अनेक लहान मोठे आघात केले होते तरी दुःखाची अगर काळजीची किंचित् छटा देखील त्याच्या तोंडावर दिसत नसे. कोंकणच्या खडकाळ परंतु प्रासादिक भूमींतून हास्यविनोदाचा झरा अखंड झुळझुळ वाहत असतो. आणि या वृद्ध गृहस्थानें या निर्झराचें निर्मल व अमृततुल्य पाणी यथेच्छ प्राशन केलें असल्यामुळें त्याचा सहवास म्हणजे त्यावेळीं शाळेंत जाणाऱ्या आम्हां मुलांना हास्यरसाची मेजवानीच वाटत असे. दररोज शाळेंतून घरीं जातांना सर्व मुलांची ‘ काय शिवरामभाऊ ’ अशी एकच प्रेमळ आरोळी ऐकून आपल्या चंद्रमौळी घरांत खाटल्यावर पडलेले शिवरामभाऊ बाहेर येत व आम्हां बाळगोपाळांना पाहून त्यांच्या त्या शुभ्र दाढीनें व सुरकुत्यांच्या नद्यांनीं व्यापलेल्या प्रसन्न मुखावर एकदम हास्य उत्पन्न होई. त्यामुळें आमचा शाळेंतील सर्व शीण लयाला तर जाईच, परंतु घरीं जाण्याची आमची उत्सुकताही बरीच कमी होई. याप्रमाणें शिवरामभाऊंचें दर्शन-त्याहीपेक्षां त्यांच्या गप्पागोष्टी किती तरी दिवस आम्हांस सहजनिर्मित आनंदाचा लाभ करून देत असत. यामुळें बऱ्याच दिवसांच्या आजारीपणानंतर त्यांचें निधन झालें तेव्हां आम्हां मुलांना अत्यंत दुःख झालें व आपला प्रिय मित्र गेल्यासारखें वाटलें यांत नवल नाहीं.

त्यानंतर बऱ्याच दिवसांनीं त्या गृहस्थाचें मागील जीवन अत्यंत व्यसनी होतें आणि त्यानें आपली सर्व संपत्ती व्यसनांच्या पायीं नाहींशी केली होती असें मी ऐकलें. परंतु ज्याच्या हृदयांतील

हास्यविनोदाचा झरा जीवंत होता असा हा आनंदी प्रेमळ व निष्कपट वृत्तीचा गृहस्थ व्यसनी होता हें मला खरें देखील वाटलें नाहीं. आणि त्याची स्मृती देखील इतकी सुखकारक होती कीं त्याच्या पूर्व जीवनाचा विचारच मी माझ्या हृदयांतून कांट्याप्रमाणें उपटून काढला व त्याच्या अमोप उपकाराचें ऋण अंशतः तरी फेडल्यासारखें केलें.

मनुष्याच्या वर्तनाचा व मनोवृत्तींचा मानवी मुखचर्येवर परिणाम घडतो असें म्हणतात. परंतु व्यसनाच्या दुर्गंधयुक्त व प्रकाशशून्य वातावरणांत वाढलेल्या या वृद्धासारख्या गृहस्थाच्या मुखावर सूर्यप्रकाशासारखी आनंददायक व सहजिक प्रसन्नता व हास्य कसें उत्पन्न होईल हें कोडें मला अजून उलगडलेलें नाहीं. कोणत्याही आनंदी मनुष्याच्या सहवासांत असलें म्हणजे एकाद्या रम्य उपवनांत गेल्यासारखें वाटतें. त्या ठिकाणीं कुत्सितपणा, मत्सर अगर दुष्टपणा या सर्वांना थाराच नसतो. आणि विशेषतः तो आनंदी मित्र वृद्ध असला तर मग त्या आनंदाला पूरच येतो. कारण वृद्धांचें मनमोकळेपणानें हांसणें हें बालहास्याइतकेंच अद्भुतरम्य असतें. जगाच्या सुखदुःखाचा अनुभव नसलेल्या निष्पाप बालकांचें हास्य अव्याजमनोहर असलें तर नवलनाहीं. परंतु ज्यांना संसाराची आंच पुरीपुरी लागलेली आहे व जगांतील पापाची जाणीव अत्यंत तीव्रतेनें होत आहे अशा वृद्धांच्या मुखावरील सहजप्रसन्नता व हास्य हीं खरोखर सोन्याच्या मोलाचीं असतात. म्हणूनच शेक्सपीयरच्या 'चवथा हेन्री' या नाटकांतील फॉलस्टाफ या साठी उलटलेल्या तुंदिलतनु म्हाताऱ्याचे तरूण मित्र त्याच्या सहवासाचा एक क्षणसुद्धां वायां जाऊं देत नाहींत. व तो आपल्या विशाल उदरांत जेव्हढी दारू अगदीं लीलेनें ओततो त्याहीपेक्षां जास्त प्रमाणांत ते

तरुण त्याच्या हास्यविनोद वारुणींचें आकण्ठ प्राशन करीत असतात.

यावर कोणी असें म्हणतील कीं खरें पाहिलें तर वृद्ध मनुष्या-कडून आनंदीवृत्तीची अपेक्षाच करणें चुकीचें आहे. संसाराची झळ लागलेल्या व संकटांशीं झुंज खेळण्यांत सारें आयुष्य घालविलेल्या माणसाच्या ठिकाणीं प्रसन्नता व उल्हासवृत्ती असणें अशक्यप्राय असतें. क्वचित् एकादा संसारी वीर पुरुष संकटांना न जुमानतां धैर्यानें व चिकाटीनें वैभवशिखरास पोहोंचला तर त्याला या रण-संग्रामांतच आपल्या पुनर्गमनाचीं चिन्हें दिसूं लागतात. खरें पाहिलें तर वर उल्लेख केलेल्या लोकांच्या या विधानांत पुष्कळच सत्य आहे. आणि त्यामुळेंच माधव ज्युलियन्‌च्या वृद्धकवीप्रमाणें यापुढें आपल्याला उगवत्या उषेचें मधुर गीतांनीं स्वागत करण्याचें भाग्य लाभणार नाहीं म्हणून विषण्ण झालेले वृद्ध लोक नेहमींच दिसून येतात. अनुभवाच्या आणि संसाराच्या अग्नींतून तावून सुलाखून बाहेर पडल्यामुळें आणि आपल्या तेजस्वितेची व अनुभवशुद्ध ज्ञानाची जाणीव असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं मार्दवाच्या ऐवजीं एक प्रकारचा कठोरपणा उत्पन्न होत असतो. त्यामुळें त्यांना सभोंव-तालच्या तरुणांचें तर्कट कटु वाटत असतें. आणि त्यांची शाळा-मास्तरची वृत्तीही वेळीं अवेळीं प्रकट होत असते.

परंतु कित्येक गृहस्थ साऱ्या जन्मभर अशा तरुण व उत्साही वृत्तीचे असतात कीं त्यांच्या ठिकाणीं वार्धक्य संभवतच नाहीं. शेले, कीट्स, बालकवी, गडकरी, यांच्यासारखे प्रतिभाशाली लेखक वृद्ध झाल्यावर कसे दिसले असते ही कल्पनाच दुःसह होते. आपलें सर्व जीवन त्यांनीं तारुण्याचीं गाणीं गुणगुणण्यांत घालविलें व त्यांच्या तत्वज्ञानावरही तारुण्याची तेजस्विता दिसून येते. त्यामुळें ते कविवर म्हातारपणीं कसे दिसले असते व त्यांची मनोवृत्ती कशी झाली

असती याची कल्पनासुद्धां करण्यास कोणास धैर्य होत नाहीं. महाभारतांत श्रीकृष्णाचें चरित्र कितीही विस्तारानें दिलें असलें तरी बाळकृष्णाच्या लीलांनीं वेडावून गेलेला भक्तवृंद श्रीकृष्ण मागाहून संसारी झाला, मोठा मुत्सद्दी झाला व शेवटीं आपल्या प्रिय माणसांचा व आप्तांचा नाश पहाण्याचा दुर्धर प्रसंग त्याच्यावर आला वगैरे गोष्टींची चौकशी देखील करण्याच्या फंदांत पडत नाहीं. अशा या तरुणवृत्तीचीं माणसें वाढत्या वयानें त्यांचें शरीर जर्जर केलें तरी आपल्या आनंदी मनावर कृतांतकटकामलध्वजाची छाया पडूं देत नाहींत. त्यांचें अंतःकरण सदोदित फुललेल्या बगीच्यासारखें असतें. क्वचित् संसारतापानें त्या बागेचा तजेला किंचित् कमी झाला तरी त्याचें मार्दव, प्रसन्नता व दुसऱ्यास शुद्ध आनंदाचा लाभ करून देण्याची वृत्ती हीं सदोदित जीवंत असतात.

परंतु ही ईश्वरी देणगी व वृत्ती सर्वत्र सारखीच असते असें नाहीं. श्रीमतीची जाणीव ही प्रत्यक्ष श्रीमंतीपेक्षां परक्यास अधिक त्रासदायक असते. आणि यामुळेंच वयाबरोबर ज्ञानानें व अनुभवानें वृद्ध झालेल्यांना सर्वसाधारणपणें तरुणांबद्दल एक प्रकारचा अनादर वाटत असलेला दिसून येतो. क्वचित्च फुलपांखरीवृत्तीचा एकादा फॉलस्टाफ हेन्रीसारख्या वीस वर्षांच्या उनाड पोराबरोबर वात्रटपणा करीत भटकतांना दिसतो. अगर त्याहीपेक्षां क्वचित् साधाभोळा झाला तरी धुंडिराजसारखा प्रेमळ व वयोवृद्ध गृहस्थ घनःशामासारख्या तरुणाबरोबर बरोबरीच्या नात्यानें गप्पा मारतांना दिसतो. रस्त्यावर सकाळसंध्याकाळ कितीशा वृद्धतरुणांच्या जोड्या फिरतांना दिसून येतात ? जे कोणी वृद्ध लोक फिरावयास येतात त्यांना एकाद्या पिसाळलेल्या कुत्र्यापासून दूर रहावें त्याप्रमाणें तरुणांच्या टोळ्यांपासून दूर रहाणें बरें वाटतें हें अगदीं साहजिक आहे. बहुधा एकादा

वृद्ध गृहस्थ एकाद्या अगदीं तरुण वयाच्या माणसाशीं बोलूं लागला कीं तो तरुण अननुभवामुळें अगदीं अजाण आहे असें गृहीत धरू-नच चालतो. व त्यामुळेंच " तुम्हाला अजून जगाचा अनुभव नाहीं, तुम्ही तरुण लोक असेच; बाबारे, लग्न होऊन संसाराला लागलास म्हणजे, " अशीं पालुपदें उधळीतच त्यांचा वाक्प्रवाह चाललेला असतो. खरें पाहिलें तर त्यांत वावगें असेंही कांहीं नाहीं. ज्यांच्या मांडीवर नातवंडें खेळत आहेत व शेंकडों वर्षें ऊनपावसाचे व झंझावाताचे आघात सोसणाऱ्या व आपल्या अफाट शाखाविस्ता-रांत शेंकडों पांखरांना निवारा देणाऱ्या प्रचंड शाल्मली तरुप्रमाणें ज्यांच्यावर एक प्रकारचें आदरणीय गांभीर्य आलें आहे अशा वृद्धां-कडून आधुनिक तरुणांना आपला उपमर्द झाल्यासारखें वाटेल असें बोलणें आलें तर त्यांत आश्चर्य व वाईट वाटावयास नको. परंतु सुदैवानें असा प्रसंग क्वचित् येतो. अनुभवामुळें व शहाणपणामुळें वृद्ध लोक नेहमींच व विशेषतः अलीकडे तरुणांची संगती शक्यतों टाळतात व ' मूले कुठारः ' या न्यायानें एकाद्या कटु अनुभवाची शक्यताच नाहींशी करतात.

अलीकडे उपदेशवृत्तीच्या आधुनिक शुकनासांची दिवसें दिवस चंद्रापीडासारखे मुकाट्यानें उपदेश ऐकून घेणारे तरूण दुर्मिळ होत आहेत अशी तक्रार ऐकूं येते व एका अर्थी ती अस्थानीं आहे असें म्हणतां येणार नाहीं. भीष्मद्रोणासारख्या वडिलांचा उघड अपमान करणारे दुर्योधन दुःशासनासारखे यौवनोन्मत्त व अधिकारमदानें धुंद झालेले तरूण जरी अलीकडे विरळ असले तरी वृद्धांबद्दल सर्वसाधा-रणपणें एक प्रकारचा अनादर सर्वत्र दिसतो यांत शंकाच नाहीं. परंतु याचें कारण शोधूं गेलें तर तें आधुनिक तरुणांच्या उच्छृंखल वृत्तीपेक्षां मानवी समाजाइतकाच पुराण असा जो वृद्धतरुणांमधील

विरोध व वैषम्य त्यांत आहे असें जरा खोल पाहिल्यास दिसून येतें.

जगाच्या इतिहासांत या द्वंद्वाचा झगडा सतत चाललेला दिसून येतो. वृद्धाला आपल्या अनुभवाची, ज्ञानशुद्ध शहाणपणाची व स्वकर्तृत्वाची जितकी जाणिव असते त्याहीपेक्षां तरुणाला आपल्या पराक्रमाची, धैर्याचा व तेजस्वितेची जास्त तीव्र जाणीव असते. तरूण व प्रजाहिततत्पर असा राजा आणि ज्ञानवृद्ध व स्वदेशसेवेंत ज्याचे केंस पांढरे झाले असा प्रधान अशी जोडी क्वचित्च एकाद्या राष्ट्राच्या भाग्यानें त्याला लाभते. व सुदैवानें अशी जोडी असली तरी ती फार दिवस टिकूं शकत नाहीं. कित्येकांच्या मतें दिवसें दिवस वाढत जाणाऱ्या व्यक्तिमत्वाच्या लाटेमुळें वृद्धतरुणांमधील विरोध दुरावत असून त्यांनीं एकमतानें कार्य करणें अशक्यप्राय होत चाललें आहे. परन्तु आजच्या तरुणांचीं अंतःकरणें ज्यांनीं पारखलीं आहेत त्यांना मात्र परिस्थितीचें हें निदान पटणार नाहीं. कारण त्यांना असें दिसून येईल कीं आजचा तरुण स्वातंत्र्यप्रिय असला तरी तो समाजाचें अनहित करून आपलें व्यक्तिमत्व जगास दाखविणार नाहीं. त्याच्या आंगीं एक प्रकारचा स्पष्टवक्तेपणा अगर खुळा उघडेपणा (bluntness) असला तरी वृद्धांबद्दल अनादर खास नाहीं व त्याच्याकडे नटवेपणा असला तरी त्याच्यांत कर्तृत्वशोत्कोहा भरपूर आहे. आणि या दृष्टीनें जर कोणी आधुनिक तरुणांकडे पाहिलें तर त्यांना दोष देण्याचें फारसें कारण त्याला दिसून येणार नाहीं.

परंतु याविरुद्ध जे तरुण तरुणपणींच वृद्धांपेक्षांही पोक्तपणाचा जास्त आव आणतात त्यांचा कोणासही रागच येईल. ज्यांच्या आयुष्याची माध्यान्ह नुकतीच कुठें सुरू झाली आहे व सुंदर भावनांचें व आकांक्षांचें कूजित ज्यांच्या हृदयांत नुकतेंच ऐकूं येऊं लागलें आहे, अशा तरुणांनीं आपल्या मुखावर व वृत्तीवर गांभीर्याचें आच्छादन

धारण हे अगदी अस्वाभाविक दिसते. व त्याच्या मुखावरील पोक्त-पणाची छाया म्हणजे बालभाताच्या मस्तावर दिसून येणाऱ्या अकाली पोक्तपणाइतकीच करुणाजनक वाटते. तारुण्याचा उच्छृंखलपणा, अस्थानीं बडबड करण्याची हौस व विशेषतः तरुणींवर छाप टाकण्याची अनावर आतुरता याचें प्राबल्य हीं कित्येकांच्या मतें वाईट असलीं तरी त्यामुळें तरुण मंडळीला एक प्रकारची शोभा येते यांत शंका नाहीं. परंतु त्याचबरोबर हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं तरुणाच्या कर्तृत्वशक्तीला भरपूर वाव मिळाला तर त्याच्या तारुण्याचा हा उन्माद मर्तीकडे न जाता प्रचंड कार्य करूं शकतो. कारण यौवन उन्मादी आहे तसेंच तें तेजस्वी आहे, त्याला कार्या-कार्याचा फारसा विचार नाहीं परंतु मृत्यूची देखील भिती न बाळगता योग्य प्रसंगीं जीवाची होळी करण्याची धमक त्याच्या जवळ आहे, मावळत्या सूर्याची प्रसन्नता व गंभीरता त्याच्या जवळ नसली तरी सकाळीं वरवर येणाऱ्या बालार्काची प्रखरता त्यांत आहे आणि अनु-भवानें मिळविलेल्या ज्ञानाचें स्थिरत्वंभव त्यांत नसलें तरी खाणींतून खणून काढलेल्या परंतु पैलू न पाडलेल्या हिऱ्याचें झाकलेलें तेज त्यांत आहे. अशा या तारुण्याची तकाकी सर्वत्र दिसली पाहिजे. व ती लपवून वृद्धांना शोभणारा पोक्तपणा पांघरण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

सुदैवानें पुरुषाच्या बाबतींत अगदीं तीव्रतेनें दिसून येणारा हा वृद्धतरुणाचा विरोध बायकांच्या मध्यें फारसा येत नाहीं. स्त्रियांचा एखादा तांडा रस्त्यानें जाऊं लागला कीं आपोआपच त्यांतील आजी-बाईस त्यांत महत्व मिळतें. पोक्तपणामुळें व शहाणपणामुळें तरुण स्त्रीसमुदायांत देखील त्यांना मान मिळतो व त्यांच्या पुढें अत्यंत

सौंदर्यवती स्त्रीचें देखील तेज फिकें पडतें. आणि बायका स्वभावतः कितीही मत्सरी असल्या तरी या बाबतींत आजीबाईस आपण होऊन मान देतात व स्वतः शहाणपणाचा आव देखील आणीत नाहींत. परंतु उलटपक्षीं लग्नकार्यासारख्या प्रसंगीं जेव्हां केवळ शहाणपणापेक्षां तारुण्य, सौंदर्य, मोहक वस्त्रें व दागदागिने यांचेंच घरांत साम्राज्य असतें, त्यावेळीं आजीबाई फक्त फराळाच्या खोलींतून अनुभवाचीं व फराळाचीं ताटें बाहेर पाठविण्याचें कार्य बहुधा अंगिकारते. या नवाईनें नटलेल्या तरुणतरुणींच्या घोळक्यांत आपलें हंसें होईल याची तिला जाणीव असते. परंतु या वेळीं देखील आपली नटण्याची व मिरविण्याची हौस मनमुराद पुरवून घेणाऱ्या तरुणी आजीबाईला विसरत नाहींत. बायकांच्या बाबतींत दिसून येणारा हा परस्परां-विषयींचा आदर आणि एकमेकांना यथोचित संधी देऊन आपण मागें राहण्याची धूर्तता अनुकरणीय नाहीं असें कोण म्हणेल?

आणि खरोखर वृद्ध तरुणांनीं देखील याचप्रमाणें दिलजमाई-नें राहणें अगदीं जरूरीचें आहे. तसें झालें तर वृद्धांना तरुणांच्या उर्मटपणाबद्दल राग येण्याचें कारण राहणार नाही व तरुणांना वृद्ध हे निरुपयोगी आहेत असें म्हणण्याचें धैर्य होणार नाहीं. जगांत कांहीं तरी कर्तृत्व दाखविलेल्या वृद्धांनीं तरुणांकडून आदराची अपेक्षा करणें अगदीं स्वाभाविक आहे. दुसऱ्यास योग्य मान देणें म्हणजे स्वाभि-मान गमावणें नव्हे. व या दृष्टीनें वृद्धांना त्यांच्या वयाबद्दल व अनु-भवाबद्दल मान देणें हें स्वाभिमानशून्यतेचें लक्षण नसून स्वात्मत्वाचें आहे. तरुणांच्या कर्तृत्वाची जाणीव वृद्धांना असतेच. परंतु तरुणांच्या या सहृदयतेनें ती वृद्धिंगत झाल्याशिवाय राहणार नाहीं. व मग ते आपल्या उदयोन्मुख तरूण मित्रांना मोठ्या प्रेमानें आशिर्वाद देतील

व वृद्ध कवीप्रमाणें अश्रुपूर्ण नेत्रांनें म्हणतील कीं, “ माझ्या तरुण मित्रा, तूं या अफाट जगांत जा आणि या नव्या उषेचीं गाणीं गा. मी आतांपर्यंत माझ्या हातून होईल तें कार्य केलें. आणि यापुढें मी तुझा उदय व कार्य यांकडे मोठ्या आतुरतेनें पहात राहीन.”

# आमचा धंदा

आमच्या गणूसारखा कारागीर साऱ्या दुनियेंत सापडणार नाहीं. एखाद्या पुराणवस्तुसंग्रहालयासही शोभा आणील अशी त्याची ती घाणेरडी धोपटी, पेशवाईंस शोभणारें वस्तरें, जुनी कातर, गंजलेलें नखें काढायचें यंत्र व एखाद्या वृद्धाप्रमाणें दिसणारी दंतहीन फणी या सामुग्रीवर मात्र त्याच्या गुणाची कोणी किंमत करता नये, व तसें कोणी करूं लागला तर ती त्याची चूकच होईल. कारण गणूचे मुख्य गुण म्हणजे त्याचा अगदीं हलका हात, बोथट वस्तरा असतांनाही जखमा न करण्याची कला, यंत्राशिवाय नुसत्या कात्रीनें केस कापण्याची त्याची शिताफी आणि या सर्वांच्या जोडीला त्याचें जिव्हाचापल्य. तो आपल्या धंद्यासंबंधानें बोलूं लागला कीं गिऱ्हाइकास अगदीं गार करून सोडीत असे. एकदा मी केस कापवून घेण्याकरितां त्याच्या समोर बसलों होतों. माझ्या डोक्यावरील वाढलेले केसांचें पीक व तें साफ उडवून देण्याची मिळालेली परवानगी, यामुळें कीं काय कोण जाणें, तो त्या दिवशीं अगदीं रंगांत आला

होता. बोलता बोलता तो म्हणाला, " काय म्हणायचं साहेब ! अलीकडे या नव्या न्हाव्यांनी आमचा धंदा साफ बिघडवून टाकला आहे. ते आपणास मोठे फॅशनेबल म्हणतात. आपल्या सलूनात यंत्र आणतात, खुर्च्या टेबलाची ऐट करतात. पण केस कापता येतील तर शपथ. केस कापताना डोक्याचा आकार पाहिला पाहिजे आणि त्या आकारास शोभतील असेच केस कापले पाहिजेत. सगळ्यांकडे सारखं करून कसं चालेल ? " याप्रमाणे त्याचे चऱ्हाट व कसब बराच वेळ चालले होते. पण त्याच्या सानुभवीच मोडक्या व जुन्या आरशातून मला माझ्या डोक्याचा टापटिपपणा काहीच लागत नव्हता. तेव्हा मी त्यास म्हटले, " गणू, अगदी खरं बोलतोस; पण माझ्या डोक्याचा आकार पाहूनच केस काप म्हणजे झालं. "

एकदा मी असाच माझे मस्तक त्याच्या स्वाधीन करून बसलो असता त्यास म्हटले, " गणू, समज तुला गोव्याच्या लॉटरीत वीस हजार रुपये मिळाले. तर काय रे करशील ? " मला वाटले होते की आपल्या कसबावर रोज जेमतेम पोटापुरते मिळवणारा गणू एवढी रक्कम मिळाली तर दुसरा काही तरी प्रतिष्ठित धंदा करूं लागेल.

पण गणू शांतपणे म्हणाला, " इतके पैसे आम्हासारख्याला, साहेब, कुठून मिळणार ? पण मिळाले तर मात्र मोठी मजा होईल. मग मी तुमच्या मांडीवर घालण्याकरिता या फडक्याऐवजी रेशमी जरीचा रुमाल आणीन. चांदीच्या मुठीचे उत्तम वस्तरे घेईन. आणि छानदारशी एक शिसवी पेटी आणीन ! "

यावर मी त्यास म्हटलें, " अरे, मग तुला हाच धंदा तरी कशाला हवा ? तुला दुसरा कसला तरी चांगला फायदेशीर धंदा करता येईल. आणि ही सारी दगदग मग तुला करायला नको. "

याबरोबर धक्का बसल्यासारखें करून तो म्हणाला, "छे, छे! साहेब, इतका पिढीजात आपला धंदा सोडायचा. छट! तें नाहीं होणार आपल्या हातून." त्याचे ते अनपेक्षित उद्गार ऐकून मला त्याच्या-बद्दल फारच आदर वाटूं लागला आणि मीं त्यास म्हटलें, "देव करो आणि तुला मिळो पुष्कळसं मोठं बक्षीस आणि मग तूं तुझ्या नव्या थाटांत फिरूं लागलास कीं मी कुठंही असलों तरी तुझ्याकडून हजामत करवून घेण्याकरितां मुद्दाम मालवणला येईन."

दुर्दैवानें गणूचें हें सुखस्वप्न खरें ठरलेलें नाहीं. व या सेना न्हाव्यासमोर बादशहाप्रमाणें बसण्याची सुवर्णसंधीही मला अजून लाभलेली नाहीं. परंतु त्याची ती आपल्या धंद्याविषयी प्रीती व अभिमान यांची मला एकसारखी आठवण होत असते. आणि त्याबरोबर अनेक विचारही मनामध्यें उत्पन्न होतात. कारण, आज जीवनकलहामुळें कोणासच आपल्या धंद्याबद्दल प्रेम आणि अभिमान वाटेनासा झाला आहे. कारण, उठल्यासुटल्या प्रत्येक मनुष्य आपणांस सोईच्या वाटणाऱ्या व किफायतशीर धंद्याकडे वळतो आणि त्यांत फारसा फायदा नाहीं असें दिसलें कीं दुसऱ्या कोणत्या तरी धंद्यांत शिरतो. आणि यामुळेंच न्हावी, परीट, वाणी, शिंपी, सोनार, चांभार, इत्यादि आमच्या रोजच्या जीवनाशीं अगदीं निगडित असणारी सारी धंदेवाईक मंडळी अशी तक्रार करीत असतात कीं, अनेक उपरे लोक आपल्या जुन्या वंशपरंपरागत धंद्यांत शिरतात व त्यांचें वैशिष्ठ्य नाहींसें करून टाकतात. इतकेंही करून ते त्या धंद्याविषयीं आस्था व आपलेपणा दाखवीत नाहींतच. जुन्या धंदेवाईक मंडळीची ही तक्रार खरी नाहीं असें कोण म्हणेल?

या जुन्या धंदेवाईक मंडळीस दुसराही एक जबरदस्त शत्रु आहे व तो म्हणजे या धंद्याचें यंत्रीकरण हा होय. एका काळीं

आमचा शिंपी, आमचा न्हावी, आमचा सोनार, आमचा चांभार, असें आम्ही मोठ्या अभिमानानें म्हणत असूं. आमच्या जीवनाशीं त्याचा इतका सलोखा असे कीं तो आपलाच एक माणुस आहे असें वाटून, त्याच्याबद्दल एक प्रकारचा आदर व प्रेम आपणांस वाटत असे. पण आज परिस्थिती अजिबात पालटली आहे. तयार कपड्यांचे कारखानदार वाटेल त्या क्षणीं आम्हांस हव्या त्या आकाराचे व कापडाचे उत्कृष्ट तयार कपडे पुरविण्याची नुसती वाट पहात आहेत. आपल्या राणीसाहेबांची लहर लागेल त्या वेळीं हवा तो दागिना मिळण्याची व्यवस्था साऱ्या जवाहिऱ्यांनीं केलेली आहे. आणि अगदीं नव्या फॅशनचे चप्पल कांचेच्या कपाटांतून अगदीं जणूं काय सतृष्ण दृष्टीनें आमच्या पायांकडे पहात आहेत.

असल्या यंत्रीकरणानें या साऱ्या धंद्यांचें वैशिष्ट्य व महत्त्व घालविलें आहे याबद्दल मात्र मला मुळींच शंका वाटत नाहीं. आपल्या जुन्या शिंप्याकडून आपल्या आवडीप्रमाणें शिवून घेतलेल्या व अनेक वेळ मागणी केल्यावर मिळालेल्या कपड्यांची जी मजा आहे ती अत्यंत महाग अशा पण तयार कपड्यांत कशी सांपडेल? त्याचप्रमाणें आपण सोनें देऊन किंवा आपल्या घरीं सोनारास बसवून त्याच्याकडून तयार करवून घेतलेल्या दागिन्यांत किंवा खास आवडीच्या चांभाराकडून आपलें माप देऊन बनवून घेतलेल्या वहाणेंत (मग ती किंचित् ओबडधोबड असो) जें वैशिष्ठ्य व व्यक्तिमत्व आहे, तें मुंबईच्या मोतीबाजारांतील जवाहिऱ्याकडे घेतलेल्या दागिन्यांत, किंवा एखाद्या मुसलमानाकडे घेतलेल्या चपलांत कसें आढळूनयेईल?

परंतु याहिपेक्षां या धंद्याचें वैशिष्ठ्य दुसऱ्या एका गुणामुळें किंवा दोषरूप झालेल्या गुणातिरेकामुळें नाहींसें होत असतें. आणि तो म्हणजे आपला धंदा म्हणंजे दुसरें तिसरें कांहीं नसून ती एक

शुद्ध कला आहे ही जाणीव होय. आणि या जाणीवेनें पछाडलेले लोक, मग ते सलूनवाले, टेलर ॲण्ड आऊटफिटर किंवा सुपरफाईन लेदर वर्क्सवाले असोत वा दुसरे कोणी धंदेवाले असोत, ते सारे एकाच जातीचे. तुमचा जुन्या वळणाचा चांभार तुमच्या वहाणेकडे पाहून नाक मुरडील आणि ती मजबूत व टिकाऊ नाहीं इतकाच शेरा मारील. परन्तु तुम्ही एखाद्या लेदर वर्क्सच्या शो रुममध्ये (तुम्ही त्याला दुकान म्हटलें तर तो त्याचा अपमान होईल) जा. तुमच्यासमोर शुद्ध कला व सौंदर्य याच्या मिश्रणानें बनविलेल्या चपलाचे (त्यांना वहाणा हे नांव ओंगळ दिसतें) जोड आणून टाकताना तिथला कलावंत तुमच्या कोकणी वहाणेकडे एक भयंकर तिरस्कारपूर्ण दृष्टी टाकील व त्याबद्दल एक अक्षरही बोलणें त्यास कमीपणाचें वाटेल. आणि त्या नव्या चपलाबद्दल तुम्ही काहींही वाजवी बोललात तर तो एवढेंच म्हणेल “ मिस्टर, आमच्या स्वतःच्या कारखान्यांतला माल आहे हा. मग काय सांगायचं. ” मग अशा या कलावंतासमोर त्या चपलांच्या गुणदोषांची चर्चा करण्याचें तुह्मांस धैर्य कोठून होईल ?

दुसरीकडे कुठें गेलें तरीही हाच अनुभव येतो. एकदां मी मुंबईच्या एका फॅशनेबल केशकर्तनगृहांत गेलों. तें अगदीं आज-तागायत असल्यामुळें तिथें स्मशानवत् शांतता होती. जो कांहीं आवाज येत होता तो केवळ शस्त्रास्त्रांचाच. मी खुर्चीवर बसतांच तेथल्या एका लांब झगा घातलेल्या कलावंतानें माझें डोकें चारी बाजूंनीं नीट तपासलें. आणि तेथील शांतता बिघडणार नाहीं इतक्या हलक्या पण तीव्र नापसंतीच्या आवाजांत “ कुठं कापून घेतले होते हे केस, साहेब ? गांवाला वाटतं ? ” असे विचारलें. परंतु मी उत्तर देण्याच्या आंतच त्यानें आपलीं शस्त्रें पाजळून

माझ्या केसांस कलापूर्ण आकार देण्यास प्रारंभ केला. पण इतक्यांत मीं त्यास माझे केस एका विशिष्ट प्रकारानें कापण्याची सूचना केली. पण तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून तो म्हणाला, "आम्हांला कांहीं सांगावं लागत नाहीं. शेवटीं काम बघा व मग काय तें बोला." त्या महाभागासमोर मी काय बोलणार? मी आपली मान मुकाट्यानें वांकविली.

असाच एक दुसरा अनुभव मला एका कलावान् टेलरसाहेबां-कडे आला. हे कलावंत तर मोठे साहेबच होते. माझें माप घेतांना माझ्या अंगांतील कोंकणी शिंप्याच्या कारागिरीकडे त्यांनीं इतक्या तुच्छतापूर्वक दृष्टीनें पाहिलें कीं माझे कपडे अंगांतून गळून पडतात कीं काय असें मला वाटूं लागलें. माप घेऊन झाल्यावर माझ्या कपड्यासंबंधाच्या अपेक्षा मीं त्यांना सांगितल्या. त्यावर ते गंभीर शब्दांत म्हणाले, "तुमच्या आवडीप्रमाणं जर आम्ही कपडे शिवूं लागलों तर उद्यां आम्हांस शॉप बंद करावा लागेल. गिऱ्हाईकांचे कपडे आम्ही असे शिवतों कीं प्रत्येकानें हे कपडे कोणी शिवले ह्मणून विचारलं पाहिजे. आणि तुमचे वेडेवांकडे कपडे आम्हीं शिवले असं लोकांना समजलं तर कोणीच आमचेकडे येणार नाहीं." या कला-वंतांना धंदेवाईक कोण म्हणेल? कारण ते आपल्या धंद्याकडे ती केवळ कला आहे याच दृष्टीनें पाहतात. आणि याचमुळें आपलें गिऱ्हाईक म्हणजे आपल्या कलाविकासाचें एक साधन, व आपल्या कलेला जिवंतपणें जनतेसमोर आणणारें एक चालतेंबोलतें बाहुलें असेंच त्यांना वाटत असतें.

ह्या वेळपर्यंत मी बुद्धिजीवी धंदेवाल्याविषयीं विचारच केलेला नाहीं. आणि खरोखर बुद्धिजीवी धंद्यामध्यें विशेष करण्याजोगेंही कांहीं नाहीं. कारण त्यांचें वैशिष्ठ्य हेंच कीं, बुद्धिजीवी धंदेवाले

लोक आपल्या धंद्यांबद्दल आदर व प्रीती दाखवीत नाहींत अगर त्यांस कला या दृष्टीनेंही पहात नाहींत. खरें बोलायचें तर वकील, डॉक्टर, अध्यापक, इंजिनियर, कारखानदार, इत्यादिकांचे धंदे–धंदा, कसबीपणा किंवा कला या नामाधिकरणाच्या पलीकडे गेले आहेत. ते केवळ शास्त्ररूप झाले आहेत. कोणत्याही बुद्धिजीवी माणसाकडे केव्हांही गेलें कीं तो आपल्या धंद्याबद्दल नापसंतीचे उद्गार काढतो आणि यापुढें या धंद्यांत शिरण्याचा गाढवपणा कोणीही करूं नये असें कळवळ्यानें सांगत असतो. आणि कित्येक तर इतके कनवाळू असतात कीं, या साऱ्या धंद्यांतील गर्दी कमी होईपर्यंत सरकारनें एकंदर विश्वविद्यालयांना टाळें लावावें व हे पदवीधरांचे कारखाने अनियमित मुदत बंद करावे असा पोक्त व फुकट सल्ला ते वेळो-वेळीं देत असतात.

परंतु या दोन जातींच्या धंदेवाल्यांशिवाय तिसऱ्या एका जातीचे कांहीं धंदेवाले आहेत व ते म्हणजे ज्यांचा धंदा चुकलेला आहे असे लोक होत. या लोकांपैकीं कै. लोकमान्य टिळक एक होते असें म्हणण्याचें धाडस मी करीत नाहीं. परंतु ‘मी राजकारणांत पडलों नसतों तर हरदास किंवा शाळामास्तर झालों असतों’ अशा-सारखे त्यांनीं काढलेले उद्गार सुप्रसिद्ध आहेत. हे धंदा चुकलेले लोक हरएक धंद्यांत दिसून येतात. त्यामुळेंच (रोग्यांना विशेष त्रास नसलेले) डॉक्टर लेखनव्यवसाय किंवा दुसऱ्या कांहीं उलाढाली करतात. पोरांना हांकणें कमीपणाचें समजणारे अध्यापक नाटकें कर-तात व त्यांत भाग घेतात. कित्येक वकील अध्यापनकार्य करतात किंवा अप्रत्यक्षपणें व्यापार उद्योग करतात. आणि हें सारें कशा-करितां? केवळ हौसेखातर नव्हे. तर आपल्या धंद्यांत त्यांना स्वारस्य व मजा वाटत नाहीं म्हणून.

परंतु न आवडणारा आणि आपल्या गुणांशीं विसंगत असा

धंदा केल्यानें या लोकांचें दुर्दैव संपत नाहीं. तर त्यांना जन्मभर केवळ जुलमानें या धंद्याचें गुलाम होऊन रहावें लागतें. कारण ते पडले बुद्धिजीवी लोक; धंद्यांत कसब किंवा कला असली तरी पुष्कळसें शास्त्र असतें व म्हणून इतर धंदेवाल्यांप्रमाणें आपला धंदा चटकन् त्यांना बदलतां येत नाहीं. एखादा चहावाला हॉटेल चांगलें चालत नाहीं म्हणून किराण्या मालाचें दुकान किंवा लॉन्ड्री काढील; एखादा सलूनवाला सलून बंद करून दुसरा कांहींतरी रोजगार करूं लागेल. परंतु एखाद्या डॉक्टरसाहेबांना, वकीलांन किंवा मास्तरांना आपला धंदा सोडून सहजासहजीं दुसऱ्या धंद्यांत कसें जातां येईल ?

परंतु शास्त्ररूप नसलेला बुद्धिप्रधान असा एकच धंदा या लोकांसाठीं देवानें नीर्माण केलेला आहे आणि तो म्हणजे लेखनव्यवसाय हा होय. आपल्या धंद्यांत आनन्द व आपलेपणा वाटत आहे यासाठीं, केवळ विरंगुळा म्हणून पुष्कळ लोक वाङ्मयसेवेकडे वळतात हें खरें आहे. परंतु या व्यवसायामध्यें आकर्षकपणाच इतका जबरदस्त आहे कीं एकदां यांत शिरल्यावर मनुष्याला दुसरीकडे जावें असें सहसा वाटतच नाहीं व तो केवळ तद्रूप होऊन जातो. खरोखर या प्रमाणें जे वाङ्मयसेवेकडे वळले, ज्यांच्या गुणांना व प्रतिभेला त्यांत मनसुराद क्षेत्र मिळालें व त्यांच्या जोरावर ज्यांनीं स्वार्थ नव्हे तर कायमचा परमार्थही साधला ते महाभाग खरोखर धन्य होत. जगांतील पुष्कळसे साहित्यसम्राट बहुतांशीं याच वर्गांतील आहेत. कीट्स हा डॉक्टर होता. मील्टनचा जन्म राजकारणांत गेला. लॅंब यानें जन्मभर कारकुनी केली. कॉनराडचें अर्धेंअधिक आयुष्य नाविक म्हणून समुद्रावर गेलें; वेल्स हे शाळामास्तर व हार्डी हे वास्तुशास्त्रज्ञ होते. त्याचप्रमाणें तुकारामानें वाण्याचा धंदा करीत असतांनाच कवित्व केलें आणि आधुनिकांपैकीं कै. कोल्हटकर, तांबे, चन्द्रशेखर,

वरेरकर, कै. गडकरी, इत्यादि वाङ्मयभक्तांनीं वाङ्मयेतर व्यवसाय करीत असतांनाच आपलें कार्य केलें.

एका अर्थीं या लोकांचा धंदा चुकला होता, ही जनतेच्या दृष्टीनें मोठया आनन्दाची गोष्ट झाली असेंच मला वाटतें. कारण कोणताहि धंदा म्हटला कीं त्यास 'कोणी निंदा, कोणी वंदा, आम्हां स्वहिताचा धंदा ॥' हे उद्गार लागूं पडतातच. परन्तु लेखन-व्यवसायाची गोष्ट किंचित् वेगळी आहे. कारण ह्या वर निर्देश केलेल्या साहित्यसेवकांना आपल्या धंद्यांत आपल्या प्रतिभेस क्षेत्र नाहीं याची जाणीव होती. आणि त्यामुळें परिस्थितिशीं झगडतांना त्यांची प्रतिभा आपोआपच अधिक तेजस्वी झाली. इतर व्यवसाय करीत असतांना अनिच्छतः त्यांस जें ज्ञान मिळालें व जगाचा अनुभव आला त्यामुळें त्यांच्या वाङ्मयकार्याला एक प्रकारचा भरीवपणा प्राप्त झाला. त्यांना आपण वाङ्मयसेवा हा एक केवळ धंदा करीत नसून एक प्रकारें लोककार्य करीत आहोंत अशी पवित्र जाणीव होती. इतर धंदेवाल्यांना वाटणारा अभिमान, प्रीति व कलात्मकतेची जाणीव हे सारे गुण त्यांच्यामध्यें होते. परन्तु त्या धंदेवाईकांप्रमाणें त्यांनीं या गुणांना कधींच दोषास्पद केलें नाहीं. मग साऱ्या धंद्याचा मुकुटमणी म्हणून लेखनव्यवसायाकडे इतरांनीं पाहिलें तर त्यांत नवल तें काय !

**यशवन्त**

फेब्रुवारी १९३७

# संभाषणाचा मेवा

" अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् " या उक्तीचा अनुभव त्या रात्रीं आम्हांस आला. आमची बी. ए. ची परीक्षा नुकतीच आटोपली होती व आम्हां सर्वांचे पेपरहि समाधानकारक गेले होते. आणि गेले कित्येक महिने मनावर असलेलें काळजीचें ओझें दूर झाल्यामुळें उद्यांची पर्वा न करतां स्वच्छंदानें मोकळ्या हवेंत बागडणाऱ्या फुलपांखरांप्रमाणें आम्हांस वाटत होतें. तथापि हें मनावरचें दडपण आतां नाहींसें झालें आहे अशी स्वतःची खात्री करण्यासाठींच कीं काय, त्या रात्रीं आम्ही क्लबांत पोटावर मात्र भरपूर वजन घातलें आणि जीवन म्हणजे नुसता धूर आहे अशा वृत्तीनें सिगारेटच्या धुराचे लोट सोडीत वसतिगृहाच्या बाहेर पडलों. गेले दोनचार आठवडे पुस्तकांतील किडे बनून रात्रीचे दिवस केले असतांनाहि त्या रात्रीं झोंपावें असें कोणासच वाटत नव्हतें. गेलीं कित्येक वर्षें आम्हीं अत्यंत रम्य अशा विद्यार्थीदशेंत घालविलीं होतीं, व ही बी. ए. ची परीक्षा म्हणजे आमच्या भावी जीवनाचें महाद्वारच

होतें. परंतु त्यांत शिरून त्याच्यांतील जीवनकलहांत स्वतःस फेंकण्यापूर्वी स्वातंत्र्याचे जे चार क्षण मिळतील त्यांत जास्तींत जास्त मौज करावी अशा वृत्तीनें आम्ही वसतिगृहाच्या बाहेर पडलों होतों. त्या रात्रीं एक टॅक्सी करून आम्हीं खूप भटकलों व शेवटीं कंटाळा येऊन एक वाजण्याच्या सुमारास वसतिगृहांत परत आलों. परंतु आमचे पाय कांहीं झाले तरी खोल्यांकडे वळेनात. ती चांदणी रात्र होती आणि प्रसुप्त मुंबापुरीच्या श्वासोच्छवासाचा आवाजदेखील ऐकूं येत नव्हता. वसतिगृहाच्या बाहेरील हिरवळ चंद्राच्या सौम्य किरणांनीं चकाकत होती. आम्हीं तिच्यावर देह टाकून दिला व पडल्या पडल्या गप्पा मारूं लागलों.

आम्ही सहासातजण नाना विषयांचे विद्यार्थी होतों. त्यामुळें जवळजवळ सारें कॉलेजचें विश्व आम्हां सप्तर्षीतच सामावलें होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. बाहेरच्या जगाशीं आम्ही अगदीं बेफिकीर असलों तरी कॉलेजच्या जीवनाशीं व तरुण जगाशीं अगदीं समरस झालेले. आमच्यापुढें जीवननगरीची प्रचंड भिंत व महाद्वार उभें असलें तरी आम्हांस अविषय असें काय असणार ? कांहीं विषयांचा परिपूर्ण अभ्यास करून त्यांत तज्ञ होण्यापेक्षां प्रत्येक विषयाचें थोडें ज्ञान संपादन करण्याची मधुकरवृत्ति आम्हीं आमच्या विद्यार्थी दशेंत ठेवल्यामुळें आम्ही एकंदरींत अष्टपैलु होतों असें अहंकाराच्या दोषास पात्र होऊनहि म्हणावयास हरकत नाहीं. बोलतां बोलतां कॉलेजजीवन आतां संपलें या विचारानें कॉलेजांतील साऱ्या प्रोफेसरांची व विद्यार्थिनींची हजेरी घेऊन आम्हीं गंभीर विषयांकडे वळलों. सिनेमा, काव्य, कादंबरी, नवमतवाद, नवहिंदुधर्म, वगैरे विषयांचीं दालनें ओलांडून आम्हीं राजकारणांत प्रवेश केला व शेवटीं स्वतःच्या भावी जीवनाची चर्चा करून आपल्या उज्वल वाटणाऱ्या

भविष्याकडे दृष्टि फेंकली. आमच्यापैकीं एकाचें ध्येयवादित्व व दुसऱ्याची काव्यदृष्टि, एकाचा समाजवादाचा पुरस्कार तर तिसऱ्याचा गर्भश्रीमंती अभिमान, एकाची फुलपांखरी वृत्ति तर दुसऱ्याचा शुद्ध व्यावहारिक स्वभाव, अशा परस्परविरुद्ध मनोवृत्तींच्या या अभिनव संमेलनामुळें आमच्या संभाषणास अपूर्व रंग चढला होता. पण आम्हीं, भिन्न भिन्न मतें व वेगवेगळे स्वभाव–असतांहि, शक्यतों आमच्या संभाषणास वादविवादाचें स्वरूप प्राप्त होऊं दिलें नाहीं. एकदांच विरोधी मतांच्या घर्षणाचा आमच्यावर नकळत परिणाम होऊन आमच्या आवाजाचा पारा वर चढला. परंतु वर झोंपलेल्या सुपरिंटेंडेंटनीं " Don't yu forget that it is past midnight. " अशी हलकेच सूचना करतांच आम्हीं शुद्धीवर आलों. आम्ही याप्रमाणें किती तास बोलत होतों तें सांगतां येणार नाहीं. परंतु किती वाजले असतील याची सहज चौकशी करण्याकरितां रस्त्याकडे पाहिलें तों समोरचा इराणी आपलें रेस्टोरां उघडीत होता. त्याबरोबर प्रत्येकाच्या तोंडून "अरेच्या, पांच वाजले!" असे उद्गार बाहेर पडले.

माझ्या आयुष्यांतील तो एक अपूर्व प्रसंग होता. आम्हीं आतांपर्यंत पुष्कळ चकाट्या पिटल्या होत्या; कुटाळकींत भरपूर भाग घेतला होता; एकमेकांचीं डोकीं फुटण्याचा प्रसंग येईपर्यंत जोराचे वादविवाद केले होते; परंतु संभाषणाचा खरा मेवा यापूर्वी आम्हांस चाखावयास मिळाला नव्हता. मार्गट ॲस्क्विथ हिनें आपल्या आत्मचरित्रांत मोठमोठया सुसंस्कृत आंग्ल स्त्री–पुरुषांबरोबर तासांचे तास आपण संभाषण करीत बसे असें वेळोवेळीं लिहिलेलें आहे, आणि संभाषण कशा प्रकारचें असूं शकेल याचें मला पुष्कळदां कोडें वाटत असे. परंतु त्या दिवशीं हें कोडें मला थोडेंफार उल-

गडलें असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण संभाषणाचा खरा फायदा म्हणजे बौद्धिक साहचर्य व स्नेहमूल अशी ज्ञानाची व विचारांची देवघेव. एकमेकाविषयीं स्नेह व आदर असलेल्या चार लोकांनीं एकत्र व्हावें, अज्ञात परंतु अगदीं मंदमंद वाहणाऱ्या सायंवाताप्रमाणें विचारप्रवाह त्यांच्या शब्दांतून उत्पन्न व्हावें व अखेर त्यांतूनच संभाषणाचें संगीत निर्माण व्हावें यांतच संभाषणाची खरी मौज व जादु असते.

झोंपण्याची इच्छा नसणारा बाळ ज्याप्रमाणें मातेच्या अंगाईगीतानें व हिंदोलनांनीं आपोआप झोंपीं जातो त्याचप्रमाणें सुसंस्कृत मन नकळतच विचाराच्या संगीतानें व जिज्ञासु मनांच्या सहवासानें ओढलें जातें. ब्रिज अगर कॅरम खेळण्यास जशीं चार माणसें मुद्दाम बसतात त्याप्रमाणें संभाषण करण्यासाठीं मुद्दाम एकत्र बसल्यानें कधीं खरें संभाषण होत नाहीं. कारण सहजपणा हें संभाषणाचें मुख्य वैशिष्ट्य आहे आणि यामुळेंच रागिणींतील काव्य–शास्त्रविनोद अगर महाभारतांतील संवाद मनोहर वाटतात. नानासाहेब, भाऊसाहेब, रागिणी व उत्तरा म्हणजे परस्परसहवासास व विचारविनिमयास भुकेलेली मंडळी. ती कुठेंहि व कशीहि जमली व बोलूं लागली कीं त्यांच्या संभाषणांतून खरा आनंदच निर्माण व्हावा यांत नवल नाहीं. वनपर्वांतील संवादांचेंहि रहस्य हेंच होय. पांडवांसारख्या पराक्रमी परंतु धार्मिक व विद्वान् वीरांनीं वन–वासाच्या शांत काळांत मोठमोठया मुनिवरांच्या सान्निध्यांत धर्माच्या व नीतीच्या गोष्टी बोलाव्या हें साहजिकच आहे. त्यांत अनैसर्गीकपणा नाहीं अगर तत्त्वविवेचनाचा जडपणाहि नाहीं, उलट चारपांच स्नेहीमंडळीच्या प्रेमपूर्ण संभाषणांचें माधुर्य व आकर्षणच त्यांत आहे.

मोरोपंतांनीं म्हटल्याप्रमाणें सुसंगति व सुजनवाक्य हीं संभाष-

णाचा खरा पाया होत; परंतु व्यक्ति तेवढ्या प्रकृति या न्यायानें कोणत्याहि मंडळीमध्यें नाना स्वभाव व नाना मतें एकत्र होत असतात. आणि यामुळें उत्कृष्ट संभाषणास सद्विचाराची जशी आवश्यकता असते तशीच दुसऱ्यांचीं मतें ऐकून घेण्याची अगर भिन्नरुचीच्या समन्वयाचीहि जरुरी असते. ज्ञानाच्या अगर विचार-मौक्तिकांच्या या देवघेवींत अत्यंत स्वार्थी अगर आपमतलबी होऊन कोणासच संभाषणाचा मेवा चाखतां येणार नाहीं. डॉ. जॉन्सन याचें मित्रमंडळ म्हणजे अठराव्या शतकांतील लंडनचीं अनेक रत्नेंच होतीं व ही मंडळी कोणत्याहि कॉफीपानगृहांत एकत्र झालीं कीं कॉफीपानाऐवजीं वाक्सुधापानच आकंठ होत असे. परंतु या मंडळींतील गोल्डस्मिथ कवीस मात्र आपल्या वाक्चातुर्याचा भलताच अभिमान वाटत असल्यामुळें एकदां संभाषण सुरू झालें कीं बोलण्याचा सगळा मक्ता स्वतःकडेच घेण्याचा तो प्रयत्न करीत असे. परंतु बिचाऱ्या गोल्डस्मिथवर वाक्देवीचा वरदहस्त नव्हता व म्हणून डॉ. जॉन्सन नेहमीं त्यास उद्देशून म्हणे कीं, आमचा गोल्डी लिहितो देवदूतासारखा पण बोलतो पोपटासारखा. यामुळें गोल्डस्मिथ बोलूं लागला कीं कोणीच त्याच्याकडे लक्ष देत नसे व शेवटीं आंतल्या आंत संतापून चिडून तो मित्रमंडळींतून उठून जात असे.

खरें पाहिलें तर कोणत्याहि प्रसंगीं स्वमतास व स्वतःस भलतें महत्त्व देणारे गोल्डमिथसारखे लोक केव्हांहि संभाषणाचे वैरीच होत. या लोकांना परमतांत कांहींतरी तत्त्व आहे, असें कबूल करणें म्हणजे आपला कमीपणा आहे असें वाटत असतें, व त्यांचा दुरभिमान इतका जोरदार असतो कीं, सर्वसामान्य मतांपेक्षां वेगळें मत पुढें मांडण्यांत व तेंच खरें म्हणून त्याचा जोरानें पुरस्कार करण्यांतच त्यांना शहाणपणा वाटत असतो. आणि सॉक्रेटिसासारखा शांत

व अधिकारी तत्त्वज्ञानी जरी विनतोड मुद्यांनीं त्यांची समजूत घालूं लागला तरी त्यांचें समाधान होत नाहीं. अर्थात् पुष्कळदां संभाषण सुरू करण्यास या लोकांची फार मदत होते. कारण चार मित्रमंडळी एकत्र जमली व आपल्यासमोर श्रोतृगण आहे असें यांस वाटलें कीं, ते नाना विषयांवरील आपलीं मतें व विचार फेंकूं लागतात व इंग्रजी म्हणीप्रमाणें संभाषणाची गुंडी पुढें ढकलून देतात. परंतु संभाषण सुरू झाल्यानंतर या लोकांपासून आपलें रक्षण करण्याचा उपाय म्हणजे त्यांच्या मतांची थोडीफार उपेक्षा करणें. व ही गोष्ट थोड्याशा कुशलतेनें केली कीं, त्यांचा स्वाभिमान दुखविला जात नाहीं. परंतु त्याचबरोबर आपलीं मतें बॉम्बगोळ्याप्रमाणें मध्येंच फेंकण्याचा त्यांना मोहहि होत नाहीं.

संभाषणास किंचित् विघातक अशी दुसरी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे स्नेहीमंडळींत ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध व त्यामुळें आदरणीय अशा व्यक्तीचें अस्तित्व. या लोकांना आपल्या वडिलकीची व ज्ञानवृद्धत्वाची जाणीव असतेच; परंतु त्याहीपेक्षां ती जाणीव तेथें जमलेल्या तरुणमंडळीस अधिक असते. आणि त्यामुळें पुष्कळदां खरें संभाषण होऊं शकत नाहीं. कारण आपले विचार व मतें निर्भीडपणें पुढें मांडण्याची तरुण मंडळीची साहजिकच इच्छा असते; आणि कितीहि मोकळ्या मनाचा व तरुणवृत्तीचा वयस्क गृहस्थ त्या मंडळींत असला तरी त्यांना मोकळेपणा वाटत नाहीं. तरुण मंडळींनीं कोणताहि विषय सुरू करावा, इतरांनीं कांहींतरी बोलावें व शेवटीं त्या आदरणीय गृहस्थानें भरतवाक्याप्रमाणें शेवटचे विचार प्रकट करून त्या विषयाची समाप्ति करावी आणि मग नवीन विषयांत शिरावें असाच प्रकार चाललेला असतो. अशा स्थितींत संभाषणांत रंग कसा येणार ! कारण कोणीच खुल्या दिलानें

बोलत नाहीं व संकोच, भीड व आदर यांच्या या वातावरणांत मोकळे विचार अगदीं थिजल्यासारखे होतात.

यामुळेंच प्लेटोच्या संवादांना संभाषणें म्हणणें चुकीचें होईल. सॉक्रेटीस हा तरुण ग्रीक मंडळींचा द्रष्टामुनि होता व त्याचा शब्द म्हणजे केवळ वेदवाक्य होतें; यामुळें त्याच्याभोंवतीं जी तरुण जिज्ञासू मंडळी जमा होई त्यांचा मुख्य उद्देश म्हणजे सॉक्रेटिसाच्या मनास व जिव्हेस चालना देऊन त्याचीं विचारमौक्तिकें अत्यंत अधाशी मनानें ग्रहण करणें हाच होता. त्याचे संवाद म्हणजे एक प्रकारचीं ज्ञानसूत्रेंच होतीं. शांतिपर्वांतील संवादहि याच स्वरूपाचे आहेत. महाभारतयुद्ध समाप्त झालेलें, आणि एवढा विजय मिळविला तरी या रणकुंडांतून वांचलेल्या पांडवादिकांच्या मनावर अत्यंत विषादाची छाया पडलेली; अशा स्थितींत शरपंजरीं पडलेल्या भीष्माचार्यांच्या तोंडून धर्मनीतीच्या चार गोष्टी ऐकाव्या ही इच्छा त्यांना होणें नैसर्गिकच आहे. परंतु सॉक्रेटिसाचे संवाद काय किंवा शांतिपर्वांतील संवाद काय, त्यांचा हेतु म्हणजे ज्ञानसाधन व धर्मसाधन हाच होता, व त्यामुळें मनाची सात्त्विक करमणूक झाली तरी त्या महात्म्यांच्या संगतीचा लाभ आपल्याला झाला हीच जाणीव तिथें जमलेल्या मंडळींना विशेष प्रामुख्यानें होत असे.

परंतु आपल्या सुदैवानें कधींकधीं ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध असे, परंतु एवढया तरुणमनाचे कांहीं गृहस्थ भेटतात कीं, त्यांच्या सहवासांत अत्यंत तरुण, स्वातंत्र्यप्रिय अगर भिडस्त मंडळींचा देखील दुजाभाव नाहींसा होतो व ते मोकळेपणानें त्यांच्याशीं बोलूं लागतात. याचा एक सुंदर अनुभव मला एकदां आला.

सुमारें नऊ वर्षांपूर्वी कै. श्री. कृ. कोल्हटकर हे आपल्या

डोळ्याच्या ऑपरेशनकरितां मुंबईतील एका नेत्रवैद्याच्या दवाखान्यांत सुमारें एक महिना राहिले होते. त्या वेळीं मी बी. ए. होऊन मुंबईतच पुढील अभ्यास करीत होतों व तात्यासाहेब मुंबईत व जवळच राहात आहेत अशी माहिती मिळतांच मी माझ्या एका स्नेह्याबरोबर त्यांना भेटावयास गेलों. आम्ही दवाखान्यांत गेलों त्या वेळीं ते एका कॉटवर पडलेले होते. त्यांच्या आजूबाजूस अगदीं नव्या पिढींतील पांचसहा मंडळी बसलेली होती व युनिव्हर्सिटीबद्दल गोष्टी चालल्या होत्या. तिथें गेल्यावर प्लेटोच्या संवादांतील सॉक्रेटिसाची स्मृति मला झाल्यावांचून राहिली नाहीं. सॉक्रेटीस बसला आहे व त्याच्या जवळपास तरुण जिज्ञासु मंडळी आदरानें बसून त्याच्या वाक्सुधेचें प्राशन करीत आहे असें चित्र क्षणभर माझ्या डोळ्यासमोरून गेलें. परंतु क्षणभरच. कारण कै. तात्यासाहेब यांची त्या वेळची भूमिका सॉक्रेटिसाची तशीच त्यांच्या शिष्यांचीहि होती असें मला लवकरच समजून आलें. ते अगदीं मोकळेपणानें बोलत होते व त्यामुळें त्यांच्याबद्दल अत्यादर असणाऱ्या आम्हां तरुण मंडळींचा सारा संकोच नाहींसा झाला व आम्ही विश्वविद्यालय, वाङ्मय, इत्यादि आमच्या विषयांवर आपल्या समवयस्क व जिव्हाळ्याच्या स्नेह्यांशीं बोलावें त्याचप्रमाणें त्यांच्याबरोबर बोलूं लागलों ज्ञानरसाची ती एक मोठी मेजवानीच होती. आणि तेथें असलेल्या वेळांत ज्ञानासारखें तें अवीट पक्वान्न आम्हीं अत्यंत प्रेमानें एकमेकांना वाढलें व स्वतः सेवन केलें. आम्ही तास दोन तास कै. तात्यासाहेबांच्या सहवासांत त्या ठिकाणीं होतों, परंतु वेळ कसा गेला आणि शारदामंदिराच्या अनेक दालनांतून आम्ही पुनः पुन्हा कितीदां तरी फिरलों हें आमच्या लक्षांत देखील आलें नाहीं. तात्यासाहेब नमस्कार करून तिथून निघून गेल्यानंतर मात्र आम्हांस त्यांचा तो

सहवास म्हणजे किती अननुभूत आनंदाचा लाभ होता याची पुरी कल्पना आली.

या प्रसंगीं मला पुन्हा एकदां संभाषणाची मोहिनी किती जोरदार आहे व तें किती अवीट पक्वान्न आहे याची खात्री पटली. मनुष्यप्राणी हा उपजतच संगतिप्रिय आहे आणि चारचौघीं माणसें एकत्र झाल्यावर भाषेची अडचण मुळीं नसेल तर आपोआप त्यांच्या गप्पागोष्टी सुरू होतात. आणि एका अर्थी या अशा प्रकारच्या औपचारिक अगर सहजासहजीं झालेल्या गोष्टी म्हणजे आमचीं जीवन-यंत्रें विनात्रास चालविणारीं तेलेंच होत व त्यामुळें त्यांस मानवी जीवनांत अत्यावश्यक गोष्टींइतकेंच महत्व आहे. परंतु खऱ्या संभाषणाचें स्वरूप किंचित् वेगळें आहे. कारण ती एक प्रकारची कला आहे. जीवनांतील प्रत्येक गोष्टीबद्दल आदर, तिच्याविषयींचें ज्ञान, जिज्ञासा व चिकित्सा, स्वज्ञानाबद्दल अनहंकार, एक प्रकारची स्नेहशील वृत्ति व न पटणाऱ्या गोष्टीदेखील आपणास न आवडणाऱ्या माणसाच्या तोंडून ऐकून घेण्याइतकी सहनशीलता, इत्यादि गुण हे संभाषणास अत्यावश्यक आहेत व त्यांच्याशिवाय संभाषणास कधींहि रंग चढत नाहीं, आणि या गुणांच्या अभावीं संभाषणास वितंडवादाचें अगर गप्पांचें अगर कुटाळकीचें स्वरूप प्राप्त होतें. परनिंदा हा एक अत्यंत संसर्गजन्य रोग आहे आणि चार मंडळी एकत्र झाल्यावर त्यांतील एकादा जरी या रोगानें पीडित असेल तरी तो क्षणांतच इतरांस दूषित करून सोडतो व मग ती सर्व मंडळी या गटारगंगेंत यथेच्छ स्नान करूं लागतात. परंतु तीच मंडळी जरा सुज्ञ असेल तर जरासा विषय बदलल्याबरोबर जननिंदा मागें पडून त्याच बोलण्यास निर्मळ स्वरूप प्राप्त होतें.

कारण अशा प्रकारचें संभाषण म्हणजे जीवनांतील विशुद्ध

आनंदापैकीं एक आहे. त्याच्याकरितां कांही वेंचावें लागत नाहीं. मोकळें मन, ज्ञानतृष्णा व स्नेहवृत्ति एवढया सामुग्रीवर आपणांस या आनंदाचा लाभ करून घेतां येतो. एच. जी. वेल्स यांजबद्दल लिहितांना त्यांच्या एका मित्रानें म्हटलें आहे कीं, त्यांचें संभाषण म्हणजे एक अपूर्व लाभ आहे. आपल्या विश्वकोशात्मक डोक्यांतून कल्पना, विचार व मतें ते एकसारखीं बाहेर फेंकीत राहतात. ते बोलूं लागले कीं, आपलें अंतरंग खुलें करून बोलतात; परंतु दुसऱ्याच्या अंतःकरणाचा ठाव घेतल्यावांचून रहात नाहींत. त्यांचें मन तरुण, जिज्ञासु व चिकित्सक आहे व तें दुसऱ्याच्या मनास एकसारखी चालना देत असतें. वेल्स यांच्या अंगचे गुण कांहीं प्रमाणांत उपजत असले तरी ते प्रयत्नसाध्य आहेत यांत शंका नाहीं. इतकेंच नव्हे, तर या गुणांचें अस्तित्व म्हणजे सुसंस्कृत मनाचें एक प्रमुख लक्षणच होय. पुष्कळदां संगति चांगली असतांना देखील वेळ अगदीं कंटाळवाणा गेला अशी तक्रार आपण करीत असतों. परंतु माझी अशी खात्री आहे कीं, संभाषणाच्या कलेचा आपण थोडा अभ्यास केला तर अशा प्रकारची तक्रार करण्याचा प्रसंग कधींहि आपल्यावर येणार नाहीं.

संभाषणाविषयीं विचार करूं लागलों कीं, वकिलांचें चेंबर व प्रोफेसरांची कॉमनरूम यांची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. वकिलांचें चेंबर म्हणजे जगाचेंच एक लहानसें चित्र. त्यांतील मंडळी एका पेशाची असली तरी त्यांत सर्व प्रकारच्या वृत्तींचीं, मनांचीं, व विचारांचीं माणसें सांपडावयाचीं. वकिली हा धंदाच असा आहे कीं, त्यांत जीविताचें विराट स्वरूप क्षणोक्षणीं दृष्टीस पडतें. यामुळें विश्रांतीसाठीं वकील मंडळी एकत्र आली कीं, त्या ठिकाणीं त्यांस अविषय म्हणून कांहीं असेल अशी अपेक्षाच करावयास नको. टार-

झनसारख्या अगदीं जंगली माणसास जर का वकिलांच्या चेंबरांत आठ दिवस आणून बसविलें तर तेवढयांत तोदेखील पुष्कळसें व्यवहारज्ञान व माणुसकी संपादन करूं शकेल. कारण अष्टौप्रहर स्वार्थी, मतलबी, कपटी वगैरे कज्जेदलालांशीं संबंध ठेवूनहि त्यांच्या दुर्गुणांचा सहसा स्वतःस विटाळ होऊं न देणारे वकील जर आपल्या रंगांत कुठें सांपडत असतील तर आपल्या चेंबरांत. या ठिकाणीं त्यांचा गंभीरपणा, पोक्तपणा, शुद्ध व्यावहारिक वृत्ति, वगैरे गुणांचा लोप होतो व चेंबराच्या त्या तारुण्यमय वातावरणांत ते तरुण होऊन मोकळेपणानें बोलूं लागतात. गांवांतील हॉटेलापासून तों थेट परब्रह्मापर्यंत सर्व विषयांचा ऊहापोह तिथें चाललेला असतो, आणि कायद्यांतील कृमि बनलेल्या एखाद्या वकिलानें न्यायासनासमोर चाललेल्या प्रश्नाची त्या ठिकाणीं चर्चा सुरू केली तरी ती फार वेळ टिकूं शकत नाहीं. वकील लोकांचा मुख्य गुण म्हणजे वाक्चातुर्य आणि त्यामुळें वकिलांच्या चेंबरांत संभाषणास किती मजा येत असेल याची कल्पनाच करावयास पाहिजे.

वकिलांच्या चेंबरप्रमाणें जर संभाषणाचा खरा मेवा कुठें चाखावयास मिळत असेल तर प्रोफेसरांच्या कॉमनरूममध्यें. वकिली व प्रोफेसरांचा धंदा यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. एक अत्यंत व्यावहारिक व संसाराशीं अगदीं समरस झालेला, तर दुसरा कल्पना, विचार व ज्ञान यांच्या जगांतच वावरणारा. एकाचे पाय जमिनीवर तर दुसऱ्याचें डोकें शुद्ध अस्मानांत. परंतु वकील–प्रोफेसर यांच्यामधील हा भेद केवळ धंद्यापुरताच आहे. कारण ते दोघेहि बुद्धिजीवि आहेत आणि त्यांच्यामधील काव्यशास्त्रविनोदाची आवड हा त्यांच्या जीवनाचा एक अवश्य भाग आहे. त्यामुळें वकील लोकांप्रमाणेंच प्रोफेसर जेव्हां वर्गांतील लेक्चरपुरती धारण केलेली भूमिका

सोडून आपल्या कॉमनरूममध्यें येतो त्या वेळीं आनंदी व विनोदी असा तरुण होतो. जणूं काय युद्धावर जातांना घातलेलीं कवचकुंडलें काढून टाकल्यामुळें त्यास हायसें वाटत असतें आणि त्यामुळें आंत आल्यावर “ I have finished and I am finished ” असें म्हणून आपला देह कसातरी खुर्चीवर फेंकून तो तिथें चाललेल्या वाग्यज्ञांत हवन करूं लागतो. प्रोफेसरांची कॉमनरूम म्हणजे एक प्रकारचा विश्वकोशच. त्या ठिकाणीं सर्व प्रकारचे तज्ञ असावयाचे. परंतु त्या ठिकाणीं आल्याबरोबर प्रोफेसर आपल्या विषयाची परिभाषा विसरतो. धर्म, राजकारण, व्यवहार, विद्यार्थ्यांचें जीवन, विश्वविद्यालय लैंगिक चर्चा अशा एक ना असंख्य विषयांवरचें बोलणें त्या ठिकाणीं चाललेलें असतें. वकिलांच्या चेंबरप्रमाणेंच त्या ठिकाणीं हास्यविनोदाचा पूर वहात असतो. तेथील उपरोध दंशशून्य असतो आणि विनोदाला टवाळीचा अगर अश्लीलपणाचा बहुधा ऊग्र वास येत नाहीं. यामुळेंच वर्गामध्यें कर्दनकाळ वाटणारे प्रोफेसर, “ समुद्रइव गांभीर्यें ” वकील—घरच्या नेपथ्यपाठाच्या वेळीं मूग गिळून बसणारे किंवा आपल्या ज्ञानास व शब्दास मोल आहे याची वाजवी पेक्षां जास्त जाणीव असणारे वकील व प्रोफेसर देखील आपल्या सहव्यवसायाच्या मंडळींत विनोदी व बोलके होतात. कारण त्या वातावरणांत त्यांचें मोठेपणाचें अगर मुग्धत्वाचें कवच टिकाव धरूं शकत नाहीं व ते मोठ्या आनंदानें तेथील संभाषणाचा मेवा चाखीत असतात.

एका स्पॅनिश म्हणीप्रमाणें “ इंद्रियाचीं सुखें नाहींशीं होतात, हृदयाचीं सुखें दुःखरूप होतात, परंतु मनाचीं सुखें मात्र जीवनप्रवासाच्या अखेरपर्यंत आपणांस आनंद देत राहतात. ” आणि मला वाटतें कीं, मनाच्या सुखामध्यें वाचनमननादितर्केंच, किंबहुना

त्यापेक्षांहि संभाषणास जास्त महत्व आहे. जीवनांतील कठोर आघातांनीं जर्जर झालेल्या अभागी जिवाला विरंगुळा आणण्याचें उत्तम साधन म्हणजे कांहीं आनंदी, विनोदी व बोलक्या मित्रांचा सहवास. त्या ठिकाणीं त्याची चित्तवृत्ति प्रफुल्लित होईल, त्यास जीविताबद्दल एक प्रकारची आस्था वाटूं लागेल आणि तो आपलें दुःख विसरून आपल्या मित्रांबरोबर मोकळेपणानें बोलूं लागेल. कारण संभाषणास पुष्कळदां चकाट्यांचें, टवाळकीचें, किंवा बाष्कळपणाचें स्वरूप प्राप्त झालें तरी त्यांत कांहींतरी विशिष्ट जादु आहे यांत शंकाच नाहीं. आणि कोंकणांतील "गजालीन् घोव खाल्लो" (गप्पागोष्टींनीं नवरा खाल्ला) या समर्पक म्हणीचा अर्थहि हाच आहे. गणिती मापानें प्रत्येक क्षणाचें मोल पहाणारे लोक संभाषणाला कालापव्यय म्हणोत, परंतु तें एक बहुमोल परंतु निरुपद्रवी असें मनाचें विनोदन आहे यांत शंका नाहीं. सर्वव्यापी रुचीच्या, जीवनाबद्दल आदर असलेल्या, जिज्ञासु व स्नेहशील मनास समानशील मित्राच्या सहवासासारखें करमणुकीचें व आनंदाचें साधन नाहीं. कारण दयेप्रमाणेंच संभाषण हें दोन प्रकारें बहुमोल आहे. त्यामुळें स्वतःस आनंद तर होतोच. परंतु सहजासहजीं दुसऱ्यासहि विशुद्ध आनंदाचा लाभ करून देतां येतो. जन्मभर रात्रीचे दिवस करून व अपरिमित ज्ञान संपादन करून तें मनाच्या तिजोरींत आणि मूकपणाच्या व अहंकाराच्या कडीकुलपांत ठेवणारे महात्मे या भूतलावर कांहीं थोडे नाहींत; परंतु तेच ज्ञानी जर हें ज्ञानभांडार खुलें करून रसिकांस दाखवितील व त्यांच्याशीं आपल्या ज्ञानरत्नांची देवघेव करतील तर ते स्वतः जास्त संपन्न झाल्याशिवाय राहणार नाहींत.

**किर्लोस्कर**
ऑगस्ट १९३५

# देवा, मी मोठा कधीं होणार !

त्या दिवशीं मी घरांत पाऊल ठेवलें मात्र, तोंच आंतून येणाऱ्या संगीताच्या लहरींनीं माझा पुढचा मार्ग अडविल्यासारखें मला वाटलें. कारण माजघरांतील झोंपाळ्यावर आठदहा वर्षांपर्यं-तच्या पांचसहा मुली मोठ्या आवडीनें "देवा, मी मोठा कधीं, सांग होणार" हें गाणें म्हणत झोंके घेत होत्या. ऑर्केस्ट्रांतील पद्धती-प्रमाणें त्या कधीं कधीं एकदम एकसुरानें गात तर मधून मधून एकाददुसरा कोमल स्वरच "देवा मी मोठा कधीं होणार" हें कडवें मोठ्या जोरानें व उत्कटतेनें गात असलेला ऐकूं येई. कांहींहि असो, त्या गाण्यांत कांहींतरी जादू होती खास. देहभान विसरल्या-सारख्या होऊन आणि आपल्या स्वरांचें सारें माधुर्य एकवटून त्या साऱ्या मुली तें गाणें म्हणत होत्या. आणि त्यामुळें मीहि कांहीं वेळ मुग्ध होऊन दारांतच तें गाणें ऐकत उभा राहिलों.

मला वाटतें कीं त्या साऱ्या गाण्याची मोहिनी त्या मुलींच्या स्वरमाधुर्यापेक्षां त्याच्या विषयांतच जास्त होती. आणि म्हणूनच त्या मुली त्या गीताशीं इतकें तादात्म्य पावलेल्या होत्या. तो विषय ह्मणजे

साऱ्या मुलामुलींच्या आवडीचा व ध्यानींमनीं असलेला विषय. कोणत्याहि वेळीं मुलांना खेळतांना पाहिलें कीं तीं मोठ्या मंडळींचेच खेळ खेळतांना दिसून येतात. मास्तरांप्रमाणें मारतां यावें, बाबांसारखें वाटेल तसें वागावें व वेळीं अवेळीं अधिकार गाजवावा असें कोणत्या मुलास वाटत नाहीं? आणि कोणती मुलगी भातुकलीचा खेळ खेळूं लागली कीं आपल्या आईचें अगर इतर बायकांचें अनुकरण करीत नाहीं? कारण मुलांच्या अल्पवयी कल्पनाशक्तीला मोठें होणें, वाटेल तें करणें व वडिलांच्या त्रासदायक व जुलमी गुलामगिरींतून मोकळें होणें यांतच इहलोकचा स्वर्ग वाटत असतो. एकदां मी लहान असतांना मला माझ्या आजीनें मारलें आणि त्यावेळीं मला तिचा इतका राग आला कीं त्यावेळीं मी मोठा असतों व पुराणांतील ऋषींची शक्ति मला असती तर मी तिला शाप देऊन भस्म केलें असतें असें मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

परंतु ही मुलांची दृष्टी सोडून किंचित तात्विक दृष्टीनें पाहिलें तर ज्या वयांतून आपण पलीकडे गेलों त्याकडे किंचित आदरयुक्त व सकौतुक दृष्टीनें पाहण्याची दृष्टी सर्वसाधारणपणें दिसून येते. बालवयाच्या आनंदाचे व निष्पाप वृत्तीचे गोडवे गाणें हा जवळजवळ कविसंकेतच होऊन बसला आहे. वर्डस्वर्थ तर याच्याहि पुढें जाऊन असें म्हणतों कीं, मानवांतील परमेश्वरी दिव्यांशाचें तेज बाल्यावस्थेंत उघड प्रकट होत असतें आणि तारुण्याबरोबर जसजशा या कारागृहाच्या भिंती आपल्या जवळ येऊं लागतात तसतसें हें तेज अस्तंगत होत जातें. परंतु ही केवळ कविजनांचीच वृत्ती आहे असें नाहीं. किती तरी कलावंत, राजकारणी लोक अगर जीवनांत अपूर्व यश संपादन केलेले प्राणी आपल्या बाल्याकडे सस्पृह दृष्टीनें पाहून केवळ स्मृतीचें तें गतसुख भोगण्याची खटपट करीत असतात. तर

कित्येक तो बालपणांचा स्वर्ग नाहींसा न व्हावा म्हणून वाङ्मयसृष्टींत त्याची कायमची स्थापना करीत असतात. परंतु बुद्धीची अगर प्रतिभेची देणगी नसलेले सर्वसाधारण जीव काय करणार ? त्या आनंदमय बाल्याकडे आशापूर्ण दृष्टी टाकून "मज मधु बाल्यीं उतरूं दे" असें गुणगुणावें आणि कठोर वस्तुस्थितीची जाणीव झाल्याबरोबर "किति हौसेनं मारलि असति त्यांत मागुती उडी। परि दुबळी मानव कुडी ॥" असें म्हणून कपाळावर हात मारून स्वस्थ बसावें या पलीकडे त्यांच्या तरी हातांत काय आहे ?

आणि खरोखर बालवयाइतकें आनंदमय, सुखी व निरागस वय नाही यांत संशय नाहीं. कोणत्याहि बागेंत जाऊन तेथील सृष्टि-सुंदरीच्या पुष्परूपी बालकांमध्यें खेळणारीं मानवी मुलें पाहिल्याबरो-बर कितीहि कठोरहृदयी प्राणी असला तरी तो देहभान विसरतो, त्या निष्पापतेच्या व कोमलतेच्या उद्यानांत दुःखाची अगर संसार-तापाची ओझरती झळ सुद्धां लागत नाहीं. एकादी अगदीं लहान मुलांची शाळा सुटल्याबरोबर किती आनंदानें, फुलपांखरांप्रमाणें तीं गोड मुलें हांसत खिदळत व उड्या मारीत घरीं जातात. जणूंकाय जीवनोद्यानांतील पांखरांची गोड किलबिलच ती ! आणि म्हणूनच कोमल मनाचे कविराय बाल्याचें इतकें कोडकौतुक करीत असतात. आणि याकरितांच आंग्ल नाटककार बॅरी यानें पीटरपॅन ही बाल-मूर्ती निर्माण केलेली आहे. पीटरपॅन हा सहा वर्षांचा बालक म्हणजे कुमारत्वाचें, खेळकरवृत्तीचें, निष्पापतेचें व आनंदाचें मूर्तिमंत प्रतीक आहे. पीटर हा अक्षयकुमारत्वाचा वर मिळालेला बाळ आहे. तो पृथ्वीवरच्या, त्याचप्रमाणें स्वर्गांतील बालबालिकांबरोबर (fairies) खेळ खेळत असतो. तो अमर आहे आणि बालकांच्या असंख्य पिढ्या त्याच्याशीं खेळून शेवटीं वृद्धपणीं मृत्मुमुखांत पडल्या तरी

हा बाळ मात्र असाच आनंदी, निष्पाप व अल्पवयी राहणार. आणि आमच्या कवींनीं श्रीकृष्णासारख्या बाळाला देव बनविला यांतील रहस्य हेंच नाहीं तर दुसरें काय? श्रीकृष्णरूपी बालदेवानें आपल्या मुरलीच्या स्वर्गीय जादूनें गोपगोपींना व गाईवासरांना मोहविलें व शेवटीं त्यांना आत्मरूप करून स्वर्गपद दिलें यापलीकडे कोणताही कवी बाल्याची महती किती व कशी गाणार ?

पण आतां मी म्हटल्याप्रमाणें बालवयाचें कौतुक करणें व त्याचे गोडवे गाणें हा कांहीं अंशीं वाङ्मयसंकेत आहे यांत संशय नाहीं. कारण भौतिकशास्त्राच्या प्रभावानें परमेश्वरासही लाजवूं पाहणाऱ्या एकाद्या शास्त्रज्ञानें समजा उद्यां असें औषध शोधून काढलें कीं त्याच्या प्रभावानें सती अनसूयेप्रमाणें वृद्धतरुणांना पुन्हां बालरूप करतां येईल, तर कितीसे वृद्धतरुण या नव्या प्रबल ओकासाचा स्वीकार करतील याची मला जबरदस्त शंकाच आहे. परंतु एव्हढें मात्र खरें कीं कधींकधीं वृद्धमंडळींना देखील बाल्यवृत्तीचा इतका जबरदस्त झटका येतो कीं ते आपलें वार्धक्य व तदुचित असा प्रोक्तपणा विसरून बालरूप होऊन जातात.

एकदां मी व माझे कांहीं कॉलेजचे स्नेही पुण्यास एका मित्राकडे गेलों. एके दिवशीं आम्हीं सारे बालवृत्तीचे तरुण व आमच्याबरोबर कांहीं आमच्या पुणेकर मित्राच्या घरची वयस्क मंडळी फिरावयास निघालों. वाटेंत आह्मांस एक पेरूची बाग लागली. तींत आम्हीं शिरलों आणि पुष्कळसे पेरू विकत घेऊन व ते हातरुमालांत बांधून घेऊन निघालों. आमच्याबरोबरच्या वयस्क मंडळाचें ह्मणणें असें कीं आम्हीं एकादी निवांत जागा पाहून तिथें बसावें व मग पेरूंचा समाचार घ्यावा. पण आम्हांला कुठला धीर व्हायला? आम्हीं हातरुमाल सोडून आपले खिसे पेरूंनीं भरून

घेतले व रस्त्यानें चालतां चालतां पेरू खाण्यास सुरवात केली. आमच्या बरोबरच्या वृद्ध मंडळीच्या पोक्तपणाची कसोटीच होती ती. पण आमच्या पोरकटपणाचा त्यांच्यावर परिणाम झाला खास. त्यांनींहि हलकेच पेरू खाण्यास आरंभ केला. आणि आमच्या पांढरपेशा वेषा-कडे व कृतीकडे पाहून जरा आश्चर्य दाखविणाऱ्या रस्त्यावरच्या लोकांकडे बेफिकीरपणें पहात आम्ही ते सारे पेरू रस्त्यावरच संपविले.

बाल्य व वार्धक्य यांतून पुढें मागें जाण्याची इच्छा सामान्य असली तरी तारुण्य हें मात्र असें वय आहे कीं त्यांतून बाल्यांत अगर वार्धक्यांत जाण्याची कोणाहि तरुणास सहसा इच्छा होत नाहीं. तारुण्य म्हणजे आयुष्याची माध्यान्ह. त्याच्यामध्यें सकाळचें मार्दव आणि संध्याकाळवर पडणारी निशेची छाया नाहीं. कोणताहि तरुण पहा, त्याच्या बेफिकीर व उद्दाम दिसणाऱ्या मुद्रेमागें कर्तृत्व-शक्ती थोड्याफार प्रमाणांत असतेच. ब्राउनिंग कवीनें वर्णन केल्या-प्रमाणें “ One who never turned his back, but marched breast forward, never doubted clouds would break ” अशा वृत्तीनें आणि ‘नमयतीव गतिर्धरित्रीम्’ अशा वेगानें यशोमार्ग आक्रमण करीत असतो. लष्करी शिस्तीनें चालणाऱ्या एखाद्या सैनिकांच्या तुकडीकडे पहा. त्यांच्या नसानसां-तून, प्रत्येक हालचालींतून हें तारुण्य व त्याची तेजस्विताच भरलेली दिसून येईल. आणि यामुळें प्रत्येक राष्ट्र आपल्या नव्या तरुणांकडे मोठ्या आशेनें पहात असतें आणि म्हणून पुरातन कवींनीं देवांचें कल्पनाचित्र रंगवितांना देवांना अमर व अजर तर केलेंच पण ते तेजस्वी, सर्वशक्तिमान्, सुंदर, जिरंजीव, तरुण आहेत असें त्यांचें वर्णन केलें. व ज्या कल्पनेनें हें देवांचें चित्र रंगविलें तिच्यापुढें त्या

त्या देशांतील कार्यकर्ते, उत्साही व तेजस्वी तरुण आदर्शवत् होते यांत नवल तें काय ?

परंतु अतिमानव निर्माण करूं पाहणारी नवी शास्त्रीय बुद्धी या कल्पनेच्या खेळांना फारशी किंमत देत नाहीं. या बुद्धीला पृथ्वीचा स्वर्ग बनवावयाचा आहे. आणि या अतिमानुषतेचा प्रणेता आधुनिक मुनी बर्नार्ड शॉ जोरानें व अधिकारवाणीनें असें म्हणतो कीं, या विश्वांत संचार करणाऱ्या व मानवी जीवनाला व उत्क्रांतीला आधारभूत असलेल्या जीवनशक्तीच्या ( Life-force ) जोरावर आम्हीं देवमानव (Superman ) निर्माण करणार. हा अतिमानव वाटेल त्या क्षणीं अंड्यांतून बाहेर येऊं शकेल. म्हणजे त्यास बाल्या-वस्थेंतील व कौमार्यांतील विकासावस्थेची वाटच पहावयास नको. तो तरुणरूपानेंच या विश्वांत प्रवेश करील आणि तीनशें वर्षेपर्यंत आपलें तारुण्य टिकवूं शकेल आणि त्यामुळें आज आपल्या वयो-मर्यादेमुळें मानवी कर्तृत्वास वाव मिळत नाहीं अशी जी तक्रार आहे तीस मुळींच जागा राहाणार नाहीं.

पण तारुण्य व बाल्य यांचा उदोउदो करणाऱ्या कलावंतांचें वार्धक्याकडे अगर ‘ दुसऱ्या बाल्याकडे ’ फारसें लक्ष जात नाहीं. सुदैवानें आजच्या वृद्धांची सारे तरुण आपली उपेक्षा करतात अशी जी तक्रार आहे तिला कांहीं काळानें महत्त्व राहणार नाहीं. कारण आधुनिक आंकडेशास्त्रज्ञांवर विश्वास ठेवावयाचा असल्यास हिंदु-स्थानची सर्वसाधारण वयोमर्यादा २५ च्या आंतबाहेर आहे. आणि त्यामुळें अशी स्थिती राहिल्यास वृद्धमाणसेंहि पुढें येणाऱ्या देवमाणसां-प्रमाणेंच कौतुकाचे विषय होतील व त्यांची आबाळ होणार नाहीं.

मानवाच्या बाल्यतारुण्यादि अवस्थांचा हा विचार करतांना पुराणांत वर्णन केलेल्या वय व लिंग बदलण्याच्या अद्भुत किमयेची

आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. शिखंडीनें ज्या किमयेनें आपलें स्त्रीत्व एका गंधर्वाला देऊन त्याचें पौरुषत्व बदलून घेतलें तिच्याशीं आपणांस आज कर्तव्य नाहीं. तथापि ययातीनें आपली भोगेच्छा पुरी करण्याकरितां वार्धक्यामध्यें जी वयाची अदलाबदल केली तिची मात्र आठवण या ठिकाणीं झाल्यावांचून रहात नाहीं. ययातीचें वार्धक्य आपण घेऊन मोठ्या उदार अंतःकरणानें त्याचा पुत्र पुरु यानें आपलें तारुण्य आपल्या बापास दिलें अशी ती कथा आहे. आधुनिक शास्त्रज्ञ वृद्धावस्था समूळ नाहींशी करण्याच्या उद्योगांत असल्यामुळें ही कथा कांहीं वर्षांनीं अर्थशून्य व जीर्ण होईल यांत शंका नाहीं. परंतु आज मात्र ही ययातीची किमया जर हस्तगत होईल तर या जगांत नवीन शक्ती आल्यासारखी होईल. कारण तिच्या प्रभावानें अनेक प्रतिभाशाली व कर्तृत्ववान् वृद्धांना तारुण्याचा पुनर्लाभ करून देतां येईल व त्यामुळें त्यांच्या हातून केव्हढें तरी समाजकार्य होईल. अर्थात् या वृद्धांकरितां आपल्या तारुण्याची अदलाबदल करणारे आधुनिक पुरु किती मिळतील याची शंकाच आहे. परंतु राष्ट्राच्या साऱ्या जीवनावर अमर्याद सत्ता चालविणाऱ्या एकाद्या नव्या हिटलरच्या अगर मुसोलिनीच्या अधिकारावर ही गोष्ट सोंपविली कीं या अडचणीचा विचार करण्याचें कारणच पडणार नाहीं. कारण त्यांच्याकडे अधिकार येतांच ते असा वटहुकुम काढतील कीं ज्या २५–३० वर्षांपर्यंतच्या तरुणांनीं कोणतीच कामगिरी केलेली नाहीं त्यांनीं आपलें तारुण्य बुद्धिवान् व कर्तबगार वृद्धांना दिलेंच पाहिजे. या योगानें या नवतरुण वृद्धांकडून देशाच्या प्रगतीचें कार्य तरी होईल किंवा आपलें तारुण्य जाईल या भीतीनें सारे उनाड चैनी तरुण कांहीं कार्य करण्याच्या मार्गाला तरी लागतील.

परंतु हा जुलमी योजना मला जशी फारशी पसंत नाहीं तशी ती माझ्यासारख्या इतर तरुणांसही मुळींच पसंत पडणार नाहीं. कारण ही अनियंत्रित सत्ता गाजविणारे नवे राष्ट्रसूत्रधार कांहीं झालें तरी स्पार्टाच्या Elders प्रमाणें वयोवृद्धच असणार आणि ते तरुणांच्या तक्रारींचा कितीसा सहानुभूतीपूर्वक विचार करतील याची मला शंकाच वाटते. म्हणून तरुणांवर हा अत्याचार करण्यापेक्षां जर दुसरी कोणती तरी सौम्य उपाययोजना केली तर ती सर्वमान्य होईल असें मला वाटतें. मानवी जीवनाची, वयाची, शक्तीची व बुद्धीची किल्ली हस्तगत करून घेण्याकरितां शास्त्रज्ञ झटत आहेतच. अतिमानुषत्वाची सर्वप्रिय योजना त्यांनीं पुढें मांडली आहेच. आणि या योजनेबद्दलचा शास्त्रज्ञांचा आशावाद व उत्साह इतका जोरदार आहे कीं माझ्या समजुतीप्रमाणें आमच्या घरांमधून पुढल्या एकदोन पिढ्यांनंतर अतिमानव मुलेंबाळें खेळूं लागतील. परंतु या शास्त्रज्ञांस माझी अशी नम्र विनंति आहे कीं त्यांनीं आपल्या बुद्धीप्रभावानें या अतिमानुषांमध्यें बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तीन्ही अवस्थांमध्यें दिसणाऱ्या गुणांचें संमीलन करावें. अतिमानव बुद्धिवान् व तेजस्वी असणारच, पण मग त्याबरोबर त्याच्या अंगांत बाल्याचें निष्पाप मन व आनंद, तारुण्याची धडाडी व उत्साह आणि वृद्धांचें अनुभवशुद्ध ज्ञान, प्रशांतता व अधिकार या गुणांचें यथायोग्य मिश्रण दिसून येईल. पण हे कांहीं झालें तरी कल्पनेचे खेळ. यापेक्षां विद्यमान स्थितींतच राहून आम्हांला असा प्रयत्न नाहीं का करतां येणार कीं ज्यामुळें आपण तरुण व वृद्ध असलों तरी बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तिन्ही अवस्थांतील गुणांचा स्वरसंगम आपल्या जीवनांत करतां येईल ?

**किर्लोस्कर**, मे १९३९

# आवड–निवड

क्रिकेटचा चौरंगी सामना अगर एम्. सी. सी. टीम, किंवा ऑस्ट्रेलियन खेळाडू यांसारख्या क्रिकेटपटूंची भेट, अशा प्रसंगीं, मुंबई-सारख्या क्रीडाप्रिय शहरांत आनंद, उत्साह व तारुण्य यांची किती लयलूट होत असेल हें मीं सांगावयास हवें असें नाहीं. अशाच एका प्रसंगीं—तो चौरंगी सामन्यांतील हिंदुमुसलमानांचा अगदीं चुरशीचा शेवटचा डाव होता—मी मोठ्या उत्कंठेनें क्रीडांगणाकडे चाललों होतों. ट्रॅम स्टँडवर येण्यापूर्वींच एका क्षेत्ररक्षक खेळाडूसहि शोभणाऱ्या चपळाईनें व हुषारीनें मी ट्रॅममधील एक जागा पकडून तीवर मोठ्या ऐटीनें सुखासीन झालों होतों. आमच्या ट्रॅममध्यें त्या वेळीं त्या दिवसाच्या मॅचशिवाय दुसरा कसला विषय असणार? सारे उतारू त्या दिवसाच्या खेळाचें अचूक भविष्य मोठ्या अधिकारपूर्ण वाणीनें वर्तवीत होते. नायडू किती धांवा काढणार, निसारांची गोलंदाजी किती जोरदार होणार, मर्चंट फॉर्ममध्यें आहे कीं नाहीं, इत्यादि सर्व अत्यंत महत्वाच्या प्रश्नांचा खल मोठया आस्थेनें, जोरजोरानें पण पूर्ण खिलाडू वृत्तीनें चालला होता. इतक्यांतच

माझ्या समोरच्या बांकावर बसलेल्या एका गृहस्थाच्या तोंडून "काय हो, ही वीसपंचवीस हजार मंडळी या दहापंधरा खेळाडूंकडे तासांचे तास रिकामटेकड्याप्रमाणें बघत बसतात याचें मला मोठें नवल वाटतें. तुम्हांला नाहीं हा वेडेपणा वाटत? मी फुकट देखील क्रिकेटची मॅच पाहाणार नाहीं." असे उद्गार बाहेर पडले. हा गृहस्थ मध्यम वयाचा, विलायती थाटाचा पोषाख केलेला, पण गबाळच दिसत होता व त्याच्या हातांत एक बॅग होती. तो आपल्या शेजारच्या वकिलाशीं बहुतेक क्रिकेटच्याच गोष्टी करीत असावा व त्या बोलण्यांतच त्याच्या तोंडून वरील उद्गार सर्वांना ऐकूं जातील इतक्या जोरानें आले होते.

वरील शब्द कानांत पडल्याबरोबर आम्हां क्रिकेटप्रेमी मंडळींत एकादा कुलपी गोळा पडून फुटावा त्याप्रमाणें आमची स्थिति होऊन, आम्ही सारेजण त्या गृहस्थांच्या जोडीकडे पाहूं लागलों. त्या पहिल्या गृहस्थाचा आह्मां सर्वांना राग आला हें सांगावयास नकोच. माझ्यामागें बसलेला एक अगदीं विसाव्या शतकांतला तरुण तर 'कोणीतरी पढतमूर्ख आहे झालें!' असें आपल्या सोबत्यास हलकेंच म्हणाला. परंतु सभ्यपणाच्या मर्यादा सोडून त्या क्रिकेटद्वेष्ट्या गृहस्थास त्याच्याविषयीं आपणांस काय वाटतें हें सांगण्यास इतर उतारूंना संधीच मिळाली नाहीं. कारण इतक्यांतच क्रीडांगणासमोरचें ट्रॅमचें नाकें आल्यामुळें ट्रॅममधूनच उड्या मारून कित्येक अत्यंत उत्साही तरुण रणांगणाकडे आवेशानें धांवणाऱ्या सैनिकाप्रमाणें मैदानाकडे धांवूं लागले. मीहि त्या ठिकाणीं उतरलों. पण ट्रॅम पुढें चालूं लागतांच मी त्या गृहस्थाकडे पाहिलें, तों तो महात्मा आह्मां सर्व मंडळींकडे बोट दाखवून अत्यंत कुचेष्टेनें हंसत होता.

आतां मात्र मला त्याची अत्यंत चीड आली. आणि प्रिय वाचकहो, त्याबद्दल तुह्मी मला दोष देणार नाहीं अशी आशा आहे. 'भिन्नरुचिर्हि लोकः' या वचनाप्रमाणें मला जें आवडतें, तें दुसऱ्यास मुळींच आवडत नसेल, परंतु आपणाला आवडत नाहीं अशी कोणतीहि गोष्ट दुसऱ्यास अत्यंत आवडते ह्मणून त्याची कुचेष्टा करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? एकादा निग्रो आपल्या कृष्णवर्णी रूपवती प्रियतमेवर निस्सीम प्रेम करतो, अगर एखादी आई आपल्या वेड्याविद्र्या शेंबड्या पोराचें कौतुक करते, किंवा एखादा तरुण क्रीडांगणांतच इहलोकचा स्वर्ग मानतो. परंतु त्याकरितां जर कोणी त्यांना हंसूं लागला तर तें त्याच्या स्वतःच्या विकृत मनोवृत्तीचेंच प्रदर्शन होईल. कारण माणसांच्या आवडीचें मोजमाप, प्रमाण किंवा त्याचा निकष अजून कोणीं शोधून काढलेला नाहीं. आपल्या कुरूप पत्नीला नेहमीं चौपाटीवर फिरावयास घेऊन येणाऱ्या आमच्या परिचयाच्या एका गृहस्थाकडे पाहून माझा एक मित्र एकदां ह्मणाला, "काय रे, हिला बरोबर घेऊन फिरतांना याला चमत्कारिक कसें वाटत नाहीं?" मीं त्यावर उत्तर केलं, "हा तुझ्या आवडीचा प्रश्न नाहीं; तिच्या नवऱ्याच्या आवडीचा आहे.' यावर त्या माझ्या मित्राचें तोंड मिटलें हें सांगावयास नको!

परंतु कोणास काय आवडावें आणि आपल्या आवडीमध्यें कोणत्या दर्जाची अभिरुचि व्यक्त होते, हा मतभिन्नतेचा प्रश्न बाजूस ठेवला तरी प्रत्येकास असें कबूल करावें लागेल कीं, आपल्या जीवनांत आवडीला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. आवडीच्या पायऱ्या कोणीहि आवड, हौस, नाद, छंद, प्रेम, वेड, याप्रमाणें हव्या तशा लावाव्या; परंतु ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं सुखदुःख, आनंद, ध्येय, प्रीति, इत्यादि गोष्टींचें जीवनांत जें महत्व तेंच आवडीचें

आहे. आपल्या जीविताच्या सुखपूर्णतेचे अगर आनंदाचे कवींनीं कितीहि गोडवे गाइले तरी त्याचा दुःखदायक व निराशाजनक असा एक अत्यंत आवश्यक भाग आहे ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाचीच आहे. परंतु ज्या भिन्नभिन्न गोष्टींनीं पुष्कळदां अगदीं कटु वाटणाऱ्या जीवनास आपण अत्यंत मधुर अशी गोडी आणतों त्यांत आवडी प्रमुख होत. प्रत्येकानें आपल्या भोंवतालच्या स्नेह्यांच्या जीविताकडे किंचित् चिकित्सापूर्वक पाहिलें तर त्याला सहज असें दिसून येईल कीं, ते स्नेही आपल्या स्वतःच्या आयुष्यांतील अपुरेपणा, वैगुण्य अगर निराशा यांच्या कठोर धारा कोणत्या तरी आवडींनीं पूर्णपणें बोथट करून टाकीत असतात. किंवा या विषयाकडे आशापूर्ण दृष्टीनें पहावयाचें असल्यास मी असें म्हणेन कीं, आपल्या जीवनांत सांपडणारीं आनंदस्थानें अगदीं अपुरीं वाटल्यामुळें कीं काय, ही मंडळी वेगवेगळ्या नादांनीं अगर आवडींनीं आपल्या जीवितांत अधिक आनंद, व उत्साह उत्पन्न करीत असतात.

कित्येकांना नुसत्या वाचनांत वारुणीची मादकता सांपडते, तर कित्येक पोस्टाचीं तिकिटें, नाणीं, चित्रें, पोथ्या, काठ्या, ग्रंथ, इत्यादिकांचा संग्रह करून तद्वारां आपण केवळ आनंदाचाच नव्हे, तर पुण्याचाहि संचय करून ठेवीत आहों अशासारखी वृत्ति ठेवीत असतात. असला नाद असलेल्या कोणत्याहि गृहस्थाकडे तुम्हीं जा, तो तुमच्याशीं आपल्या विशिष्ट आवडीविषयीं बोलल्याशिवाय व आपल्या आनंदाचे कांहीं घुटके तुह्मांस आपल्या चहाबरोबर पाजल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं. तो आपल्या तिकिटांचा अगर नाण्यांचा संग्रह तुह्मांस दाखवील, तुम्हीं त्याचें कौतुक करावें अशी अपेक्षा करील व तुह्मांलाहि त्यांत आनंद वाटतो कीं नाहीं हें मोठ्या उत्कंठेनें पहात राहील.

माझ्या माहितीच्या एका गृहस्थाला आपल्या गांवच्या जुन्या इतिहासाबद्दल माहिती गोळा करण्याचा अत्यंत नाद होता. कोणीहि नवा गृहस्थ कोणत्याहि कारणानें या गृहस्थाकडे गेला कीं शेवटीं त्याच्या आवडत्या विषयावर बोलणें यावयाचें, आणि मग त्या गृहस्थास अगदीं आस्थापूर्वक आपल्या गांवच्या इतिहासाची सारी माहिती सांगावयाची, अशी त्यास संवय जडलेली होती. अर्थात्च जीवन हें यंत्रवत् आहे अशा वृत्तीनें चालणारे अगर अल्पसंतोषी लोक या गृहस्थास शुद्ध वेडा ह्मटल्याशिवाय राहणार नाहींत यांत मला मुळींच संशय वाटत नाहीं. परंतु या अगदीं क्षुल्लक दिसणाऱ्या आवडीपासून त्या गृहस्थास किती आनंद मिळत असेल याची त्यांना काय कल्पना ? त्यांच्या व्यावहारिक दृष्टीला असल्या आवडींत वेळ व पैसा यांचा व्यय करणें यांत मूर्खपणाच दिसत असतो. आणि ते ह्मणतात कीं, यापेक्षां हा वेळ अधिक पैसा मिळविण्यांत घालविला आणि आपल्या गृहिणीची बऱ्याच दिवसांची दागिन्यांची एकादी मागणी पुरविली अगर तो बँकेंत जमा केला तर अधिक चांगलें नाहीं काय ?

या व्यवहारचतुर गृहस्थांना फारसा दोष द्यावयास मी तयार नाहीं. कारण त्यांची दृष्टि त्यांच्या छोट्या संसाराच्या चार भिंतींच्या पलीकडे जाऊंच शकत नाहीं. मग त्यांना हौसेला अगर आवडीला किती अपरिमित मोल असतें याची काय कल्पना असणार ! त्यांना ही गोष्ट माहीत नसते कीं, मानवी अंतःकरणांत कोठेंतरी अतृप्त अशी प्रेमज्योति असते, आणि ती पूर्णतेकरितां अगर ऐक्याकरितां धडपडत असते. परंतु त्याखेरीज त्या अंतःकरणास विरंगुळाच वाटत नाहीं. जॉर्ज इलियटच्या 'सायलस मार्नर' या कादंबरींत लेखिकेनें हेंच सत्य फार सुंदर रितीनें दाखविलें आहे. सायलस

हा सर्व जगानें टाकलेला व मानवजातीस वैरी समजणारा एक मनुष्य असून एके दिवशीं त्यास अकस्मात् एक मोठी रक्कम सांपडते. त्या दिवसापासून तो कवडीचुंबक बनतो आणि द्रव्यप्रीति हेंच त्याच्या जीविताचें इतिकर्तव्य होतें. परंतु सोन्याच्या आवडीच्या पलीकडील अगदीं विशुद्ध व निःस्वार्थी असें जें प्रेम त्याबद्दलची त्याची भूक शांत होण्याची संधि यानंतर लवकरच त्याच्या जीवितांत येते. कारण एक दिवस कोणीतरी त्याच्या झोंपडींत एक अनाथ अर्भक ठेवून जातें. आणि त्या मातृहीन मुलीच्या रडण्यानें त्याच्या अंतःकरणांत एका नव्या प्रीतीचा उदय होतो आणि तो त्या मुलीचा आजन्म पालक व गुलाम होतो. हा प्रसंग म्हणजे सायलसचा नवा जन्मच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण तेव्हांपासून त्याचें जीवन आनंद व प्रेम यांनीं अगदीं परिपूर्ण होऊन जातें.

आपण कसलीतरी गोड हौस अथवा नाद असलेल्या गृहस्थाकडे पहा. कोणास संगीताची आवड, कोणास चित्रकलेची, तर कोणास शारदोपासनेची. किती आनंदी वृत्ति असते त्याची ? जीवन किती हलकें वाटतें त्यांना ? आणि त्यांच्या उत्साहाचा झरा किती जोरानें वर उसळत असतो ? आणि जर स्वत्वाच्या किंचित् वर जाऊन याच लोकांनीं आपल्या आवडीनिवडीला थोडें सार्वजनिक स्वरूप दिलें तर समाजाचें किती हित होतें ? तुकारामासारख्या संतांना विठ्ठलभक्तीची आवड वाटली; अकबराला विश्वधर्मसंस्थापनेचीं सुखस्वप्नें पडूं लागलीं; महात्माजींना हरिजनसेवेचें वेड लागलं; आणि अगदीं अलीकडे बॅ. सावरकर व माधव ज्यूलियन् यांना मराठी भाषेच्या शुद्धीकरणाचा नाद लागला आहे. या थोर लोकांच्या या नादीपणाला अजूनहि पुष्कळ लोक वेड हें नांव देतात. हें वेड तर खरेंच, पण किती सुंदर वेड हें ! राजवाडयांनाहि जुने कागद

व पत्रें गोळा करण्याचें अशाच प्रकारचें वेड लागलें होतें. पण त्या रद्दींत किती बहुमोल ऐतिहासिक रत्नें त्यांच्या हाताला लागलीं! लॉर्ड बेडन पॉवेल यांनीं सेवानिवृत्त झाल्यानंतर बालवीर चळवळ सुरू केली. वरच्यासारखें वेडच हें आणि प्रथम प्रथम त्याची कुचेष्टा झालीच. परंतु या सर्व नादी लोकांच्या वेडांतून समाजाची किती प्रगति झाली? कारण कांहीं झालें तरी हें वेड सामान्य लोकांचें नव्हतें. त्याच्या बुडाशीं, कर्तृत्वशक्ति, मनाचा थोरपणा व तेजस्वी चिकाटी यांचा भक्कम पाया होता; आणि त्या वेडांत हॅम्लेटच्या वेडाप्रमाणें एक प्रकारचा व्यवस्थितपणाहि होता. मग त्या वेडास वेड कोण म्हणेल?

परंतु आवडीचें अधिक गोड पण किंचित् वेगळ्या प्रकारचें स्वरूप पाहावयाचें असेल तर तें कलाविलासांत आपणांस दिसून येईल. आवड ही कधीं स्थिर नसते व मानवी स्वभावाच्या लहरीं-प्रमाणें ती पालटते, आणि ह्मणूनच आपणांस पुष्कळदां रुचिवैचित्र्य दिसून येतें. कला ही तर अगदीं फुलपांखरासारखी आहे. तिचें सर्वात्मक असें स्वरूप तुम्हांस कधींच सांपडणार नाहीं. ह्मणूनच ती एके ठिकाणीं काव्यसंपदा निर्माण करते, दुसरीकडे चिताऱ्यांच्या कुंचल्यांतून नवी सृष्टि रंगविते, क्वचित् संगीतब्रह्मानें हें विश्व भरून टाकते, तर कुठेंकुठें कुशल शिल्पकारांकडून जीवनाचा आनद प्रकट करविते. परंतु असा आदर्श कलावंत कुठें आहे कीं, जो या साऱ्या कलांचा स्वतःच्या ठिकाणीं स्वरसंगम करवून कला-सृष्टि निर्माण करील? कारण कला ही जशी गुलामांप्रमाणें कलावंताची सेवा करते तशी ती त्यांच्याकडून सेवाही करवून घेते. नुसत्या कलेच्या आवडीनें कलेची सेवा होत नाहीं. तिच्याकरितां जीवनसर्वस्व वेंचावें लागतें, अथवा तिचें वेड लागावें लागतें.

एकदा प्रेमी जीव एखाद्या कठोर सुंदरीच्या प्रेमानें वेडा होऊन निराशेंत आत्महत्या करतो तेव्हां आपण त्याच्या हळव्या मनाची अगर प्रेमाच्या वैचित्र्याची कींव करतों. परंतु कलेचें वेड लागलेल्या कलावान् लोकांबद्दल आपण इतकी सहानुभूति कधींच दाखवीत नाहीं. प्रत्यक्ष उपासमार होत असतांहि उदरनिर्वाहाचे राजमार्ग सोडून काव्यसंपदा वाढविणारे महाकवि, क्षुद्र जनरुचीला न जुमानतां उत्कृष्ट संगीताची अगर चित्रकलेची निर्मिति करणारे मिलेट-सारखे कलावंत आणि 'नवी दृष्टि, नवी सृष्टि व नवी तुष्टि' यांच्याकरितां आपल्या प्रतिभेनें नवें वाङ्मय निर्माण करणारे वाग्भट यांना प्रथम लोक वेडे म्हटल्यावांचून रहात नाहींत. परंतु त्यामुळें त्यांच्या कलोपासनेंत कधींहि व्यत्यय येत नाहीं. कारण 'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' हीच आपल्या कार्याच्या बाबतींत त्यांची दृष्टि असते. मग याला कोणी ध्येयवाद म्हणोत, कोणी कलोत्कटता अगर प्रतिभा म्हणोत. परंतु ही गोष्ट सत्य आहे कीं कलांची पराकोटीस गेलेली आवड, नाद, छंद अगर वेड यांतूनच कलांची उत्पत्ति, जोपासना आणि वाढ होत असते. ही आवड नसती तर कीट्स्सारख्या वैद्याच्या हातून उत्कृष्ट काव्य अगर कॉनराडसारख्या नाविकाकडून उत्कृष्ट कादंबरीवाङ्मय निर्माण झालें नसतें. तसें नसतें तर कै. कोल्हटकरांसारखे वकील आपला साहित्यसंसार थाटूं शकले नसते, अगर खांडेकरांसारखे पंतोजी आपली कलासृष्टि निर्माण करण्याऐवजीं विद्यादानच करीत राहिले असते.

परंतु कोणतीहि कला तिच्या वेडाशिवाय विकसित होत नाहीं, हा नियम कलावंतांना लागूं असला तरी सर्वसामान्य लोकांना मात्र तो लागूं होत नाहीं. कारण सर्वसामान्य लोक आपल्या आवडीला कोणत्याहि एका विषयावर संकुचित करण्यापेक्षां तिला जितकें जास्त

विस्तृत क्षेत्र देतील तितकें चांगलें. अर्थात् प्रत्येक माणसास सर्वच कांहीं आवडतें असें नाहीं. परंतु आपणांस पुष्कळदां अप्रिय गोष्टींत देखील अभिरुचि उत्पन्न करून घेतल्यावांचून चालतच नाहीं.

या ठिकाणीं माझ्या माहितीच्या दोघां गृहस्थांची मला आठवण होते. यांतील एक अत्यंत विद्वान प्रोफेसर होते. परंतु टेनिस वगैरे खेळांबद्दल त्यांस कुतूहल तर नव्हतेंच; पण त्यांचें त्यांविषयींचें अज्ञान अगदीं वाखाणण्याजोगें होतें. परंतु त्यांना अगदीं आजतागायत (up-to date) होण्याची मोठी महत्वाकांक्षा. आणि ते गृहस्थ जिकडे जात तिकडे बहुतेक खेळाच्याच गोष्टी. शेवटीं स्वारीनें आपल्या विषयाप्रमाणें क्रीडाविषयांतहि तज्ञ होण्याचें ठरविलें. पुष्कळशा मॅचिस् पाहिल्या आणि साऱ्या खेळांची सारी शास्त्रोक्त माहिती मिळविली. आणि आतां तर खेळांच्या बाबतींत ते मोठे खांसाहेब झाले आहेत.

दुसऱ्या गृहस्थांना नेहमीं फिरतीवर जावयाचें असे आणि त्या ठिकाणीं त्यांनीं पाहिलें कीं, ब्रिज् आल्याशिवाय आपल्या कुठेंहि ओळखी होणार नाहींत. पण त्यांना पत्त्यांचा मनस्वी वीट वाटत असे आणि ब्रिज् म्हणजे त्यांस मोठें गूढच वाटे. पण शेवटीं बसले एकदां ब्रिज् शिकायला. हळुहळु त्यांस गोडी वाटूं लागली आणि मग ते त्याचे जवळजवळ चँपियनच बनले. याप्रमाणें जरी पुष्कळदां आपणांस कित्येक गोष्टींचा वीट वाटला, तरी कुतूहलानें, अभ्यासानें आणि बळजबरीच्या का होईना पण आवडीनें, आपणांस त्यांविषयीं अभिरुचि उत्पन्न करून घेऊन त्यांचा आनंद अनुभवतां येतो. आणि जितक्या आपल्या आवडी जास्त व विविध, तितकें आपणांस जीवनांत अधिक नाविन्य आणि वैचित्र्य सांपडत असतें. चित्रकला, वाङ्मय, खेळ, राजकारण, धर्म, शिक्षण, संगीत, वगैरे अनेक

विषयांची आवड असणारी मंडळी जर एकत्र जमा झाली आणि त्यांचें बोलणें सुरू झालें तर त्यांत किती मजा येत असेल ? आणि किती लीलेनें ते साऱ्या विश्वास गवसणी घालीत असतील ? हा आनंद एकाच विषयांत मुरब्बी झालेल्या तज्ञ लोकांना, त्यांनीं कितीहि प्रयत्न केला तरी, कधींतरी अनुभवतां येईल काय ?

यावर कोणी असा आक्षेप घेईल कीं, मानवी मन ह्मणजे तुम्ही असा एकादा अजबखाना समजतां कीं काय, कीं ज्यांत वाटेल ती चीज सांठवतां येईल ? सध्यां वैशिष्ट्याचे दिवस आहेत. कोणत्याहि एका विषयाच्या एका शाखेंत देखील पुरी प्रवीणता मिळविण्यास आज आपला जन्म पुरा पडणार नाहीं. अशा वेळीं तज्ञ होण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं जर फुलपांखराप्रमाणें आपण या विषयावरून त्या विषयावर उड्या मारूं लागलों तर विद्वत्तेला अगर ज्ञानोपासनेला अवसर कसा मिळेल ? आम्हीं वेदवेदांगांत प्रवीण आहों, मराठा-मोंगल इत्यादि इतिहासांचें कानेकोपरे आम्हांस माहित आहेत, परराष्ट्रीय व हिंदी राजकारणाच्या गुंतागुंतींतून आम्हीं सुखेनैव तुम्हांस नेऊं, सोन्याचांदीच्या लढाया व अर्थशास्त्राच्या भानगडी आम्हांस करतलमलवत् आहेत, अगदीं शंभर टक्के समाजसत्तावाद अगर फ्रॉइडचे ऊनऊन सिद्धांत यांचा आम्हीं शास्त्रशुद्ध अभ्यास केला आहे; परंतु हा आमचा तज्ञपणा त्या त्या विषयापुरताच आहे. कारण केवळ एका विषयालाच आम्हीं आमचें जीवन वाहिलें आहे.

या वैशिष्ठ्यवाद्यांना मी म्हणेन कीं, महाभागहो, तुमच्या थोरपणाची जाणीव मला आहे. तुमचें ज्ञानार्जन ही अत्यंत पवित्र गोष्ट आहे व निष्काम वृत्तीनें वागून ज्ञानसाम्राज्याच्या सीमा दूरदूर नेण्याचें तुमचें कार्यदेखील अत्यंत थोर व आदरणीय आहे. हें ध्येय पुढें ठेवून ज्ञानोपासना करणाऱ्या तुम्हां आचार्यांना कोण वंदनीय

मानणार नाहीं ? परंतु सर्वसाधारण माणसाचें काय ? त्याचें जीवन किती अत्यल्प आणि त्याच्या मर्यादादेखील किती संकुचित ? एकाद्या विषयाच्या मागें लागून त्यांत पारंगतता मिळविण्याइतकी बुद्धिमत्ता, चिकाटी आणि परिस्थिति देखील त्यांची नाहीं. ज्ञानदीपावर एकसारखी झडप टाकून त्यांत आपल्या जीविताचा महायज्ञ करणारा तो जीव नाहीं, तर जगाच्या बागेंत फिरणारें तें एक फुलपांखरूं आहे. आणि म्हणून या उद्यानांतून जितका अधिक मकरंद व आनंद तो मिळवील तितकें त्याचें जीवन अधिक परिपूर्ण व उत्साही होईल. याकरितां संसार सोडावयास नको अगर आपल्या कुटुंबियांची उपेक्षाहि करावयास नको. थोडी चिकित्सात्मक व उत्साही वृत्ति आणि मोकळें मन यांच्या जोरावर त्यास आपल्या जीवनांत कितीतरी अधिक आनंदाचा लाभ करून घेतां येईल.

किर्लोस्कर
मे १९३६

# निंदकाचें घर

आमचे मित्र हरिभाऊ त्या दिवशीं अगदीं तावातावानें बोलत होते. त्यांच्या घरांत कांहीं अंतस्थ कलह चालू होते आणि आमचें गांव म्हणजे कांहीं मोठें शहर नसल्यामुळें गांवकुटाळ लोक त्याची मोठ्या संभावितपणें चर्चा करीत होते. परंतु एव्हढ्यावरच न थांबतां त्यांतील फाजील शाहाण्या दोघांचौघां गांवकरांनी हरिभाऊंना भर बाजारांत गांठून या बाबतींत उघडपणें विचारलें देखील. पण हरिभाऊंनी त्यांच्या चौकशीला उत्तर न देतां त्यांपैकीं एकाच्या थोबाडींत एक चांगलीच ठेवून दिली होती.

या प्रसंगानंतर घरीं न जातां ते परस्पर आमच्या घरीं आले व या आचरट गांवकुटाळांवर व्याख्यान देण्यास त्यांनीं एकदम सुरवात केली. ते म्हणाले, 'आमच्या घरांत काय चाललें याची यांना कोणी उठाठेव सांगितली? आम्ही आमच्या घरांत वाटेल तें करू. तुम्ही आम्हांला विचारणार कोण! आम्हीं कांही तुम्हांला असें करा, तसें करा, असें सांगत नाहीं. आम्ही आपले सीधे माणूस. कोणाच्या आल्यागेल्यांत नाहीं. तरी या लोकांचा

त्रास आहेच. आम्ही कोणाचे दाम घेतले किंवा कोणाची निंदा किंवा कुटाळकी केली तर विचारा आम्हाला. उगीच नसता त्रास कां देतां? इत्यादि इत्यादि' मी वाचकांना हें सारें व्याख्यान ऐकवूं इच्छीत नाहीं. हरिभाऊ खरोखरीच अगदीं गरीब व सीधे माणूस होते. परंतु त्यांच्या शब्दांत या वेळीं सात्विक संताप, आवेश व अपमानाची तीव्र जाणीव या गोष्टी अगदीं स्पष्ट दिसत होत्या. त्यांना कित्येक दिवस मी चांगला ओळखत होतों व त्यामुळें या सरळ वृत्तीच्या गृहस्थाची व्यर्थ कुटाळकी करून त्यांस त्रास देणाऱ्या या गांववाल्यांचा मला अतिशय राग आला. आणि हरीभाऊस ओळखणाऱ्या कोणाहि माणसास तसा राग आला असता.

"निंदकाचें घर असावें शेजारीं" अशी इच्छा तुकारामानें कोणत्या अनुभवाच्या आधारावर प्रगट केली आहे, तें समजणें कठीण आहे. कारण खुद्द तुकारामास आपल्या केवळ शेजाऱ्यापाजाऱ्यांचाच नव्हे तर साऱ्या गांवाचा चांगलाच अनुभव होता. आणि आपल्यासारख्या विरागी माणसासहि जर लोक सळो कीं पळो करून सोडतात तर एखाद्या सीध्या संसारी प्राण्यास ते किती जर्जर करून सोडीत असतील याची त्यास पुरी कल्पना होती. परंतु दुसऱ्या एका अभंगांत निंदकाचें गुणवर्णन करतांना तो म्हणतो कीं,

'निंदक तो परउपकारी। काय वर्णू त्याची थोरी
नेघे मोल धुतो फुका। पाप वरच्यावरी देखा'

तुकारामाचे हे बोल खरे असले तरी ते सर्वसामान्य माणसांना पटणारे नाहींत. कारण तुकारामासारखे संन्यासीवृत्तीचे कांही लोक वगळले तर दुसरा कोण मनुष्य निंदकांना आपल्या मनाचे व आचरणाचे धोबी अगर आपल्या नीतिमत्तेचे सूत्रधार करावयास तयार होईल? आमच्या हरिभाऊच्या अनुभवाप्रमाणें निंदक लोक

आपले केवळ दोषच दाखवितात असें थोडेंच आहे. त्यांना विषय लागत नाहीं व स्थळ काळ ही लागत नाहीं. कोणाहि व्यक्तीस ( आणि ती जितकी निरुपद्रवी असेल तितका त्यांचा जोर अधिक ) लक्ष्य करून तिच्यावर वेळींअवेळीं आपल्या विषारी वाणीचा प्रहार करावयाचा एवढेंच ते जाणतात. आणि म्हणूनच " दुर्जनं प्रथमं वंदेत् " या वचनानुसार सामान्य लोक निंदकापासून शक्य तों दूर राहतात व त्यांची सावली देखील आपल्यावर पडूं न देण्याची खबरदारी बाळगतात.

एखाद्या त्रयस्थ निंदकाच्या बाबतींत जर ही आपली वृत्ति तर आपल्या निंदक शेजाऱ्याच्या बाबतींत आपण किती जपत असूं त्याचें वर्णन न केलेलेंच बरें. खरें पाहिलें तर शेजारी म्हणजे आपल्या किती जवळचा माणूस ! नात्यानें न बांधलेला, स्वार्थानें ओढला न जाणारा व प्रेमाच्या देखाव्याची गरज नसणारा असा जर आपला कोणी सगासोयरा असेल तर तो तोच होय. त्यामुळें आपल्या त्याच्याबद्दलच्या आकांक्षा किती उच्च प्रकारच्या असतात ! आणि तोच जर निंदक झाला तर मग आपलें दुर्दैवच ओढवलें म्हणावयाचें. कारण आपण कोणतेंहि घर भाड्यानें घेऊं लागलों कीं पहिल्या प्रथम त्या घराच्या शेजाराची चौकशी करतों. आणि शेजार उत्तम आहे अशी खात्री होतांच किरकोळ कांहीं गैरसोयी असल्या तरी पटकन् घर भाड्यास घेऊन टाकतों. त्यामुळेंच आपल्या नवीन भाड्यास घेतलेल्या घराबद्दल कोणी विचारलें तर, ' सोयी आहेत साधारणच; पण शेजार मात्र फारच उत्तम मिळाला आहे ' असे उद्गार पटकन् आपल्या तोंडून निघतात.

अर्थातच आपल्या नजीकच्या माणसांबद्दल कुतूहल असणें व त्यांच्याबद्दल चौकशी करणें व बोलणें हा मनुष्यस्वभावच असल्या-

मुळें अशी प्रवृत्ति असल्याबद्दल आपल्या शेजाऱ्यांना दोष देणें चुकीचें होईल. आपला उद्योग सोडून परक्याच्या घरगुती गोष्टींबद्दल जिज्ञासा बाळगणें व त्याची चौकशी करणें, गांवच्या अड्ड्यावर जाऊन संभावितपणें त्यांची वाटाघाट करणें व आपल्या कल्पनाशक्तीस ताण देऊन नसत्या गोष्टी आपल्या शेजाऱ्यांस नेऊन चिकटविणें हे प्रकार एकंदरींत निंद्य तर खरेच, परंतु जोंपर्यंत मनुष्यस्वभाव असा आहे व कोणताहि मनुष्य पूर्णतेस पोंचलेला नाहीं तोंपर्यंत शेजाऱ्यांचें व कुटाळांचें तोंड आणि ऐकणारांचे कान कोणीच बंद करूं शकणार नाहीं. कारण निंदा हें एक प्रकारचें नारायणास्त्र आहे, त्याच्याशीं विरोध केल्यानें तें अधिक प्रभावी व भयंकर होतें. तेव्हां श्रीकृष्णानें पांडवांना दिलेल्या गुरुमंत्राप्रमाणें त्याला शरण जाणें व त्याचा प्रतिकार न करणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे. शिवाय आपले शेजारी नेहमींच निंदक असतात असें मानण्याचेंहि कांहीं कारण नाहीं. कारण आपणही आपल्या शेजाऱ्यांचे शेजारी असतों. आपल्याप्रमाणें त्यांच्याहि आपल्याबद्दल उच्च आकांक्षा असतात ही गोष्ट आपण पुष्कळदां विसरतों आणि आम्हीं चांगले व इतर लोक विनाकारण आम्हांला नांवें ठेवतात याच भावनेनें आपण आपल्या शेजाऱ्यांकडे पहात असतों. परंतु आपण त्यांच्या बाबतींत पूर्ण उदासीन वृत्ति ठेविली किंवा आपला शेजारधर्म गोडपणानें पाळला तरच शेजाऱ्यांच्या निंदेतून आपली सुटका होईल, व त्याविषयीं काळजी करण्याचें कारण राहणार नाहीं.

परंतु खरें पाहिलें तर आपले शेजारी व इतर लोक आपल्याविषयीं काय बोलतात हें जाणण्यास आपण किती उत्सुक असतों! आणि पुष्कळदा ते आपल्याकडे कोणत्या दृष्टीनें पहातात हें समजण्याची केवढी भयंकर जिज्ञासा आपल्यामध्यें असते!

श्रीरामचंद्रानें प्रजापालक या नात्यानें आपल्या हेरास गुप्तपणें जनतेमध्यें पाठविलें होतें हें खरें; परंतु एक मनुष्य या नात्यानेंहि आपल्याविषयीं लोक काय बोलतात याबद्दल एक प्रकारचें कुतूहल त्याच्यामध्यें होतें यांत संशय नाहीं. हीच गोष्ट सुप्रसिद्ध हरून अल रसीद बादशाहाची. कारण तो नाना प्रकारचे वेष करून आपल्या प्रजेमध्यें गुप्तपणें बगदाद शहरांतून हिंडत असे, अशी आख्यायिका आहे. आणि त्याच्यामध्येंहि याच प्रकाराची जिज्ञासा होती हें उघड आहे. व बर्न्स कवीच्या "O, would some power the gift give us, to see ourselves as others see us." या सुप्रसिद्ध ओळींतील सदिच्छा देखील याच जिज्ञासेंत जन्मलेली आहे. परंतु बर्न्स कवीची ही आशा मात्र नीतिमूलक आहे. कारण त्यास असें वाटतें कीं, जर एखाद्या किमयेनें आपणांस आपल्या स्वतःकडे दुसऱ्यांच्या डोळ्यांनी पाहतां आलें तर आपणांस आपल्या पुष्कळशा पापांतून व दुरभिमानांतून आपली मुक्तता करून घेतां येईल. आणि खरोखरीच जर ही दृष्टि आपणांस लाभेल तर आपला पुष्कळसा नैतिक फायदा होईल यांत संशय नाहीं.

परंतु खरें पाहिलें तर या जिज्ञासेच्या मुळाशीं सद्भावनेपेक्षां एक प्रकारचा अहंकारच असतो असें आपल्यास थोडा विचार केला तर दिसून येईल. "मी सज्जन प्राणी आहें, तरी लोक माझी निंदा करतात कीं काय व जे माझी स्तुति करतात, ते योग्य स्तुति करतात कीं नाहीं" असें मनाशीं म्हणून प्रत्येकजण हलकेच इतर लोक आपल्याविषयीं काय बोलतात याची चौकशी करीत असतो. श्रीरामचंद्र हा आदर्श राजा होता यात शंकाच नाहीं. आणि याची त्यास जाणीव असल्यामुळें आपल्याविषयीं लोकापवाद असणें अशक्यप्राय आहे असें वाटूनच त्यानें आपल्या हेरास प्रजेकडे पाठविलें होतें.

आणि त्याचमुळें त्या हेराची बातमी ऐकून त्याच्या स्वाभिमानास भयंकर धक्का बसला. माझ्या ओळखीच्या एका कवीस आपण एखादी कविता रचली कीं ती आपल्या परिचयाच्या लोकांस दाखवावयाची संवय किंवा खोड होती. (सुदैवानें तो आतां कविता रचीत नाहीं) कोणी ती कविता चांगली आहे असें म्हटलें कीं तेवढ्यावर संतुष्ट न होतां ती चांगली कशी आहे, याची तो स्वतः चर्चा करूं लागे. बरें ती चांगली नाहीं असें कोणी स्पष्टपणें सांगितलें, तरी त्यावर उगी न रहातां ती खरोखरीच सुंदर कशी आहे हें दाखविण्याकरितां तो आपल्या स्नेह्यांस त्या कवितेवर एक व्याख्यानच ऐकवीत असे!

अर्थातच अशा प्रकारचा फाजील अहंकार असणारे लोक एकंदरीत विरळाच. परंतु आपल्याविषयीं लोकांना काय वाटतें हें जाणण्याची इच्छा व उत्कंठा मात्र मनुष्यप्राण्यांत उपजत आहे यांत शंका नाहीं; व ही गोष्ट मला एकदां स्वानुभवानें चांगलीच पटली.

एकदां मी संध्याकाळीं नेहमींप्रमाणे फिरावयास गेलों होतो व फिरून परतलों त्यावेळीं काळोख पडला होता. रात्र झाल्यामुळें त्या बाजूस फिरावयास येणाऱ्या तरुणतरुणी आपल्या घरांकडे परतल्या होत्या. माझ्या पुढेंच दोन तरुण चालत होते व त्यांच्यापुढें निघून जाण्याच्या इराद्यानें मी जोरांत पावलें टाकण्याचा विचार करतों, इतक्यांत माझ्या कानांवर पटकन् माझें नांव पडलें. दुसऱ्याचें बोलणें चोरून ऐकणें हें पाप आहे याची मला जाणीव होती. परंतु ते माझ्याविषयीं बोलताहेत असें समजतांच माझी दुष्ट जिज्ञासा जागृत झाली व माझी गति आपोआपच थंडावली. मी दबा धरल्याप्रमाणें त्यांच्यामागून जाऊं लागलों, व माझ्याविषयीं व इतर अनेक लोकांविषयीं त्यांचें मनमोकळें बोलणें मी व्यवस्थितपणें ऐकलें,

अर्थातच त्यांचें बोलणें पुढें दुसऱ्या विषयाकडे वळल्यावर मी जरा थांबलों व त्या दोघांस पुढें जाऊं दिलें. माझी पुष्कळ दिवसांची जिज्ञासा चांगलीच तृप्त झाली होती! मात्र वाचकहो, ते तरुण माझ्याबद्दल काय काय बोलले तें मात्र कृपा करून विचारूं नका. परंतु तुमची अगदीं खात्री असूं द्या कीं, त्यांतील कांहीं थोडें जरी सांगण्याजोगें असतें तर मी तें केव्हांच विचारल्याशिवाय तुम्हांस सांगून टाकलें असतें.

परक्यांनीं आपली निंदा करूं नये म्हणून खबरदारी घेणें व ते आपल्याबद्दल काय बोलतात याविषयीं कुतूहल असणें हें मानवी स्वभावानुसारच आहे. परंतु याच्यापुढें जाऊन आपल्यालाच आपल्या स्वतःबद्दल काय वाटतें याची मात्र प्रत्येकानें चौकशी करण्याजोगी आहे. पुष्कळ लोक दुसऱ्यांच्या गुणदोषांची मार्मिकपणें चर्चा करतात व त्यांचीं स्वभावचित्रें रंगवितात. व कित्येक लोक आत्मचरित्रांतून स्वतःचें चित्र रंगविण्याचा प्रयत्न करतात. परंतु हें चित्र जनतेपुढें ठेवावयाचें असल्यामुळें तो प्रयत्न कितीहि प्रामाणिक असला तरी सत्यपूर्ण असत नाहीं. आणि याकरितां प्रत्येकजण केवळ आपल्या स्वतःकरितांच आपलें स्वभावचित्र काढून आपल्या गुणदोषांची जर निर्भीडपणें चर्चा करूं लागेल तर फारच चांगलें होईल. कारण आपली कोणतीहि कृति आपण चिकित्सक दृष्टीनें कधींच पहात नाहीं किंवा तिचा विचारहि करीत नाहीं. कारण आपला अहंकार नेहमीं आपल्या आड येत असतो. परंतु पुष्कळदां असा अनुभव येतो कीं, भूतकालाकडे काळस्थळाच्या उंचवट्यावरून कोणी पाहूं लागला कीं, त्याला वेगळाच देखावा दिसूं लागतो. एक वेळ निर्दोष वाटणाऱ्या आपल्याच कृति आपणांसच भयंकर वाटूं लागतात. अर्थातच हें आत्मनिरीक्षण करणें हें एक मोठें अवघड कार्य आहे. आपण परक्यांची ओळख अगदीं सहजासहजीं करून

घेतों, परंतु आपल्या स्वतःची ओळख आपणांस जन्मभर करतां येत नाहीं. परंतु एकदां ही ओळख दृढ झाली कीं आपणांस निंदकाच्या घराची भीति बाळगण्याचें कांहींच कारण राहणार नाहीं. कारण कोणीहि निंदा करूं लागला कीं आम्हीं सहजच असें म्हणूं कीं, जोंपर्यंत माझें वर्तन माझ्या दृष्टीनें शुद्ध आहे तोंपर्यंत लोकापवादांची पर्वा मी कां करावी आणि त्यानें माझें अनहित तें काय होणार?

म्हणूनच शेवटीं जननिंदेच्या बाबतींत 'मनःपूतं समाचरेत्' हेंच तत्त्व ग्राह्य वाटूं लागतें. तुकारामानें निंदकाचें घर शेजारीं असावें अशी जी इच्छा प्रगट केली तिचें रहस्य तरी हेंच कीं, शेजाऱ्यांच्या अहर्निश चाललेल्या निंदेच्या माऱ्यामुळें आपणास आत्मनिरीक्षण करणें सुलभ व्हावें. सर्वांना खुष करून शेवटीं गाढव गमावून बसणाऱ्या म्हाताऱ्याप्रमाणें प्रत्येकजण वागूं लागला तर तो थोडासा लोकप्रिय होईल हें खरें. पण त्याकरितां त्यास आधीं आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा निंदकांच्या चवाठ्यावर बळी द्यावा लागेल. जगद्वंद्य विभूतींच्या जीवनांतील मुख्य तत्त्व हेंच आहे. त्यांनीं कधीं आत्मप्रतारणा केली किंवा जननिंदेपुढें मान वांकविली असें म्हणण्याचें कोणासच धैर्य होणार नाहीं व यांतच त्यांच्या महात्मेपणाचें रहस्य आहे. कारण लिंड् यानें म्हटल्याप्रमाणें Our neighbours make our reputation, we make our character.

**सह्याद्री**
मे १९३७

# फुरसत

वेगवेगळ्या धंद्याची मंडळी कशीहि, कधींहि व कुठेंहि एकत्र जमली, कीं त्यांच्या बोलण्यांत जर कोणता एक विषय बहुधा निघत असेल तर तो म्हणजे फुरसतीचा. त्या मंडळींतील प्रत्येक जण—मग तो कारकून असो, डॉक्टर असो, वकील असो, शाळामास्तर, व्यापारी अगर दुसरा कोणी असो—त्या सर्वांच्या बोलण्यांतील पालुपद शेवटीं एकच. आणि तें म्हणजे हें कीं, त्यांपैकीं प्रत्येक जण कामाच्या व जबाबदारीच्या ओझ्याखालीं इतका खचून गेलेला असतो कीं, त्यास एका क्षणाची देखील फुरसत व विश्रांति मिळत नाहीं. कोणी म्हणतो कीं, कामापुढें घरच्या आवश्यक गोष्टींकडे देखील लक्ष देतां येत नाहीं. एक म्हणतो कीं, आपल्याला फुरसत नसल्यामुळें आपल्या मुलांची व विशेषतः त्यांच्या शिक्षणाची आबाळ होते. दुसरा म्हणतो कीं, ऑफिसच्या गुलामगिरीमुळें आपल्या आवडीचा लेखन-व्यवसाय बाजूसही ठेवावा लागतो, आणि दिवसेंदिवस नवींनवीं सुंदर व उत्कृष्ट पुस्तकें प्रसिद्ध होत असतांहि जुन्या सुंदर पुस्तकांकडे पहाण्यास देखील सवड मिळत नाहीं. खरोखर, काळाच्या मगर-

मिर्ठांत सांपडलेल्या आणि फुरसतीच्या अभावीं तळमळणाऱ्या या समाजाकडे पाहिलें कीं, अगदीं अतर्क्य वेगानें पळणाऱ्या व मानवाला एक क्षणाचीहि विश्रांति न देणाऱ्या काळाचा राग आल्यावांचून रहात नाहीं. आणि त्याबरोबरच नवी नवी यंत्रसामुग्री तयार करून त्याच्या योगानें मानवाला हवी तेवढी फुरसत मिळवून देण्याचें ध्येय पुढें ठेवणाऱ्या हेन्री फोर्डसारख्या कारखानदाराची आठवण होते आणि कृतज्ञतापूर्वक त्याचें कौतुक व अभिनंदन करावेंसें वाटूं लागतें.

सुदैवानें माझ्या अध्यापनाच्या विशिष्ट धंद्यामुळें इतर धंदेवाल्यांप्रमाणें मला कामाच्या प्रचंड ओझ्यामुळें पुष्कळ आवश्यक गोष्टी करतां येत नाहींत अशी तक्रार करण्याचा प्रसंग माझ्यावर सहसा येत नाहीं. परंतु त्याबरोबरच आमच्या व्यवसायाविरुद्ध, आम्हां कॉलेजच्या मंडळीला वाजवीपेक्षां फाजील फुरसत मिळते अशी जी धंदेवाल्यांची अत्यंत पुराण तक्रार असते तिचें निरसन करण्याचा प्रसंग मात्र हरघडी माझ्यावर येतो. मी हा पेशा स्वीकारल्यानंतरच्या माझ्या पहिल्याच उन्हाळ्याच्या सुटींत बडोद्याचे एक गृहस्थ मला मुंबईस भेटले. ते तेथील एका ऑफिसांत एका हुद्यावर होते व त्यामुळें त्यांस दिवसाचे कांहीं तास ऑफिसांत हजेरी द्यावी लागे हें खरें. मला ते भेटतांच नमस्कारचमत्कार झाल्यावर मी औपचारिकरीत्या त्यांना म्हटलें, “काय, रजा पडली वाटतं ऑफिसला?” त्याबरोबर थोडेंसें रागावून, पण किंचित् हंसल्यासारखें करून ते म्हणाले, “वाः राव, रजा पडायला आमचं ऑफिस म्हणजे कॉलेज कीं काय! तुमच्यासारखी आम्हांला महिन्याच्या महिने रजा आणि विश्रांति मिळेल तर काय चैन होईल! पण करतां

काय ? वर्षभर खर्डेघाशीतच करायची तेव्हां कुठं पंधरा दिवस हक्काची रजा मिळायची !”

यावर मी म्हटलें, “राव, तुम्ही म्हणतां तें कांहीं खोटं नाहीं; पण तुम्हांला जी थोडी फुरसत मिळते, आणि आम्हांला जी भयंकर फुरसत मिळते त्यांत एक मोठा फरक आहे. तुमची फुरसत ही विश्रांतीकरितां असते आणि आमची फुरसत ही आम्ही त्या वेळांत अविश्रांत बौद्धिक मेहनत करावी म्हणून असते इतकेंच” अर्थात् त्या गृहस्थाला हें म्हणणें पटलें नाहीं हें सांगावयास नकोच. आणि थोडें औपचारिक बोलणें झाल्यानंतर जणूं काय माझ्या आस-मंतात् भरून राहिलेल्या व मला वेष्टून टाकणाऱ्या आमच्या अमर्याद व बेफिकीर फुरसतीकडे असूयापूर्ण दृष्टि टाकून तो गृहस्थ निघून गेला.

परंतु आमच्या अध्ययनाच्या धंद्यांतील फुरसतीसंबंधानें अशा प्रकारें बोलण्याचा हा पहिलाच आणि अखेरचा प्रसंग होता असें नाहीं. कारण त्यानंतर अनेक लोकांशीं बोलतांना त्यांना देखील कमजास्त प्रमाणांत वरच्यासारखें उत्तर मला देणें भाग पडलें आहे. अध्यापनाच्या धंद्यांत इतर धंद्यांपेक्षां अधिक फुरसत मिळते हें खरें आणि इतर व्यवसाय करणाऱ्या मंडळीप्रमाणें आम्ही कॉलेजच्या वेळापत्रकाबाहेर काळानें फारसे बांधलेले नसतों हें खरें; पण या धंद्यांत मला एक विशेष गोष्ट आवडते ती ही कीं, इतर धंद्यांतील लोकांच्या मनावर जो एक प्रकारचा ताण पडतो तो आमच्या मना-वर बहुधा पडत नाहीं. फुरसत हवी तर आहे, नको तर नाहीं, अशी वृत्ति आम्ही ठेवीत असल्यामुळें आम्हांस बौद्धिक श्रमाचा थकवा वाटत नाहीं व वृत्तीहि उल्हसित आणि आनंदित रहाते.

मनुष्यप्राणी हा जात्या स्वतंत्र वृत्तीचा आहे. त्यास कसलीहि

बंधनें अगर गुलामगिरी आवडत नाहीं. मिल्टनचा सैतान 'स्वर्गात गुलाम म्हणून राहण्यापेक्षां मी रौरवांत राजा म्हणून राहीन' असें जें म्हणतो, त्यांतील रहस्य तरी हेंच. आणि याच कारणानें इतर व्यवसायांतील लोकांना दिवसाचे ठरलेले तास काम करणें म्हणजे पिंजऱ्यांत अडकून पडल्यासारखें वाटतें. पण उलटपक्षीं ज्यांना ही नोकरीची रुपेरी बेडी असला मनस्ताप देऊं शकत नाहीं, असे स्वतंत्र व्यवसाय करणारे वकील, व्यापारी, डॉक्टर यांसारखे लोक एक क्षणाची फुरसत घेतल्याशिवाय अहोरात्र मेहनत करतात आणि आम्हांस फुरसत मिळत नाहीं, अशी चुकूनदेखील तक्रार करीत नाहींत. अध्यापनाच्या धंद्यांतील वैशिष्ठ्य हेंच कीं, ती नोकरी असून देखील स्वतंत्र व्यवसायांतील लोकांचें मनःस्वास्थ्य त्यांत आह्मांस मिळूं शकतें. पुष्कळशीं नाना प्रकारचीं पुस्तकें इकडे तिकडे ठेवलेलीं आहेत; एकाचा कंटाळा आला तर दुसरें घ्यावें. गंभीर कांहीं वाचण्याचा वीट आला कीं एकादी कादंबरी घ्यावी किंवा कांहीं लिहावें. किंवा कोणी चांगल्या गप्पा मारणारा गृहस्थ अगर विद्यार्थि आला तर त्याच्याशीं गप्पागोष्टी (चकाट्या नव्हेत) कराव्या. यांत थकवा वाटत नाहीं किंवा आपण प्रत्यक्ष बौद्धिक श्रम करीत आहों असें वाटत नाहीं. पुष्कळ काम आणि थोडी विश्रांति, पुन्हा काम व विश्रांति अशा प्रकारचा आमचा जीवनक्रम असल्यामुळें आमच्या मनाला सतत कामामुळें इतरांच्या मनाला जो एक प्रकारचा गंज चढलेला असतो तसा चढत नाहीं, आणि त्याचमुळें भरपूर फुरसत असली तरी आम्ही रिकामे राहूं शकत नाहीं.

परंतु आह्मांस आमच्या व्यवसायांत मिळणारी रोजची फुरसत आणि त्यांत दरवर्षी मिळणाऱ्या दोन सुट्या यांत पुष्कळच फरक आहे. कारण एकदां रजा पडली आणि आतां कॉलेजच्या

वेळापत्रकाची मगरमिठी आपल्या मानेभोंवतीं नाहीं अशी खात्री झाली, कीं आमच्यांतील शेखमहमदी वृत्ति जागी होते आणि चार्लस लँब यास सेवानिवृत्ति झाल्यास वाटलें त्याप्रमाणें आतां आपण कालराजाच्या साम्राज्यांतील नवकोटनारायण आहों असें वाटूं लागतें आणि त्या वेळीं मला बहुधा मोठ्या प्रौढीनें त्या बडोद्याच्या गृहस्थास दिलेल्या उत्तराची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. कारण सुटीच्या प्रारंभीं आपण किती मोठमोठे बेत करतों! कितीतरी पुस्तकें वाचायचीं, पुष्कळसें लिहायचें, कितीतरी स्थळें पहायचीं, इत्यादि, इत्यादि अनेक प्रकारचीं मनोराज्यें असतात आपलीं!

पण रजा संपल्यावर पहावें तों किती सहजपणें तीं सारीं विरघळून गेल्यासारखीं दिसतात! जणुं काय संध्याकाशांत दिसणारे सुंदर सुंदर अल्पजीवि मजेदार रंगच ते! कारण सुटीच्या प्रारंभीं आपण अनेक बेत करतों, सुटींतील कार्यक्रमांचें वेळापत्रक आंखतों आणि मोठ्या उत्साहानें त्या स्वात्रंत्र्याच्या व विश्रांतीच्या (अल्पकाल टिकणाऱ्या) जीवनास प्रारंभ करतों. पण वेळाचे आम्ही मालक असलों तरी परिस्थितीच्या लहरीचे आम्ही धनी नाहीं हें बहुधा आम्हीं विसरूनच जातों. कारण आजारीपण, अनपेक्षित अडचणी, वगैरे गोष्टी एकदम उत्पन्न होतात आणि त्यांना आमच्या अव्यवस्थितपणाची व आळशी वृत्तीची जोड मिळाली कीं साऱ्या रजेचा किंवा सुटीचा चुराडा होतो! आणि मग अखेर रजा संपली आणि त्यांतील दिवसांचा आढावा काढूं लागलों, कीं जिकडे तिकडे फसलेले बेत व विरलेलीं स्वप्नें यांचींच भुतें दिसूं लागतात! अशा वेळीं मला पुष्कळदां वेल्स यांच्या Love and Mr. Lewisham मधील लुइशाम या शाळामास्तराच्या स्कीमाची (Schema) आठवण होते. जीवनाच्या प्रारंभीं केवढ्या मोठया उत्साहानें व

ध्येयपूर्णतेनें त्यानें आपला स्कीमा तयार केला होता; आणि अखेर ऐन तारुण्यांतच किती निराशेनें त्याला त्या स्कीमाला केराच्या टोपलींत टाकावें लागलें होतें! मी पुष्कळदां आपल्या रजा व त्यांतील बेत यांची आठवण करूं लागलों, कीं त्यांतील बहुतेक बेत मला अशाच केराच्या टोपलींत टाकलेले दिसून येतात. आणि यामुळेंच मी अलीकडे कोणत्याहि रजेंत कसलेच बेत करायचे नाहींत असें ठरवून टाकलें आहे.

परंतु वरील अनुभवाबरोबर मला असें दिसून आलें आहे कीं, विश्रांति किंवा फुरसत ही गोष्ट जितकी वेळेवर अवलंबून आहे तितकीच मनावरही अवलंबून आहे. एडिसन्, फोर्ड, वगैरे थोर लोकांबद्दल मीं असें वाचलेलें आहे कीं, त्यांना थोड्याशा झोंपे पलीकडे विश्रांतीची जरूरीच भासत नाहीं. त्यांना रिकामपण म्हणजे शिक्षेसारखेंच वाटतें आणि एका प्रकारचें काम झाल्यानंतर त्यांची विश्रांति म्हणजे वेगळ्या प्रकारचें कसलेंतरी काम हातांत घेणें हीच! पण आमच्यासारख्या सामान्य लोकांना हा नियम लागूं होणारच नाहीं. कारण मनुष्याला फुरसत व विश्रांति हवी यांत शंकाच नाहीं. परंतु तेवढ्यानेंच भागत नाहीं. कारण फुरसत मिळाली तरी तिचा योग्य व शंभर टक्के विनिमय करावयाला मनाची तेवढी तयारी हवी. मला असे अनेक लोक माहीत आहेत कीं, रविवारची एक दिवसाची रजा त्यांना आनंददायक वाटते. परंतु तीच जर तीनचार दिवसांची ईस्टरसारखी एकादी रजा आली कीं त्यांचा वेळ जातां जात नाहीं आणि ती रजा कधीं एकदां संपते असें त्यांना होऊन जातें.

उलटपक्षीं असेहि अनेक लोक आहेत कीं, विश्रांतिस आवश्यक अशा मोकळ्या आनंदी वृत्तीचें आणि त्यांचें पूर्ण वावडेंच असतें.. या वृत्तीच्या लोकांना कितीहि फुरसत असो, त्यांच्याजवळ भरपूर

द्रव्य असो अगर त्याना कोणत्याहि अडचणी नसोत, पण त्यांच्या अंतःकरणांत सणास अगर सुटीस आवश्यक अशा आनंदाचा किंवा उत्साहाचा प्रवेशच होऊं शकत नाही. सण अगर सुटी आली म्हणजे मोठमोठ्याने हंसून खिदळून किंवा खिश्चनांसारखा 'सन्डे बेस्ट' पोषाख करून किंवा मुसलमानांसारखे रंगीबेरंगी कपडे घालून त्या सुटीचें स्वागत आणि त्यास अनुरूप अशा आपल्या आनंदाचें प्रदर्शन करावें असा याचा अर्थ नाही. पण सुटी येणार म्हणून किती उत्कंठेनें आपण तिची वाट पहात असतों व ती जवळ येते तसतसे आपण किती अधीर होतों! मग ती आल्याबरोबर स्मशानोचित वृत्तीनें तिचें स्वागत करण्यांत किंवा तिच्या आगमनानें देखील आपलें सागरासारखें गांभीर्य ढळलें नाहीं असें दाखविण्यांत अर्थ काय? मनांत आनंद नसतांना देखील बाहेरच्या परिस्थितीस अनुकूल अशी आनंदी वृत्ति जर एखाद्यानें प्रकट केली तर कुणीहि त्याचें अभिनंदन करील. परंतु जिकडेतिकडे उत्साह व आनंद असतांना देखील आपण अप्रसन्नतेचे काळे मेघ उत्पन्न केले तर, तो पोक्तपणा अगर शहाणपणा असें कोणीहि म्हणणार नाहीं. पाश्चात्य लोकांच्या संस्कृतींत मला विशेष आवडते अशी गोष्ट म्हणजे हीच कीं, आनंदाच्या प्रसंगीं ते मनमुराद आनंद लुटतात व त्याची मुक्तहस्तानें देवघेव करतात. परंतु ते सणाचे अगर सुटीचे दिवस संपले कीं, पुन्हा तजेलदार वृत्तीनें आणि नव्या जोमानें ते आपल्या जीवनास पुन्हा प्रारंभ करतात.

परंतु फुरसतीचा खरोखर कसा विनियोग करावा हें पहावयाचें असेल तर एखाद्या रविवारच्या अगर रजेच्या दिवसांतील मुंबईकरांचा कार्यक्रम पहावा. त्या दिवशीं सकाळीं पहावें तों मुंबईकर किती आनंदित व तरतरीत दिसतात! विशेषतः रविवार

म्हणजे सहा दिवस काम केल्यानंतर हक्काच्या विश्रांतीचा दिवस. मुंबईंतील रविवारचें जीवन म्हणजे मूर्तिमंत आलस्य व बंधनाचा अभाव ! रोज सकाळीं अगदीं लवकर उठणारा मुंबईकर त्या दिवशीं राजाच असतो ! तो बहुधा त्या दिवशीं आठ वाजतां उठेल आणि अगदीं सावकाशपणें चहा करून, थोडा बाजार करून मग चक्कर मारायला बाहेर पडेल; आणि नऊ वाजतां घड्याळाकडे पहात पहात चार घांस खाणारी ही स्वारी दोनचार ठिकाणीं चहा झोडून आस्ते आस्ते अकरा साडेअकरा वाजतां घरच्या बाजूकडे वळेल! जेवल्यानंतर एक छानशी झोंप घेण्याच्या आधीं अगदीं महत्त्वाचें काम म्हणजे, त्या दिवसाच्या वृत्तपत्रांचा समाचार घ्यावयाचा. आमच्या मराठी वृत्तपत्रकारांना मनोरंजन कसें करावें याचें किती अचूक उपजत ज्ञान असतें हें मी सांगावयास हवें असें नाहीं. कारण कोणतेंहि साप्ताहिक घ्या, त्यांत राजकारण, सार्वजनिक व्यक्तींचा खाजगी इतिहास, कित्येक फंडांसंबंधीं अगदीं आंतील गोष्टी, रंग-भूमि, चालू चित्रपट, वाङ्मय, भविष्य, उखाळ्यापाखाळ्या, लघु-कथा, थोर व्यक्तींची कुचेष्टा, क्रिकेट, वगैरे वगैरे तऱ्हेतऱ्हेचा सर्व प्रकारच्या रुचींना आवडणारा बरावाईट मालमसाला हवा तितका सांपडेल. तेव्हां आमच्या संपादकांसमवेत या सर्व प्रकारच्या रम्य सृष्टींत संचार करून मग आमचा मुंबईकर पांच साडेपांच वाज-ण्याच्या सुमारास आपल्या परिवारासह चौपाटीची अगर दुसरी कसलीतरी हवा खाण्यास बाहेर पडेल. पण या मानानें रविवारची सुटी संपलेलीच असते. कारण त्यांस उद्यांपासून पुढच्या शनिवार-पर्यंतच्या कडव्या गुलामगिरीचीं स्वप्नें पडूं लागलेलीं असतात. मग रात्रीं जेवण झाल्यानंतर तो बिछान्यावर पडतो तेव्हां अगदीं मोकळे-पणानें व स्वच्छंदानें घालविलेल्या त्या दिवसाची गोड आठवण जशी

त्याच्यासमोर उभी असते तशीच पुढच्या सहा दिवसांची कटु जाणीवहि त्याच्यापुढें तांडव करीत असते. आणि अशा स्थितींतच तो झोंपतो तो आठवड्यांतील सर्वांत वाईट अशा काळ्या सोमवारीं ( Black Monday ) सकाळीं जागा होतो.

आपल्या फुरसतीची खरीखरी मजा चाखायची असेल तर तशा प्रकारची वृत्ति हवी. आणि त्यासाठीं पहिल्या प्रथम आपण आपणांस कोणत्याच बंधनानें किंवा कार्यक्रमानें बांधून घेतां कामा नये. खरोखर, फुरसतीच्या दिवशीं अगदीं मला सर्वांत जास्त राग जर कोणाचा येत असेल तर घड्याळाचा. त्या दिवशीं अगदीं स्वच्छंदानें वागायचें, बागडायचें, कसलीच वेळकाळाची दिक्कत ठेवायची नाहीं असा कितीहि मनाचा तुम्ही निश्चय करा; पण टिक् टिक् असें करून आणि नकळतच आपल्याकडे तुमची दृष्टि वेधून घेऊन ‘ आला क्षण, गेला क्षण ’ असें तुम्हांस बजावल्या-शिवाय तें घड्याळ राहणार नाहीं आणि त्याच्याकडे लक्ष गेलें कीं साहजिकच आपल्या रोजच्या बांधलेल्या जीवनाची स्मृति आप-ल्याला होते, व त्या दिवशीं आपण वेळाची खरोखर उधळपट्टी करीत नाही ना, अशी शंका मनांत उत्पन्न होऊं लागते. त्यामुळें मी सहसा कोणत्याच कार्यक्रमानें सुटीच्या दिवशीं आपणांस बांधून घेत नाहीं व घड्याळ सहज दिसणार नाहीं अशा जागीं कुठंतरी लपवून ठेवतों. पण त्याचा फारसा उपयोग होत नाहीं. कारण पुष्कळदां सुटी आली कीं त्या दिवसाकरितां खास राखून ठेवलेलीं अनेक कामें तोंड वासून उभीं राहतात आणि त्यांची कशीतरी एकदां वाट लावण्याचा प्रयत्न करतों तोंच सुटी संपूनहि जाते व मग त्या दिवशीं कामहि झालें नाहीं व सुटीची मजाहि चाखतां आली नाहीं म्हणून चडफडत राहिलेलीं कामें पुढल्या सुटीकरितां म्हणून बांधून ठेवावीं लागतात.

९८

परंतु असें असतांना देखील एकादा फुरसतीचा अगर सुटीचा दिवस इतक्या मजेंत जातो कीं, त्याची मधूनमधून आठवण होत रहाते. माझा एक रविवार तर मला आठवत असतो. त्या दिवशीं मी एक अगदीं महत्त्वाचें काम करावयाचें नक्की ठरवून ठेवलें होतें व त्या दिवशीं तें संपवून टाकणें अगत्याचें होतें. पण सकाळीं उठून बाहेर येतों तों चारपांच स्नेही मंडळी 'आलों तुमच्यावर दरोडा घालायला' असें म्हणून दारावर दूत म्हणून उभी! मला कामाची आठवण झाली, पण नाखुषीनेंच परंतु गृहस्थधर्मास जागून मीं त्यांचें स्वागत केलें. पण आमची ती स्नेही मंडळी म्हणजे गप्पागोष्टींतली अगदीं मुरब्बी. आणि आमचें संभाषण सुरू झालें. वेळ इतक्या झपाट्यानें गेला कीं, अकरा कधीं वाजले तें समजलेंच नाहीं. त्यानंतर जेवण झाल्यावर पुन्हा त्या कामास आरंभ करण्याचा विचार करीत होतों; पण तें त्या दिवशीं व्हायचें नव्हतें खरें. कारण इतक्यांतच अगदीं तऱ्हेवाईक रीतीनें वागण्यांतच वैशिष्ट्य मानणारे एक स्नेही शेजारींच पत्ते खेळण्यास चलण्याचा मारे जोर आग्रह करूं लागले. त्या गृहस्थानें असा आग्रह करणें म्हणजे पर्वणीच होती आणि म्हणूनच पत्त्यांची फारशी आवड नसतांनाहि मी त्याच्याबरोबर गेलों. पण एकदां तिथें गेल्यावर खेळ इतका रंगला कीं, तो संध्येपर्यंत पांच वाजले. आतां मात्र त्या कामाची आठवणहि करावयाची नाहीं असें मी ठरविलें आणि त्या दिवसाच्या या कार्यक्रमास साजेशी अशी एक दूरची रपेट करण्याचा बेत केला. आणि सुदैवानें या रपेटीस अनुकूल असे एक सहाध्यापक सोबतीहि मिळाले. आम्ही बडोदें शहर सोडून पुष्कळ बाहेर गेलों, वनश्रीची अपूर्व मौज पाहिली, इकडेतिकडे पुष्कळ हिंडलों आणि जातां जातां कितीतरी विषयांची चर्चा केली. त्या रात्रीं मी

झोंपण्यापूर्वी त्या दिवसाचा आढावा काढूं लागलों, तों त्या राहून गेलेल्या महत्त्वाच्या कामाची त्रासदायक आठवण झालीच; परंतु त्या दिवशीं सुटीची खरीखुरी मौज आपण अनुभवली असें वाटून एक प्रकारचा विशेष आनंद मला वाटल्याशिवाय राहिला नाहीं.

तेव्हांपासून पुष्कळशा कामानंतर एखादा रजेचा दिवस आला कीं त्या रविवारच्याप्रमाणें अगदी खुशालचेंडूसारखे वागावें असें मला पुष्कळदां वाटत असतें. एका आंग्ल कवीनें म्हटले आहे, "What's the use of life, if we have no time to stand and stare?" आणि तें त्याचें म्हणणें अगदीं खरें आहे. जीवनातील प्रत्येक क्षण सोन्याचा आहे व त्याचा यथायोग्य उपयोग करावयास पाहिजे ह्याबद्दल कोणाचेंच दुमत असणें शक्य नाहीं. परंतु एकाद्या फुरसतीच्या दिवशीं आपल्या जीवनक्रमाचें यंत्र अजीबात बंद करून थोड्या मोकळ्या व स्वच्छंद वृत्तीनें वागलें तर त्यामुळें वेळाचा अपव्यय होतो असें थोडेच आहे! कारण एकाद्या दिवशी आपला कंटाळवाणा वाटणारा दिनक्रम आपण पालटला, त्यानें बुरसलेल्या शरिराला व मनाला वेगळी कलाटणी दिली आणि वेगळ्या वातावरणात व मंडळीत त्यांना जरा हिंडूंफिरूं दिलें, तर तो दिवस फुकट तर जाणार नाहींच, पण उलट त्या दिवशी आपण रोजच्यापेक्षा जास्त कमाई केली असेंच शेवटीं आपल्यास आढळून येईल. सध्यांच्या धांदलीच्या जीवनांत आपल्याला मुळींच फुरसत आणि विश्रांति मिळत नाही अशी आम्ही एकसारखी तक्रार करीत असतों. परंतु जोंपर्यंत आम्ही फुरसतीकडे फुरसतीच्या दृष्टीनें पहात नाहीं, तोंपर्यंत कितीहि फुरसत असली तरी ती असून नसून सारखीच.

मनोहर
ऑगस्ट १९३६

# घरीं परत

त्या सायंकाळचें तें रम्य चित्र मी केव्हांहि विसरणार नाहीं. तो सूर्यास्ताचा समय होता, आणि मी एकटा सिंधुदुर्गाच्या समोरच एका खडकावर बसून त्या वेळचें सुंदर दृश्य पहात होतों. पश्चिमेच्या बाजूला सूर्यदेव अगदीं लाललाल होऊन घाईघाईनें सागरामध्यें उतरत होता. मला वाटलें कीं, घरची देवी रागावेल अशी भीति वाटल्यामुळें ही स्वारी अगदीं गर्दीनें घरीं परत चालली आहे. इतक्यांतच वर आकाशांतून केवढातरी किलबिलाट माझ्या कानीं आला. मीं वर पाहिलें तों कावळे, पारवे, पोपट, वगैरे पक्ष्यांचे थवेच्या थवे मोठ्या आनंदानें गान करीत सिंधुदुर्गाकडे चालले होते. सिंधुदुर्ग म्हणजे त्या पक्ष्यांचें नंदनवनच ! त्याच्या पवित्र कृपाछत्राखालीं तेथील झाडांतून हे सारे पक्षी रहात आणि सायंकाळीं किल्ल्यांतील आपल्या वसतिस्थानाकडे परत जात.

आज समुद्रावरून जोराचा वारा वहात होता; आणि त्यामुळें त्या दुर्बल पक्ष्यांना समुद्रावरून उडणें कठीण होत होतें. मधून मधून त्यांतील कांहीं पक्षी वाऱ्याच्या जोरानें पतंगाप्रमाणें फेंकले जात

आणि कांहीं कांहीं तर थकल्यामुळें समुद्राच्या पाण्याच्या इतक्या जवळून उडत कीं, खालीं तोंड वासून ओरडणाऱ्या रागीट लाटांच्या मुखांत ते पडतात कीं काय अशी भीति वाटे. शेवटीं समुद्र ओलांडून तो पक्षीवृंद एकदांचा किल्ल्यावर पोंचला आणि मग सिंधुदुर्गाच्या प्रचंड तटावर बसून त्यानें एकच किलबिलाट करून सोडला. तो ऐकून कोणालाहि असें वाटलें असतें कीं, घरीं सुरक्षितपणें पोंचल्याबद्दल हे पक्षी परमेश्वराला धन्यवाद देत आहेत. इतक्यांत मोठी होडी वाऱ्यानें भरलेल्या आपल्या छोट्या शिडाच्या जोरावर एखाद्या जलचर सापाप्रमाणें पाणी कापीत तरतर माझ्यासमोरून निघून गेली. तिच्या एका टोंकाला एक कोळी सुकाणूंवजा एक लहानसें वल्हें घेऊन पाय ताणून पडला होता आणि एक सुंदरसें गाणें गात सागराच्या पोटची रुपेरी संपत्ति लुटून घेऊन हा वीरगडी एखाद्या राजाप्रमाणें घरीं परत चालला होता. त्याच वेळीं क्षितिजाच्या एका बाजूनें मासे धरण्याकरितां दूरवर समुद्रांत गेलेल्या होड्या एखाद्या आरमाराप्रमाणें डोलत डोलत किनाऱ्यावर परत येत होत्या. हें सारें दृश्य पाहिल्याबरोबर माझें हृदय कोणत्यातरी अवर्णनीय शांतीनें आणि आनंदानें भरून गेलें. मी त्या वेळीं पुष्कळ दिवसांनीं नुकताच घरीं परत आलों होतों; आणि हें दृश्य म्हणजे घरीं आल्याबरोबर मला लाभलेल्या पहिल्या गोड आनंदाचें पुनरुज्जीवन होतें असें म्हणावयास हरकत नाहीं.

घरची आठवण झाल्याबरोबर कोणाचें हृदय हालत नाहीं ? किंवा यशवंत कवीनें वर्णन केल्याप्रमाणें मातृप्रेमाच्या अगर प्रियजनांच्या स्मृतीनें कोणाचें मन हळुवार होत नाहीं ? मनुष्य कितीहि क्रूर, स्वार्थी वा दुष्ट असो, त्याला आपल्या घरची स्मृति झाल्याबरोबर त्या ठिकाणीं नांदणाऱ्या अनुपमेय सुखाची आणि आनंदाची

जाणीव होऊन क्षणभर कां होईना, पण त्याचें मन प्रसन्न झाल्या-वांचून रहात नाहीं. कारण 'माझें घर' या शब्दांबरोबर अनेक मधुर दृश्यें दृष्टीसमोर नाचूं लागतात आणि नाजुक भावना मना-मध्यें गाऊं लागतात. कारण गृह हें सर्व प्रकारच्या आनंदाचें, स्वास्थ्याचें आणि प्रेमाचें अधिष्ठान आहे, आणि गृहसौख्याचा पाया प्रेमाच्या निस्वार्थीपणाच्या आणि आपलेपणाच्या वज्रमय खडकावर रचलेला आहे. यामुळें एकाद्या भणंग भिकाऱ्याला त्याच्या चंद्रमौळी खोपटांत जें सुख मिळतें तेंच एकाद्या लक्षाधीशाला त्याच्या वैभव-पूर्ण प्रासादांत लाभत असतें. इतकेंच नव्हे तर घरच्या प्रत्येक तद्वि-षयक विचारांत देखील एक प्रकारचा सखेदमधुर असा आनंद प्राप्त होत असतो. नैऋत्येकडील वाऱ्याची एक झुळुक लागतांच मंत्र-मुग्धाप्रमाणें होऊन केशवसुत कवींना स्वतःचा विसर पडतो; आणि त्याबरोबर कोंकणच्या रम्य भूमींतील आपल्या टुमदार घराचें, त्याच्या सभोंवतालच्या स्वच्छ व हिरव्यागार परसुवाचें आणि त्या घरांत नांदणाऱ्या आपल्या कुटुंबाचें मोहक चित्र त्यांच्या डोळ्यां-समोर उभें रहातें. 'तो येतो मम मातृभूमिवरुनी' असें म्हणूत ते मोठ्या प्रेमानें नैऋत्येकडच्या वाऱ्याचें स्वागत करतात आणि त्याच्या सुखस्पर्शानें पुलकित होऊन आपल्या प्रियजनांच्या सह-वासाचा कल्पनारम्य आनंद भोगूं लागतात.

यामुळें घरीं परत जाण्याचा विचार नेहमींच सुखकर असतो. एखादा मातृविहीन बाळदेखील वर्गाच्या पंतोजीच्या गुलामगिरीं-तून सुटल्याबरोबर फुलपांखरांप्रमाणें घराकडेच उडत जातो. आणि घरची कैकेयी घरीं गेल्याबरोबर खाऊ देण्याऐवजीं शिव्याशाप अगर मार देईल अशी भीतिदेखील त्याच्या मनाला फारशी शिवत नाहीं. सारा दिवस टेबलाशीं आणि कागदांशीं एकजीव झाल्यामुळें निस्तेज

दिसणारा कारकूनदेखील ऑफिसच्या गुलामगिरींतून सुटून घरच्या एकछत्री साम्राज्यांत गुलाम म्हणून राबण्यास उत्सुक असतो. आणि अगदींच मंदगतीनें चालणाऱ्या भिंतीवरील घडयाळानें स्वातंत्र्यदर्शक टोला मारतांच कोटटोपी चढवून इकडे तिकडे न पाहतां तो सरळ घरचा रस्ता धरतो. इतकेंच नव्हे तर सकाळींच घरच्या राणीकडून करण्यांत आलेल्या कसल्यातरी मागणीची जड आठवण आणि आपल्या हलक्या खिशाची कटु जाणीव होत असतांहि त्याच्या त्या उत्सुकतेवर आणि आनंदावर विरजण पडूं शकत नाहीं. कारण मनुष्य हा स्वतःच्या घरांत गुलाम असला तरी मनाचा राजा असतो. आपल्या गोड अधिकाराची आणि स्वातंत्र्याची त्यास पुरी जाणीव असते. आणि त्याच्या अंगांतील जो नैसर्गिक अहंभाव आणि ममत्व त्याचें सारें जीवन व वाद 'माझें, माझें घर' या कल्पनेवरच होत असते.

मला वाटतें कीं, याच कारणानें कित्येक गृहस्थ घरीं आल्याबरोबर अगदीं रागावल्यासारखे आणि चिडल्यासारखे दिसत असतात. माझ्या एका स्नेह्याचा असला स्वभाव आहे. एकदां त्यानें मला मुद्दाम मोठ्या आग्रहानें बोलावून नेलें. परंतु घरांत पाऊल ठेवल्याबरोबर त्याचा नेहमींचा विनोदी व मृदु स्वभाव मावळला. आणि तो एखाद्या सुलतानासारखा वागूं लागला. आम्ही त्याच्या घरीं गेलों तेव्हां त्याची एक छोटी गोड मुलगी बाहेरच खेळत होती आणि आम्हांला पाहतांच ती पळून आंत जाऊं लागली. इतक्यांत "सुधा, इकडे ये." अशी तिच्या वडिलांनीं गर्जना केली आणि त्याबरोबर दचकून ती अशा रीतीनें त्याच्याजवळ येऊन उभी राहिली कीं, कोणालाहि वाटलें असतें एकादा गुन्हेगार फांशीची शिक्षा फर्मावीत असलेल्या न्यायाधिशासमोरच उभा आहे. माझ्या या मित्राचें

आपल्या पत्नीवर अगर मुलांवर प्रेम नाहीं असा मात्र याचा अर्थ नाहीं. तो त्यांचें नेहमीं कोडकौतुक करतो आणि आपल्या पत्नीच्या गुणांचें वर्णन करीत असतो; परंतु त्याच्या या चमत्कारिक वागणुकीच्या बाबतींत मला असें वाटतें कीं, बहुतकरून घरांत पाऊल ठेवतांच त्याच्या अंगांतील धनीपणाची वृत्ति जागृत होते आणि त्यापुढें त्याच्या कोमल भावना प्रकट होऊं शकत नाहींत किंवा तिच्या त्या कर्कश भेरीपुढें मनाच्या प्रेमळ वृत्तीचें सारें संगीत ऐकूं येईनासें होतें.

रे. टिळक यांनीं म्हटल्याप्रमाणें प्रीति ही ममत्वाच्या आळयांत लावलेली व विरहाच्या उन्हानें आणि अश्रूंच्या जलानें वाढणारी एक वेल आहे. आणि यामुळें आपल्या घरापासून फार दूर किंवा परदेशांत गेलेल्यांना आपल्या घराबद्दल आणि तदनुषंगानें आपल्या गांवाबद्दल अगर प्रांताबद्दल विशेष प्रेमादर वाटूं लागतो. कारण या ठिकाणीं त्यांच्या गृहाची आणि प्रेमाची मर्यादा विस्तृत होऊं लागते आणि मनाचा आकुंचितपणा नाहींसा होतो. गुजराथमध्यें "आमचें कोंकण" असें म्हटल्याबरोबर माझ्या मनांत ज्या भावना उत्पन्न होतात, त्या मुंबईसारख्या कोंकणानजीकच्या ठिकाणीं होत नाहींत. इटलीसारख्या नंदनवनांत देखील आपल्या आंग्लभूमींत वसंतावतार झाला आहे, असा विचार मनांत येतांच ब्राऊनिंग् कवीचें मन अधीरतेनें नाचूं लागतें आणि "Oh, to be in England, now that Spring is there!" असे उद्गार सहजस्फूर्तीनें त्याच्या मुखावाटें बाहेर पडतात. पण ब्राऊनिंग् कांहीं झालें तरी वाटेल तेव्हां इंग्लंडांत परत जाण्यास स्वतंत्र होता. परंतु ज्या तेजस्वी तरुणांना आपल्या देशभक्तीमुळें स्वभूमि पारखी झाली आहे, त्यांना स्वदेशाचें, स्वगृहाचें आणि स्वबांधवांचें चिंतन

करतांना किती दुःख व उत्कंठा वाटत असेल त्याचें वर्णन करतां येणार नाहीं. एखाद्या कारागृहाच्या प्रचंड भिंतीप्रमाणें दुस्तर वाटणाऱ्या सागराकडे पाहून त्यांच्या नेत्रांत अश्रु येत असतील. आणि या निष्ठुर सागराला आपली दया आल्याखेरीज आपल्या सस्यश्यामला भूमीचें दर्शन होणार नाहीं असें वाटल्याबरोबर अगदीं कळवळून "ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला ॥" असे उद्गार त्यांच्या मुखांतून बाहेर पडत असतील, यांत नवल नाहीं. कारण खरें पाहिलें तर, ज्या असंख्य नरवीरांनीं स्वदेशा करितां परक्षेत्रांत देहार्पण केलें आणि ज्यांना स्वभूमीचें, गृहाचें आणि बांधवांचें गोड स्मरण करीत असतांना मृत्यु आला, त्यांनींच घर या नांवाला व कल्पनेला एक प्रकारचा देवपणा आणलेला आहे यांत शंका नाहीं. इतर कोणाहीपेक्षां 'माझें घर' असें म्हणण्याचा पहिला अधिकार त्यांचा आहे आणि त्यांच्याच तोंडीं हे उद्गार जास्त शोभतात.

परंतु मनुष्य लहान—मोठा, पराक्रमी—अपराक्रमी, कसाहि असो, पुष्कळ दिवसांनीं घरीं गेल्याबरोबर त्यास विशेष आनंद आणि उत्साह वाटत असतो यांत शंका नाहीं. ज्याच्या सांवलींत आपण लहानाचे मोठे झालों, त्याच घरांत जाऊन जुन्या काळच्या सुखांच्या स्मृतींची मेजवानी भोगण्यांत आपणास मोठें सुख वाटत असतें. आपण अगदीं कृतज्ञता बुद्धीनें त्या ठिकाणीं जातों, परंतु आपलें घर एखाद्या ममताळू पुराणपुरुषाप्रमाणें प्रेमळ दृष्टीनें आपल्याकडे पहात असतें. कारण आपल्या पूर्वजांचाहि पुराणपुरुष तोच! आणि त्यामुळें त्याची स्मृतीदेखील अगदीं पूज्य अशीच आपल्याला वाटत असते. घरांतील देवदेखील आपल्याकडे प्रेमदृष्टीनें पाहूं लागतात. आपण घरांत गेलों कीं तेथील अनेक लहानसहान वस्तु कित्येक जुन्या प्रसं-

गांची आठवण करून देतात. पण ही स्मृती नेहमींच गोड असते असें नाहीं. कारण आपल्या दिवंगत प्रियजनांचीं पुसट चित्रें कित्येक वस्तूंवर उमटलेलीं असतात आणि ' माझ्याकडे पहा, मला विसरूं नकोस ' असें आपल्याला केंविलवाण्या स्वरानें सांगत आहेत असें आपल्याला वाटत असतें. पुष्कळदां आपल्या बाल्याशीं अगदीं निगडित झालेल्या एखाद्या जुन्या स्थळाचें दर्शन झाल्याबरोबर भूतकाळचा सारा अद्‌भुतरम्य चित्रपट आपल्याला मनःपटलासमोर उभा राहातो.

मी एकदां घरीं गेलों असतां समुद्रकांठीं परंतु अगदीं बाजूस असलेल्या एका रम्य स्थळावर फिरावयास गेलों. या ठिकाणीं माडाचीं झाडें अगदीं समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत लावलेलीं आहेत आणि त्यांमध्यें एका रसिक गृहस्थानें फिरावयास येणाऱ्या लोकांकरितां एक सुंदर बैठक बांधलेली आहे. तें स्थळ कितीतरी रमणीय आहे. आजूबाजूस असलेल्या अमृतवृक्षांमधून वारा सुंदर गाणीं गात एकसारखा नाचत असतो आणि समोरच आपल्या पायाखालीं सागराचा अफाट विस्तार पसरलेला दिसतो. मी त्या स्थळीं जाऊन बसलों आणि मावळत्या सूर्याच्या स्मितानें सुंदर दिसणाऱ्या समोरच्या आकाशाकडे पहात राहिलों. इतक्यांत माझ्या कुमारावस्थेंतील अनेक स्मृति सागराच्या अथांग पृष्ठावर विहार करणाऱ्या असंख्य वातलहरींप्रमाणें माझ्या मनांत धांवत आल्या. हायस्कुलांत असतांना एके दिवशीं आह्मीं सहासात अगदीं जिवलग मित्र त्याच जागीं जमलों होतों. मॅट्रिकची परीक्षा जवळ आल्यामुळें आह्मां सर्वांची पांगापांग व्हावयाची होती. परंतु आमची ही मैत्री आजन्म टिकावी आणि परस्परांना एकमेकांचा विसर पडूं नये म्हणून आह्मीं असें ठरविलें कीं, त्या दिवसापासून बरोबर बारा वर्षांनीं आह्मीं सर्वांनीं

त्याच स्थळीं जमावयाचें आणि सुखदु:खाच्या गोष्टी करावयाच्या परंतु त्या दिवसाची स्मृति झाल्याबरोबर मात्र चरकलों. कारण आमची ती योजना भूतकाळांतच विरून गेली होती. मी त्या ठिकाणीं गेलों त्या वेळीं त्या दिवासाला चौदा वर्षे होऊन गेलीं होतीं आणि आमचा तो विचार म्हणजे कुमारत्वांतील एक निर्जीव सुखस्वप्न ठरलें होतें. परंतु मीं या चौदा वर्षांतील आह्मां सर्वांच्या जीवनावरून दृष्टि फिरविली तों काय दिसलें ? आम्हांपैकीं दोघे तारुण्यांतच मृत्युमुखीं पडले होते आणि बाकीचे सर्व कमजास्त प्रमाणांत जीवनाशीं झुंज खेळत महाराष्ट्राच्या चार कोपऱ्यांस फेंकले गेले होते. कदाचित् जर आम्हीं त्या ठिकाणीं जमलों असतों आणि स्वानुभव एकमेकांस सांगितले असते तर आमच्या जीवनांतील तो एक अपूर्व प्रसंग झाला असता. परंतु आमच्या चुकीमुळें त्या आनंदास आह्मी आंचवलों असें वाटून माझें या स्मृतीनें पीडलेलें मन अधिकच खिन्न झालें आणि मी जड पावलांनीं घरीं परत आलों.

माहेर हा शब्द उच्चारल्याबरोबर किती कल्पना मनांत एकदम उत्पन्न होतात ! पुरुषाला बहुधा एकच घर असतें; परंतु विवाहित स्त्रीचें प्रेम मात्र तिच्या विवाहाबरोबर दुभंगलें जातें. तिच्या जीवाभावाचा धनी आणि मुलेंबाळें ज्या घरांत असतील तेंच तिचें घर आणि त्यामुळेंच तिला गृहिणीपद प्राप्त होतें यांत संशय नाहीं. परंतु त्याचबरोबर ज्या घरांत तिनें बाळपणचा आनंद अनुभवला, जेथें विवाह होईपर्यंत मातापितरांच्या, बंधुभगिनींच्या सहवासाचें सुख तिला मिळालें आणि ज्यांतून नव्या घरास प्रथमच जातांना “ कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥ ” या असह्य दु:खाचा तिला अनुभव आला, त्या आपल्या पहिल्या घरास कोणतीच विवाहित स्त्री पारखी होत नाहीं. आणि तिचा संसार

कितीहि सुखाचा असला तरी माहेरास जाण्यास ती कधींहि नाखूष नसते. अर्थात्च माहेरास गेल्याबरोबर तिला विशेष महत्त्व प्राप्त होतें. "अर्थोहि कन्या परकीय एव" या वचनाची पुरी जाणीव असणारे तिचे वडील ती आतां अन्यनामधारी आहे असें जाणून तिच्याकडे प्रेमादरानें पाहूं लागतात. घरांतील अविवाहित भगिनी-पेक्षां आईला तिचाच अभिमान जास्त वाटूं लागतो आणि नवऱ्याच्या घरून परत माहेराला आलेली म्हणून तिच्या भाऊबहिणी तिला विशेष मान देऊं लागतात. महाराष्ट्रभाषाचित्रमयूर कै. आठल्ये यांनीं आपल्या 'माहेरचें मूळ' आणि 'सासरची पाठवणी' या दोन अत्यंत सुंदर आणि साध्या काव्यांत प्रत्येक आर्यकुलवधूच्या हृदयांतील या दुहेरी प्रेमाचें किती समर्पक वर्णन केलें आहे ! आणि मला वाटतें कीं, शाकुंतलाच्या सर्वोत्कृष्ट अशा चौथ्या अंकाचें अप्रतिमत्व त्यांतील आर्यसंस्कृतीच्या यथार्थदर्शनांत आणि विवा-हित आर्य स्त्रीच्या त्या रमणीय मनःचित्रांतच आहे. घरापेक्षां माहेर हें अस्वार्थी प्रेम आणि आपलेपण अगर ममता यांचेंच विशुद्ध प्रतीक आहे. घर या शब्दांतील स्वार्थतेची अगर मालकी-पणाची भावना अथवा व्यावहारिकता त्यांत नाहीं व त्यामुळें 'मूळ घराला । मी जातें ग माहेराला !' असें म्हटल्याबरोबर जें चित्र नेत्रांपुढें उभें राहतें, तें 'घरीं परत' असें म्हटल्यानें राहूं शकत नाहीं.

परंतु ही जीवितयात्रा संपवून आमचें जें खरें माहेर, ज्याला कोणी देवाचें घर म्हणतात, तिथें जातांना मात्र मानवाची अतिशय त्रेधा उडत असते. कारण पति व मुलेंबाळें यांतच गुंगून माहेरास विसरलेल्या एखाद्या स्त्रीप्रमाणें मनुष्यप्राणी संसारांत इतका गुरफटून गेलेला असतो कीं, या वरच्या माहेराचा विचारच त्याच्या मनास

शिवत नाहीं. आणि त्यामुळें जेव्हां तो गमनाचा काळ येऊन ठेपतो, त्याच वेळीं तो दचकून जागा होतो. परंतु यांत त्यास दोष देण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण धर्मानें आणि साधुसंतांनीं कितीहि कंठशोष करून स्वर्गाचा मार्ग दाखवून दिला, तरी हें जीवित टाकून या केवळ कल्पनारम्य स्वर्गाचा मार्ग धरणें अशक्यच होतें. परंतु आपण आपलें इहलोकाचें कर्तव्य केलें आहे अशी पूर्ण जाणीव ज्याला असते, तो या लोकांतून अन्यत्र कुठेंहि जाण्यास डरत नाहीं. तुकारामाप्रमाणें तो प्रशांत वृत्तीनें सर्वांना ‘ आम्ही जातों अमुच्या गांवा। अमुचा राम राम घ्यावा ॥ ’ असें सांगतो आणि हंसतच येथून निघून जातो. किंवा कविवर्य टागोर यांनीं गीतांजलींत वर्णन केल्याप्रमाणें ‘ माझ्या प्रियमित्रांनो, या प्रयाणकाळीं माझें शुभचिंतन करा. हें आकाश पहा, अरुणोदयानें लाल होऊन गेलें आहे. माझा मार्ग तर समोर अगदीं स्पष्टपणें दिसत आहे. मी बरोबर काय नेत आहें याची पृच्छा मात्र करूं नका. रिते हात, उत्कंठित हृदय यांखेरीज मी प्रवासांत नेणार तरी काय ? पण माझा प्रवास पुरा झाला कीं, सायंतारा चमकूं लागेल आणि देवदेवाच्या महाद्वारांतून स्वर्गीय संगीत ऐकूं येईल. ’ अशा थोर आशावादानेंच तो या जगाचा निरोप घेतो. परंतु प्रिय वाचकहो, आपणांस नकोच हा मृत्यूचा विचार. आपलें या जगांतील कार्य अजून संपलेलें नाहीं आणि आपणांस आणखी जगावयाचें आहे. आणि मृत्यु जेव्हां आपल्याला हांक मारील त्या वेळीं आपण हंसतच त्याच्याबरोबर जाऊं. पण आतां मात्र आपण घरोघर जाऊं या आणि आपल्या प्रियजनांच्या आणि मित्रांच्या प्रेमळ सहवासांत या पृथ्वीचें नंदनवन करूं या.

**किर्लोस्कर**
डिसेंबर १९३५

# आमचा सिंधुदुर्ग

आम्हां मालवणकरांना सिंधुदुर्ग किती आपलासा वाटतो याचें मला वर्णन करतां येणार नाहीं. कुणीही मालवणकर कुठूनही मालवणला यायला लागला कीं कमलासनावर बसलेली ही सिंधुदुर्गदेवाची मूर्ति मोठ्या स्निग्धपणें व गंभीरपणें सागराच्या रुपेरी लाटांतून वर येऊन आपणांकडे पहात असलेली दिसून येते. बाष्पनौका मालवण बंदराच्या जवळ येऊं लागली कीं या दुर्गाच्या पाकळ्या एकामागून एक याप्रमाणें आपल्यासमोर उमलतांना दिसतात व प्रत्यक्ष त्याच्या दारांत नौकेनें नागर टाकला कीं या पुराणपुरुषाच्या पवित्र छायेखालींच आपण उभे आहों असें वाटल्याशिवाय राहात नाहीं. बरें, जलमार्गानें न येतां कुणी मोटाररस्त्यानें मालवणला येऊं लागला कीं गांवाच्या सीमेवरूनच दूरवर त्याला पहिल्याप्रथम सिंधुदुर्गाचेंच दर्शन होतें. आणि त्या कातळावरून दूर सर्वत्र पसरलेला क्षीरसागर आणि त्याच्या मांडीवर शेषाप्रमाणें दिसणारा सिंधुदुर्ग! हें दिव्य चित्र किंचित् काल तरी प्रत्येक मालवणकराच्या हृदयांत कालवाकालव केल्यावांचून रहात नाहीं.

परंतु सिंधुदुर्गासारख्या इतिहासपुरुषाच्या पवित्र छायेखालीं

आम्हीं रहात असूनही सिंधुदुर्गाची तुम्हांस काय माहिती आहे व त्यावर काय आहे असें कुणीं आम्हांस विचारलें तर त्यास आम्हांस माहिती देतां येणार नाहीं. सिंधुदुर्ग श्रीशिवछत्रपतींनीं बांधला— त्यांच्या दूरदृष्टीला तें एक उत्कृष्ट असें आरमारी ठाणें वाटलें. त्यांच्या चरणधूलीनें मालवण व त्याच्या आसपासचा प्रांत पवित्र झाला व या दुर्गावरून हिंदुपदपादशाहीनें गोव्यांच्या पोर्तुगीज लोकांना व जंजिऱ्याच्या शिद्दीला चांगलाच शह दिला या गोष्टी खऱ्या असल्या तरी या पुण्यभूमीवर कोणकोणते पराक्रम केले गेले आणि किती तानाजींनीं याच्याकरितां आत्मयज्ञ केले या बाबतींत इतिहास पुष्कळसा मुग्धच आहे. इतकेंच नव्हे तर या किल्ल्याच्या आंत कुणी गेलें तर त्याची कांहीं अंशीं निराशाच झाल्यावांचून राहणार नाहीं. कारण दुरून अत्यंत सुंदर दिसणारीं पण समुद्राच्या क्षारानें अगदीं करपून गेलेलीं नारळीचीं झाडें, दुधबांव, साखर-बांव इत्यादि ऐटदार नांवाच्या पण गोड्या व खारट पाण्याच्या विहिरी आणि काळाच्या प्रचंड चक्राखालीं मोडत चाललेला किल्ल्याचा प्रचंड तट इत्यादि दृश्यें पाहिल्यावर एकाद्याची निराशाच होईल आणि सिंधुदुर्गावर काय आहे? असाच प्रश्न तो करील.

आणि मी देखील पुष्कळदां असाच प्रश्न स्वतःस विचारीत असतों. आमच्या हिंदुस्थानांत गेल्या एक हजार वर्षांत इतकीं राज्यें, शाखा, साम्राज्यें होऊन गेलीं आहेत कीं त्यांचीं नांवें देखील विस्मृत झालीं आहेत व होत आहेत. तथापि या सर्वांचे अवशेष मात्र सबंध हिंदुस्थानभर ठिकठिकाणीं विखुरलले आहेत. महाराष्ट्रानें इतिहासांत कायमचें स्थान मिळविल्याला कांहीं फार वर्षें लोटलेलीं नाहींत. आणि त्यामुळेंच महाराष्ट्रांत तर आमच्या सिंधुदुर्गासारखीं असंख्य स्मारकें जिकडे तिकडे पसरलेलीं दिसून येतात. आपण

महाराष्ट्रांतील लोकवस्तीपासून अत्यंत दूरच्या सर्वथैव मागासलेल्या अशा भागांत गेलों तर तिथें मोडकळीस आलेल्या व अत्यंत उपेक्षित अशा एकाद्या दुसऱ्या ऐतिहासिक स्मारकावर आपले पाय अडकल्यासारखे होतात आणि तेव्हां कुठें आपण कांहींतरी अपवित्र असें कृत्य केलें असें वाटून आपलें मन आपल्याला खाऊं लागतें.

पण या अगदीं दूरच्या स्थानीं जातांना आपग आजूबाजूस पाहूं लागलों कीं काळानें मलीन केलेलीं इतिहासाचीं असंख्य स्मारकें आपल्या करुणाजनक दृष्टीनें आमच्याकडे पाहतांना आम्हांला दिसतात. त्यांच्या त्या पडक्या भिंती, ते तुटलेले बुरूज, मोडत चाललेल्या इमारती आणि कित्येकदां तर आधुनिक वस्त्रांनीं नटविल्यामुळें अधिकच बेढब व करुणास्पद वाटणारीं त्यांचीं शरीरें हें सारें दृश्य मनांत खेदजनक विचार उत्पन्न केल्यावांचून राहात नाहीं. इतिहासापासून भावी पिढीला कांहीं उपदेश मिळतो कीं नाहीं, इतिहासाचा उपयोग काय, इत्यादि प्रश्नांवर पुष्कळच मतभेद असण्याचा संभव आहे. इतिहासाची कांहींहि शिकवण असो, परंतु हीं निर्जीव व मनाला उदास करणारीं ऐतिहासिक स्मारकें पहिलीं व आतांपर्यंतचा इतिहास वाचला कीं, ऐतिहासिक अवशेष स्फूर्तिदायक असें कांहीं कार्य करूं शकतात कीं काय याच्याबद्दल मनांत शंकाच उत्पन्न होऊं लागते.

कारण कोणत्याहि इतिहासप्रसिद्ध स्थलीं तुम्ही जा. तुमच्या समोर उभा असलेला देखावा किती भेसूर आणि उदासवाणा दिसतो! जणूं काय एकादा अत्यंत सुंदर व स्फूर्तिदायक चित्रपट कुणीं दुष्टानें अत्यंत कलाशून्य मनानें विद्रूप व मलीन करून टाकला आहे! महाराष्ट्राच्या पर्वतराजीवर उभा राहून मोठ्या खिन्नतेनें आसमं-

तात्च्या प्रदेशाकडे पाहणाऱ्या कोणत्याहि किल्ल्याकडे तुम्ही पहा. ज्याच्या तटावरील तोफांतून शत्रूवर एकसारखा आगीचा पाऊस पडत होता, ज्याच्या पटांगणांतून स्वारांच्या घोड्यांचा सतत खडखडाट सुरू असे व जो एकवेळ शूर व पराक्रमी वीर स्त्रीपुरुषांनीं गजबजलेला असे, त्याच किल्ल्यावर आतां स्मशानवत् शांतता पसरलेली दिसते. त्याच्या प्रचंड भिंतीकडे पाहिलें तर त्याही काळाच्या क्रूर प्रहारापुढें गरीब झालेल्या अशा मूकपणें पडत चाललेल्या दिसतात. आणि एकवेळ आमच्या राजकारणी व पराक्रमी वीरांचें व त्यांच्या अतुल कारागिरीचें जीवंत स्मारक असा तो अभेद्य म्हटला जाणारा व हनुमानाप्रमाणें वज्रदेही समजला जाणारा दुर्ग आज आतां 'अंगं गलितं' अशी स्थिति झालेल्या एकवेळच्या वीरपुरुषासारखा दिसतो.

परंतु केवळ शून्यदृष्टीनें या मोडकळीस आलेल्या ऐतिहासिक स्थळांकडे पाहून त्यांची जादू कुणासहि समजणार नाहीं. कारण त्यांचें कार्य एकवेळ होऊन गेलें आहे. आणि आज हीं स्थळें केवळ आपल्या एकवेळच्या पराक्रमाची व थोरपणाची अल्पशी स्मृति करून देण्याकरितांच शिल्लक राहिलीं आहेत. म्हणून त्यांच्यावर जाऊन अत्यंत आदरभावानें उभे राहिलों आणि आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर वर्तमानकाळाचें चित्र पालटून त्या तेजस्वी ऐतिहासिक काळांत—वीर व वीरांगना यांनीं गजबजलेल्या त्या जीवंत काळांत—आपण गेलों तरच या पुराण स्थळांच्या जादूची किल्ली आपल्याला हस्तगत होईल. मग तो सबंध कोंकणपट्टीचा रक्षणकर्ता म्हणून बांधलेला सिंधुदुर्ग असो, किंवा तानाजीच्या पराक्रमानें पुण्यमय झालेला सिंहगड असो किंवा रजपुतांच्या तेजस्वितेचें प्रतीक असा चितोड गड असो.

परंतु ही झाली सुप्रसिद्ध ऐतिहासिक स्थलांची गोष्ट. पण आमच्या हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे अनेक इतिहासांचा इतिहास आहे. आणि जे असंख्य राजे, राज्यें व संस्थानें आमच्या आर्यावर्तांत होऊन गेलीं त्यांचीं असंख्य स्मारकें जिकडे तिकडे अव्यवस्थित व प्रसुप्त स्वरूपांत पडलेलीं दिसून येतात. त्यांच्याकडे कोण पाहणार आणि त्यांचा इतिहास तरी कुणाला ठाऊक आहे? आमच्या प्राचीनवस्तुसंरक्षक कायद्यासही अज्ञानामुळें त्या उपेक्षणीय वाटतात. मी एकदा अशाच एका जुन्या किल्ल्यावर गेलों होतों. त्याच्या तटावर उभा राहून मी आजूबाजूस पाहिलें तों किती शांततापूर्ण चित्र होतें तें! जिकडे पहावें तिकडे सपाट व सुपीक अशीं शेतें पसरलीं होतीं व त्यांत नुकतेंच पिकूं लागलेलें पीक उभें होतें. शेतांच्या त्या हिरव्यापिवळ्या शालूच्या एका बाजूस अनेक नागमोडी वळणें घेत जाणारी छोटीशी नदी त्या शालूच्या रुपेरी किनारीसारखी दिसत होती. व शेतांतून बेटांप्रमाणें उभ्या असलेल्या घरांतून धुराचे वेडेवांकडे मेघ अगदीं मंदपणें वरवर सरकत होते. त्या सकाळच्या प्रहरीं हें प्रसन्न शांततापूर्ण दृश्य पाहतांना आपण एका ऐतिहासिक स्थानीं उभे आहों ही गोष्ट मी अजिबात विसरलों. पण ही विस्मृति फार वेळ टिकली नाहीं. कारण त्या निर्जन किल्ल्यावर चरावयास आलेल्या गुरांनीं मला सत्यस्थितीची जाणीव करून दिली. आणि तेंच दृश्य मग मला कितीतरी विरोधी वाटूं लागलें. एकवेळच्या अस्वस्थतेचें, वीरवृत्तीचें व स्वाभिमानाचें रक्षण करण्याकरितां बांधलेला दुर्ग, आज त्याची केंविलवाणी दिसणारी स्थिति, आणि त्याच्या पायथ्याशीं पसरलेली ती शांतता व स्वस्थता असें किती विरोधपूर्ण चित्र होतें तें! आणि तें पाहात असतांना माझें मन परस्परविरुद्ध भावनांनीं भरून गेलें यांत नवल तें काय?

आणि मी हिंदुस्थानचा इतिहास वाचूं लागलों किंवा त्याच्याविषयीं विचार करूं लागलों कीं पुष्कळदां माझी अशीच स्थिति होत असते आणि मन गोंधळून जातें. इतिहास अवश्य शिकविला पाहिजे. त्याच्यामुळें आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची जाणीव नव्या पिढीस होते व त्याच्यापासून तिला स्फुरण मिळतें. इतिहासामुळें राजकारणाचें योग्य ज्ञान आपल्याला होतें अशासारखीं विधानें इतिहासभक्त व इतर लोक अनेकदां करीत असतात. आणि इतिहासापासून कसलातरी संदेश मिळतो अशी खात्री असल्यामुळें केशवसुतांसारखे कवि देखील "ये येथें इतिहासपत्रपडकें वाचूनी पाहीं जरा" असा उपदेश जनतेला करीत असतात. परंतु खरें पाहिलें तर इतिहास प्रत्यक्ष राजकारणांत कितीसा उपयोगी पडतो? आतांपर्यंत आपण राष्ट्रांचा इतिहास वाचला आहे. रोमन साम्राज्याचा अस्त कसा झाला, इंग्लंड वगैरे पाश्चात्य देशांचें आजचें वैभव कोणत्या रीतीनें व गुणांनीं प्राप्त झालें आहे, मराठेशाही व पेशवाई यांच्या ऱ्हासाचीं कारणें कोणतीं या सर्व गोष्टी इतिहासानें खुलासेवार व तात्त्विक पद्धतीनें आह्मांस सांगितल्या आहेत. परंतु मानवी मनाचा सुसंस्कृतपणा वाढविणारें इतर ज्ञानाप्रमाणेंच हें एक साधन यापलीकडे इतिहासाचा उपयोग काय? पाश्चात्य राष्ट्रें व जपानसारखीं पौर्वात्य राष्ट्रें इतिहासापासून काय शिकलीं असें कुणीं विचारलें तर दुर्बल राष्ट्रांना व लोकांना तत्त्वज्ञानाच्या गोष्टी बोलत असतांनाच व मित्रमित्र ह्मणत असतानांच गुलाम बनविण्याची अद्भुत कला तीं शिकलीं असेंच ह्मणावें लागेल. आणि म्हणूनच आपण स्वार्थानें व दुष्टपणानें केलेल्या परार्थविहाराच्या समर्थनाकरितां कोणी राष्ट्रें इतिहासाचा दाखला दाखवूं लागलीं कीं सैतानानें बायबलचा आधार दाखवावा अशासारखा प्रकार दिसूं लागतो.

केवळ ऐतिहासिक स्थानांना व आपल्या पूर्वजांच्या कर्तब-

गारीला महत्त्व देऊन त्यांच्या गौरवानें आपलें महात्म्य वाढविण्याचा प्रयत्न करणें हें वरील प्रयत्नाइतकें वाईट नसलें तरी मूर्खपणाचें आहे यांत मला मुळींच संशय वाटत नाहीं. आमच्या पूर्वजांनीं पुष्कळ पराक्रम गाजविले, लढाया जिंकल्या, कृष्णाकांठच्या घोड्यांना अटकेपारचें पाणी पाजलें आणि शत्रूंना पळतां भूमि थोडी केली या गोष्टी अभिमानास्पद खऱ्या; परंतु हा अभिमान व आपल्या पूर्वजांच्या मोठेपणाची जाणीव हें आमच्या मोठेपणाचें लक्षण नव्हे. कारण आमच्या कांहीं पूर्वजांनीं जें आपल्या शौर्यानें व कर्तबगारीनें मिळविलें तें दुसऱ्या पूर्वजांनीं आपल्या मूर्खपणानें गमाविलें आणि त्यांचे आजचे वंशज मूर्खहि नाहींत, कर्तबगारहि नाहींत तर अस्थिवत् मात्र आहेत. आणि अशी स्थिति असतांना निर्बुद्धपणें एकादा स्मृतिजीवि व कर्तव्यशून्य मनुष्य आपल्या पूर्वजांच्या कृतींच्या स्मृतीवर जगेन असें म्हणूं लागला तर त्यास कुणीही शहाणा म्हणणार नाहीं. इतकेंच नव्हे तर जुन्या पडूं लागलेल्या ऐतिहासिक स्थानांकडे पाहून ‘ हीं आमच्या पूर्वजांचीं स्मारकें, त्यांच्या पराक्रमाचीं दिव्यस्थानें ’ अशासारखे उद्गार काढण्याचा हक्कहि त्यास नाहीं. फार तर त्याला असें ह्मणतां येईल कीं एका इतिहासप्रसिद्ध किंवा एकवेळ पराक्रमी पुरुषांनीं गजबजलेल्या पुण्यभूमींत आपण रहात आहों व हें आपल्या भाग्याचें मोठें लक्षण आहे.

आमच्या सिंधुदुर्गासमोर जाऊन बसलों आणि त्याचें तें धीर-गंभीर स्वरूप पाहिलें कीं हाच विचार पुष्कळदां माझ्या मनांत येत असतो. सिंधुदुर्गावरून ओखळलें जावें अशी आम्हां मालवण-करांची इच्छा नसली तरी या पुण्यपुरुषाचें अस्तित्व व त्याचें वाता-वरण आम्हांस कधीं विसरतां येत नाहीं. दिवसरात्र, वारापाऊस थंडीऊन, यांची कदर न बाळगतां तो एकाद्या तपस्व्याप्रमाणें निस-

र्गाला हंसत उभा असलेला दिसतो. पावसाळ्यांत मेघराज त्याच्या मस्तकावर अंतराळीं दुसरे सिंधुदुर्ग रचतो, मधुन मधून चपला याला गिळूं कीं खाऊं अशा रागानें याच्यासमोर आपले फूत्कार सोडीत असते. आणि सर्व बाजूला खवळलेला पावसाळी सागर याला आत्मसात करण्याची पराकाष्ठा करीत असतो. अशावेळीं याच्याकडे पाहिलें व त्याची ती अभेद्य शांतता पाहिली कीं त्याच्याविषयीं प्रेमानें व अत्यादरानें मन भरून गेल्याशिवाय रहात नाहीं व काळाशीं टक्कर देणाऱ्या मानवी पराक्रमाचें, धैर्याचें व कर्तब्रगारीचें तर हें मूर्तिमंत स्वरूप नसेल ना असेंही वाटूं लागतें. श्रीशिवछत्रपतींनीं याच्यावर आपला झेंडा स्वतः फडकविला असेल किंवा नसेल, ते त्याच्यावर आले असतील किंवा नसतील, परंतु त्यांच्या कर्तृत्वाचें व थोरपणाचेंच सिंधुदुर्ग हें निशाण आहे असें मानण्यास कोणती हरकत आहे ?

अशाच मनःस्थितींत मी एका दिवाळीच्या रात्रीं सिंधुदुर्गासमोर बसलों होतों. त्याच्यासमोरच्या माडांतून रंगीबेरंगी आकाशदिवे, पणत्या व इतर दिवे चकाकत होते. जिकडे तिकडे दिवाळीचा एकच आनंद फटाके, आरोळ्या इत्यादि मार्गांनीं प्रकट होत होता. दिवाळीच्या जादूनें कीं काय कोणजाणे, समुद्रहि त्या दिवशीं अगदीं शांत होता व आनंदानें मंदमंद आवाज करीत होता. पण या आनंदोत्सव प्रसंगीं देखील सिंधुदुर्ग सुतक असल्यासारखा मुकाट्यानें काळोखांत उभा होता आणि दीपावलीचा एक किरण देखील त्याच्यापर्यंत पोंचला नव्हता. त्याच्याकडे पाहून अनेक खेदजनक विचार माझ्या मनांत आले. मला वाटलें कीं एकवेळ अनेक पराक्रम पाहिलेला हा दुर्ग आजची आमची केविलवाणी अवस्था पाहून दुःखीकष्टी झाला असेल आणि मीं मनांत म्हटलें कीं, ‘ हे सिंधुदुर्ग

देवा, दीपावली साजरी करण्याचा अधिकार आह्मांस नाहीं हें खरें आहे. पण आज उद्यां तुझ्या आशीर्वादानें, तुझ्या स्फुरणानें व स्मृतीनें आह्मीं जागृत होऊं. आणि मगच आमची खरी दीपावली आह्मी इतरत्र साजरी न करतां ती केवळ तुझ्या तटावर दीपपंक्ती उजळून साजरी करूं. तोंपर्यंत मात्र तूं आह्मांस आपलें स्फुरण व संदेश एकसारखा देत रहा.' असे विचार माझ्या मनांत येत आहेत इतक्यांतच सिंधुदुर्गासमोरचें समुद्राचें पाणी एकदम रुपेरी झालें. मीं ह्मटलें कीं प्रत्यक्ष दीपावली देवीच सिंधुदुर्गावर उतरत नसेल ना! ह्मणून मीं वर पाहिलें तों एक तेजस्वी तारा अंतरिक्षांत प्रकाश-फुलांचा सडा घालीत सिंधुदुर्गावरच उतरत होता, व मी पहातां पहातां तो खालीं उतरून दुर्गांतच विलीन झाला. मीं त्याला नमन केलें व ती माझी दिवाळी साजरी झाल्यासारखेंच मला वाटलें.

उषा
अंक २ रा

# तो आणि ती

परवांच एका स्नेह्याच्या घरीं गेलों असतां त्या ठिकाणीं तो व त्याची पत्नी यांचा एक मनोरंजक संवाद ऐकण्याचा योग आला. आमच्या वहिनीच्या एका मैत्रिणीचें सुमारें एक वर्षापूर्वी लग्न झालें होतें. पण लग्नानंतर पतीचें व तिचें बिनसल्यामुळें ती रागावून माहेरीं गेली होती. पण तिच्या नवऱ्यानें नमतें घेऊन तिला प्रेमाचा अत्याग्रह केल्यामुळें ती परत त्याच्याकडे आली होती व तिथूनच तिनें आपल्या या परत थाटलेल्या संसाराचें वर्णन करणारें एक पत्र आमच्या वहिनीस पाठविलें होतें.

माझा स्नेही गोविंदराव व मी बोलत बसलों असतां वहिनी तें पत्र फडकावीत तिथें आली आणि विजयोत्साहाच्या आवाजांत आपल्या पतीस म्हणाली, "ऐकलं का सुधाताई काय म्हणते ती? आतां वसंतराव तिच्यावर इतकं प्रेम करूं लागले आहेत, कीं तिला त्रास होऊं नये म्हणून त्यांनीं गांवाहून आपल्या आईला स्वयंपाक करायला आणलं आहे!"

यावर गोविंदराव अगदीं निरुत्साहाच्या आवाजांत म्हणाले, " गाढव दिसतो बेटा ! रागावून माहेरीं गेलेल्या बायकोला परत बोलावलीन् हा एक मूर्खपणा केलान् आणि आतां आईला स्वयंपाकाला आणलीन्. भारीच प्रेम दिसतं बायकोवर ! "

आमच्या वहिनीच्या कानांत हे शब्द जळजळत गेले असावे. कारण ती म्हणाली, " वा वा ! कसला मूर्खपणा म्हणतां ? बायको घरांत आल्याबरोबरच जर वसंतराव तिचा अपमान करूं लागले, तर तिनं माहेरीं जाण्यांत कसली चूक केली ? आणि वसंतरावांनीं तिला परत बोलाविली यांत त्यांचं कुठं चुकलं ? "

पण गोविंदराव शांतपणानें उत्तरले, " तुझी सुधा मोठी शहाणी म्हणून या थराला ही गोष्ट गेली. नवरा जरा बोलला म्हणून जर उद्यां बायका घरं सोडायला लागल्या तर मग संसारच नको करायला मुळीं ! तुझी सुधा शिकलेली म्हणून तर तिला ही गोष्ट आधीं समजायला पाहिजे. "

या वादांत मी आतांपर्यंत केवळ श्रोताच होतों; पण आतां माझ्यानें राहवेना. मी म्हटलें, " वहिनी, गोविंदराव म्हणतो तें अगदीं खरं आहे. लग्न झाल्याबरोबरच बायकोनं इतका ताठरपणा नको करायला. नवऱ्याच्या स्वभावाची जरा माहिती करून घ्यावी व मग काय करायचं असेल तें करावं. मला तरी तो एक गरीब खुळा माणूस दिसतो. नाहींतर बेट्यानं म्हाताऱ्या आईला स्वयंपाकाला आणली नसती. "

आपल्या पतीच्या जोडीला दुसरा एक पुरुष मिळाला हें पाहतांच वहिनी अधिकच चिडली. कारण चहाचें पाणी ठेवलेला स्टोव्ह आंत अधिकच भडकत चालला होता व त्यावर आणखी पंपचा आवाज होत होता. माझे शब्द ऐकतांच ती म्हणाली,

" ह्मणजे तुह्मांला वाटतं कीं लग्न झाल्याबरोबर नवऱ्यानं बायकोचा अपमान करायला सुरवात करावी व तिनं मुकाट्यानं बसावं, असंच ना ?"

मी ह्मणालों, "छे, असं कोण ह्मणेल ? पण नवऱ्यानं जरा चूक केली ह्मणून बायकोनें ताबडतोब रागावणं बरं का ? या वादांत मला तरी एकंदरींत तुमची सुधाच जरा जास्त शहाणी दिसते आहे."

यावर "तुम्हीदेखील पुरुषच ! तुम्हांला वाटतं लग्न केलं कीं घरांत एक मोलकरीण किंवा स्वयंपाकीण आणली. दुसरं काय !" इतकेंच फणकाऱ्यानें बोलून वहिनी पेल्यांत चहा गाळूं लागली. यावर मी काय उत्तर देणार ? मुकाट्यानें आपला मूळ गिळून बसलों.

पण इतक्यांत घरांतून गरमागरम चहा आला आणि हा वाद कसातरी विसरला गेला.

असले प्रेमकलह म्हणजे वैवाहिक जीवनांत उत्पन्न होणारीं लहानशीं वादळेंच. प्रत्येक पतिपत्नीच्या जीवनांत यासारखीं वादळें मधूनमधून उत्पन्न होतात व तीं लवकर विसरल्यासारखींहि होतात. परंतु त्यांच्या बुडाशीं एक प्रकारची मनोवृत्ति असते यांत शंका नाहीं. पुरुष श्रेष्ठ कीं स्त्री श्रेष्ठ, त्या दोघांचें संसारांत कोणतें नातें असावें, स्त्रीला गृहस्वामिनी या पोकळ पदवीपेक्षां कांहीं विशेष अधिकार असतो किंवा नाहीं, हे प्रश्न अत्यंत भानगडीचे आहेत आणि जोंपर्यंत ते समाधानकारकपणें सुटलेले नाहींत, तोंपर्यंत पति-पत्नी किंवा स्त्रीपुरुष यांच्यामध्यें परस्परांविषयीं विशिष्ट मनोगंड निर्माण होणार हें निर्विवाद आहे. 'तो व ती' हें परमेश्वरानें निर्माण केलेलें एक कधीं न सुटणारें कोडें आहे. जोंवर पुरुषानें सर्व

सत्ता आपल्या हातांत ठेविली होती–किंबहुना जोंवर परिस्थितीनेंच पुरुषाच्या हातांत सत्ता दिलेली होती, तोंवर त्यानें हें कोडें वेगळ्या रीतीनेंच सोडविलें होतें. ग्रीस देशांत कोणालाहि न सुटलेली गॉर्डियन गांठ ज्याप्रमाणें एका ग्रीक वीरानें तरवारीनें तोडून टाकली होती, त्याचप्रमाणें पुरुषानें आतांपर्यंत स्त्रीजातीला गुलाम करूनच हें कोडें सोडविलें होतें. परंतु आतां पूर्वींची परिस्थिति राहिलेली नाहीं आणि त्यामुळें दिवसेंदिवस हें कोडें अधिकाधिक बिकट होत चाललें आहे. "स्त्री ही पुरुषाच्या मार्गांतील एक धोंड आहे काय?" अशासारख्या निरर्थक विषयांचा खल आज पुरुष (विशेषतः आधुनिक तरुण) करीत आहेत. याचा अर्थ हाच कीं पुरुषांचें आसन आतां डळमळूं लागल्यामुळें ते नुसते वावदूक होत चालले आहेत.

आतांपर्यंत अनेक ब्रह्मचाऱ्यांपासून तों शंभर पुत्र असलेल्या वशिष्ठ मुनीपर्यंत अनेक अधिकारी व अनधिकारी लोकांनीं हें कोडें उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. पण 'तो व ती' या दोन साध्याच सर्वनामांच्या मागें केवढें ब्रह्म लपलें आहे याचा बोध अजून कोणासच झालेला नाहीं व तो यापुढेंहि होईल कीं काय याची शंकाच आहे! आमचे श्रुतिस्मृतिकार एवढे विद्वान् व व्यवहारचतुर, पण त्यांना देखील स्त्रियांच्या बाबतींत कोणती दृष्टि ठेवावी हें चांगलें न समजल्यामुळें, आपल्या ग्रंथांमधून त्यांनीं अनेक परस्परविरोधी वचनें विखरून ठेविलीं आहेत. त्यामुळें 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' व 'गृहिणी सचिवः सखी मिथाः। प्रियशिष्या ललिते कलाविधौ॥' या दोन परस्परविरोधी वचनांच्या पंचक्रोशींत पडणारीं सर्व प्रकारचीं मतें आमच्यामध्यें दिसून येतात आणि प्रत्यक्ष आचरणांत पहावें तर तिसराच प्रकार! बायकोला द्यूतामध्यें पणाला लावून तिला

पुन्हा एकदां गुलाम केल्यानंतर देखील धर्म धर्मराजच राहतो व अजातशत्रू या पदवीला पात्र होतो ! पण आमच्या मानानें पाश्चात्य लोक पडले मोठे धूर्त ! ' Give none thy tongue' हा हॅम्लेट-मधील उपदेश ते शिरसावंद्य मानीत असल्यामुळें ते कधींच खुळें मतप्रदर्शन करीत नाहींत. ह्मणूनच 'A woman has no soul' असें ठाम मत मनांत धरून त्यांनीं प्रथम स्त्रीला आपली बटिक बनविली. पण हळूहळू ती प्रबळ होत आहे असें दिसतांच शूरपणानें त्यांनीं मागें पाय घेऊन नाहींनाहीं ह्मणतां तिला तिचे सर्व हक्क देऊन टाकले आणि आपल्या औदार्याचा व स्त्रीदाक्षिण्याचा डंका वाजविण्यास प्रारंभ केला. पण यावरून पाश्चात्य देशांत हा प्रश्न सुटला आहे असें मात्र कोणी समजण्याचें कारण नाहीं. तिकडेहि पुरुष अजून आपल्या पुरुषपणाला विसरलेले नाहींत व स्त्रीहि आपल्या स्त्रीत्वाला विसरलेली नाहीं.

अर्थातच स्त्री व पुरुष यांच्या परस्पर नात्याचा विचार करतांना पुरुषाची दृष्टि त्याच्यावर कित्येक शतकें झालेल्या संस्कारामुळें साफ राहणार नाहीं हे उघड आहे. स्त्रीजातीविषयीं बोलतांना त्याला आतांपर्यंत ' पायांतली वहाण पायांतच ' असली भाषा वापरायची सवय झालेली. तेव्हां त्यास स्त्रीस्वातंत्र्य, बायकांचे समान हक्क, पुरुषांची बरोबरी, पुरुषांबरोबर स्पर्धा, इत्यादि शब्दप्रयोग कटु वाटावे यांत नवल नाहीं. A Doll's House मधील नोरानें पतीच्या कोत्या दृष्टीला कंटाळून व रागावून चूल व मूल यांचा त्याग केला, हें दृश्य नाटकांत पाहून व्हिक्टोरियाच्या युगांतील पुरुषांना या मनोवृत्तीमुळें जेवढा धक्का बसला तेवढा पत्नीच्या या अनपेक्षित व भयंकर वाटणाऱ्या वृत्तीनें प्रत्यक्ष नोराच्या पतीलाहि बसला नसेल. पण आपल्या हातांत अमर्याद सत्ता ठेवणारा पुरुषसिंह आर्यवीर

हिटलर याच प्रकारची पुरुषी वृत्ती दाखवूं लागला आहे. जर्मन स्त्रियांनीं यापुढें पुरुषांशीं स्पर्धा किंवा बरोबरी करण्याचें सोडून जर्मन राष्ट्राला सैनिक पुरविण्याचेंच महत्त्वाचें कार्य करावें अशा प्रकारचा वटहुकूम त्यानें काढला आहे. जर्मन स्त्रियांना या जुलमी व एकतर्फी हुकुमाबद्दल काय वाटतें तें समजण्याला अर्थात्‌च कांहीं साधन नाहीं. परंतु वरेरकरी नायिकांच्या सांप्रदायाच्या अनेक आर्य स्त्रियांना हा हुकूम आणि विशेषतः त्याच्या बुडाशीं असलेली मनोवृत्ति चीड आणील यांत शंका नाहीं.

त्या मानानें पुरुषांच्या बाबतींत स्त्रियांची मनोवृत्ति इतकी अनुदार नसते. अनेक शतकांच्या संस्कारामुळें त्यांना पुरुषाबद्दल एक प्रकारचा आदरभावच वाटत असतो व संस्कारामध्यें कसलाहि भागीदार मिळाला तरी त्याच्याबरोबर साहचर्य करावयास त्या तयार होतात. पुरुष मानसशास्त्रज्ञ या मनोवृत्तीस आपल्या लघुत्वाची जाणीव अशा प्रकारचें नांव देतील व गुलामगिरी स्त्रीच्या रोमरोमांत मुरली आहे असें मोठ्या प्रौढीनें म्हणतील. परंतु एकदां स्त्रीला आपल्या अधिकाराची जाणीव झाली व आपला योग्य दर्जा व अधिकार मिळविण्याचा तिनें निश्चय केला कीं ती केवढ्याहि प्रबळ पुरुषी सत्तेस व जुलुमास जुमानणार नाहीं हें इतिहासानें सिद्ध केलें आहे. स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ करणाऱ्या पांखर्स्टबाईसारख्या आंग्ल स्त्रियांच्या अंगीं तर पुरुषी जुलुमाबद्दल इतका द्वेष भरला होता, कीं सारें विश्वच स्त्रीमय करावें असेंच त्यांना वाटत असे. एकदां पांखर्स्टबाईच्या मुलीनें देवाविषयीं बोलतांना ‘ तो देव ’ असा शब्दप्रयोग केला. त्याबरोबर एकदम चिडून जाऊन बाई आपल्या मुलीला म्हणाली, “ देव हा पुरुषच आहे याला प्रमाण काय ? देव ही स्त्रीच असली पाहिजे. ” ज्या ज्या वेळीं कोणत्याहि चळवळीमध्यें स्त्रियांनीं पुढाकार

घेतला आहे, त्या त्या वेळीं आपली अगदीं पुरातन काळापासूनची मनोवृत्ति विसरून त्यांनीं असलीच बाणेदार वृत्ति प्रकट केली आहे. गेल्या हिंदी स्वातंत्र्यलढ्याच्या वेळीं प्रकट झालेल्या अनेक छोट्या लक्ष्मीबाई, स्पेन व चीनमधील आजच्या तेजस्वी स्त्रिया व बुरख्याच्या व जनानखान्याच्या काळोखांत कित्येक शतकं कुजत ठेविल्या तरी क्षणार्धांत आपलें तेज प्रकट करणाऱ्या तुर्की महिला हीच गोष्ट सिद्ध करीत नाहींत काय?

स्त्री व पुरुष यांच्या नात्याचा विचार करतांना साहजिकच पति व पत्नी ही जोडी दृष्टीसमोर उभी राहते. माता, भगिनी, कन्या, इत्यादि प्रकारांनीं स्त्रीचें पुरुषाशीं नातें असलें तरी पत्नी हें एक नातें उत्पन्न होतांच स्त्रीभोवतीं एक वेगळीच सृष्टि निर्माण होते हा सर्वसामान्य अनुभव आहे. रस्कीन यानें Lilies या आपल्या सुंदर व्याख्यानांत संसार हें एक उद्यान कल्पून या उद्यानाची स्त्री ही राणी आहे व हें उद्यान शक्य तितकें मनोहर व सुखकारक करणें सर्वस्वीं तिच्या हातांत आहे, असें सांगितलें आहे; तर कालिदासानें पत्नीला संसारसाम्राज्याची मंत्री, नवऱ्याची जिवलग मैत्रीण व त्याची आवडती शिष्या अशीं विशेषणें देऊन संसारांतील तिच्या त्रिविध कार्याचें गोड वर्णन केलें आहे. आपल्या नवरेपणाची फाजील जाणीव नसलेला मनाजोगा नवरा मिळाला व स्वतः स्त्री जास्त शहाणी नसली, तर पत्नीला तिच्या जीवनांत वरील पद प्राप्त होतेंच होतें. यामुळेंच कौमार्यावस्थेंत अगदीं लाजाळु, भिडस्त व गरीब असणाऱ्या अनेक युवती लग्न होऊन संसार करूं लागतांच अत्यंत धीट व व्यवहारचतुर होतात आणि आजीबाईसारख्या गोष्टी करूं लागतात. कारण कोणतीहि स्त्री भगिनी किंवा कन्या हें नातें सोडून आपल्या पतीच्या राज्याची राणी या श्रेष्ठ नात्यानें वावरूं लागतांच पित्याच्या

घरीं सुप्त असलेलें तिचें आत्मत्व जागें होतें व ती खऱ्या अर्थानें घरधनीण होते.

पण पुरुषाचें मात्र तसें नाहीं. कारण बंधु किंवा पुत्र इत्यादि नात्यांनीं बांधलेला पुरुष पति हें नवें नातें प्राप्त होतांच आपलें व्यक्तिमत्व विसरत नाहीं किंवा कमीहि करीत नाहीं. परंतु या नव्या पद्धतीमुळें मात्र त्याचें व्यक्तिमत्व द्विधा होऊन जातें. पति ज्या अर्थानें पत्नीचा धनि असतो त्याच अर्थानें तिचा गुलामहि असतो. म्हणून पिता, मित्र, बंधु, पुत्र, सेवक, समाजाचा घटक, इत्यादि नात्यांनीं बांधलेली पुरुषाची व्यक्ति वेगळी व पति या नात्यानें बांधलेली त्याच पुरुषाची व्यक्ति वेगळी. कारण संसार ही प्रेमाच्या भांडवलावर उभारलेली एक प्रकारची भागीदारी आहे. यांत जितका स्वार्थ कमी तितका फायदा अधिक. जितकी परस्परसेवा जास्त, तितकी ती भागिदारी अधिक टिकाऊ. आणि देणाराला व घेणाराला दोघांनाहि उदारपणा अत्यंत किफायतशीर जर कुठें होत असेल तर तो येथेंच. म्हणूनच पति हें नातें प्राप्त होतांच कांहीं काळ तरी पुरुषाला आपलें दुसरें व्यक्तिमत्व विसरावें लागतें. ऑफिसांत किंवा आपल्या व्यवसायांत कर्दनकाळ किंवा अत्यंत कठोर वाटणारे अनेक पुरुष घराची पायरी चढतांच अगदीं वेगळे माणूस होतात ते यामुळेंच.

परंतु आदर्श पतिपत्नी—प्रेम आणि वस्तुस्थिति यांत पुष्कळदां भयंकर तफावत असते. नवराबायकोच्या जोड्या ब्रह्मदेवानें आगाऊच ठरवून ठेवलेल्या असतात असें म्हणतात; आणि कुठूनतरी कशींतरी जमलेलीं लग्नें पाहिलीं म्हणजे त्या म्हणण्यावर विश्वास ठेवावा असें वाटूं लागतें. सुदाम व दामिनी किंवा गोकूळ व मथुरा यांच्यासारख्या अत्यंत विरोधी मनोवृत्तीच्या जोड्या निर्माण करून आणि जन्मभर

त्यांना लग्नाच्या बेडींत अडकवून ठेवून ब्रह्मदेव काय मिळवीत असेल तें तोच जाणे! परंतु ज्यांचें वैवाहिक जीवन ह्मणजे एक आमरण खडाष्टक किंवा असमाधान, अशा प्रकारच्या जोड्या समाजांत मधूनमधून दिसत असतात हें मात्र खरें. नोवेल कॉवर्ड यानें एका नाटकांत म्हटल्याप्रमाणें अशा प्रकारच्या जोडया विवाहानें निर्माण करणें हें दोन भयंकर स्फोटक द्रव्यें एका बाटलींत घालून ती बाटली व्यवस्थितपणें गच्च बंद करून ठेवण्यासारखेंच आहे. ज्यांचें वैवाहिक जीवन याप्रमाणें एक प्रकारची रणभूमि झालेली आहे अशा दुर्दैवी पतिपत्नींकरितां मोफतचा पोक्त सल्ला देणारे व त्यांचें जीवन आपल्या घरगुती तत्त्वज्ञानानें आनंदमय करूं पाहाणारे महाभाग कांहीं थोडे नाहींत. परंतु 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' असें म्हणणें वेगळें आणि नेहमीं ज्वालामुखीच्या मुखाजवळ राहण्याची सवय जडलेल्या युग्मांचीं भांडणें मिटविण्याचें काम वेगळें!

माझ्या माहितीच्या एका जोडीचें जीवन अशा नमुन्याचें होतें. दोघांनाहि रोज तंटे केल्याशिवाय चैनच पडत नसे. परंतु या जोडीपैकीं ती जरा कांकणभर अधिक जोरदार व कधीं माघार न घेणारी असल्यामुळें त्याला रोज कांहींतरी प्रसाद मिळत असे. रोजची लढाई संपल्यावर तीं दोघें आपापल्या कागाळ्या घेऊन साहजिकच शेजाऱ्यांकडे जात. मग परक्यांच्या देखत तरी आपला नवरेपणा गमावूं न देणारा नवरा बायकांच्या दुर्गुणांबद्दल त्या शेजाऱ्यांना एक भयंकर व्याख्यान ऐकवीत असे. पण त्याची पत्नी मात्र केवळ पुरुषजातीवरच तुटून न पडतां आपल्या नवरोजीच्या गुणांचेंच (?) एक आख्यान लावीत असे. तिची मुख्य तक्रार अशी होती कीं "मी एक वेळ रागानं यांच्यावर हात टाकला तर यांनीं माझ्यावर कां उलटावं!" या दोघांना ते शेजारी युक्तीच्या कसल्यातरी गोष्टी

सांगत असतील त्याची कल्पनादेखील मला करवत नाहीं !

असल्या स्फोटक प्रकृतीच्या पतिपत्नींशिवाय इतरहि अनेक प्रकारचीं विसंवादी युग्में संसारांत दिसून येतात. यांत त्राटिका व तिनें गुलामापेक्षांहि दीन करून सोडलेला पति, सुप्रसिद्ध पत्नी व तिचा पति एवढेंच अस्तित्व असलेला नवरा, सुलतानशाही गाजविणारा पति व त्याची गायीसारखी गरीब दुबळी पत्नी, किंवा परस्परांशीं तंटा केला नाहीं तरी पतिपत्नींचें प्रेमळ नातें मुळींच नसणारीं नवराबायको, इत्यादि अनेक जोड्यांचा समावेश करतां येईल. या सर्व युग्मांचें वर्णन मला करावयाचें नाहीं; पण यांच्यामध्यें त्राटिका व तिचा दुबळा पति ही जोडी मला मोठी मजेदार वाटते ही गोष्ट मी प्रांजलपणें ( माझ्या पुरुषपणास जागून ) कबूल करतों. आपल्या नवऱ्याचें व्यक्तिमत्व नाहींसें करून आपल्या बाणेदारपणानें त्यास केवळ गुलाम बनविणाऱ्या असल्या वीरांगना मला नेहमीं आदरणीय वाटतात. आपल्या पतीवरील त्यांचा अंमल करडा होत असेल, पण त्यांना आपल्या पतीबद्दल प्रेमादर वाटत नाहीं असें म्हणण्याचें धाष्टर्य ( निदान त्यांच्यादेखत ) कोण करील ? असल्या त्राटिकांच्या पतींचें जीवन ह्मणजे एक प्रकारची दयापूर्ण सुलतानशाही असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण आनंदीबाईसारख्या स्त्रिया जर आपल्या पतींना तेजस्वी करीत असतील, तर झांटिपी व जिजाईसारख्या स्त्रिया सॉक्रेटीस–तुकारामासारख्या आपल्या पतींना सहनशीलतेचे धडे देऊन त्यांना संत होण्यास मदत करीत असतील ! तथापि या सुलतानांच्या पतींची अवस्था मोठी करुणास्पद असते हें कोणतीहि सामान्य पत्नीदेखील कबूल करील. एकीकडे त्यांना आपल्या नवरेपणाची जळजळीत जाणीव होत असते, तर दुसरीकडे केवळ आपल्या आठवणीनेंच काळजाचें पाणी करणाऱ्या घरच्या

धनिणीची अत्यंत कटु जाणीव होत असते. विवाहानंतर लग्नाची बेडी आपल्या हातापायांभोवती अधिकाधिक घट्ट बसत आहे हें कळून येतांच ते पुष्कळदा तिची मिठी सैल करण्याचा प्रयत्न करीत असतात; पण हळूहळू घरच्या सुलतानशाहीचा जोर इतका वाढतो, कीं ते सारा प्रयत्न सोडून देतात आणि आपलें नवरेपण अजिबात विसरून जातात. एक नवरा या नात्यानें या सर्व पुरुषानां मी एवढेंच सांगतों कीं, "बाबांनो, तुमच्या कैकेयीचा जाच कमी व्हावा अशी प्रार्थना आम्हीं नेहमीं परमेश्वराकडे करीत असतों."

मला वाटतें, कीं असल्या प्रकारचीं विसंवादी युग्में पाहूनच अनेक लोक विवाह हें एक गौडबंगाल आहे किंवा तो म्हणजे एक प्रकारची लॉटरी किंवा सोडत आहे अशीं विधानें करीत असतात; तर कित्येक विवाहित लोक " वाटेल तें करा, पण लग्न करण्याचा मूर्खपणा कधींहि करूं नका " असा अविवाहित तरुणांना उपदेश करीत असतात; स्वतःच्या वेड्यावाकडया अनुभवावरूनच हे लोक वाटेल तीं अनुमानें काढीत असल्यामुळें वर वर्णन केलेलीं मतें नेहमीच एकतर्फी किंवा चुकीचीं असतात व त्यामुळें त्यांना फारसें महत्त्व कोणी देण्याचें कांही कारण नाहीं. विवाहानंतरचें जीवन म्हणजे स्वतःचें व्यक्तिमत्व राखून तें परस्परांकरितां सोडण्याची कला! आणि त्यामुळें पति किंवा पत्नी जितक्या कुशलतेनें व स्वार्थत्यागानें वागतील तितका त्यांचा संसार सुखाचा व प्रेमळपणाचा होईल हें उघड आहे. परंतु कित्येक पतिपत्नींना विवाहाच्या वेळीं बांधलेली लग्नगांठ वेडीवांकडी करून त्यामुळें परस्परांना किती जास्त त्रास होईल तें साधण्याची कला हस्तगत झालेली असते. लग्न झालेल्या लोकांकरितां व लग्न करूं इच्छिणाऱ्या लोकांकरितां व्यावहारिक सल्ला देणारे अनेक तत्त्वज्ञानी आहेत व अमेरिकेसारख्या देशांत तर असला

सल्ला देणें हा एक धंदाच होऊन बसला आहे. पण जोंपर्यंत पतीनें किंवा पत्नीनें संसारास योग्य अशी मनोभूमि तयार केलेली नाहीं, तोंपर्यंत त्यांच्या संसाराला रणक्षेत्राचेंच स्वरूप प्राप्त होणार आणि असल्या तज्ज्ञ लोकांच्या उपदेशाचा कवडीमात्र उपयोग होणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. जीवन हा एक प्रकारचा व्यवहार आहे आणि वैवाहिक जीवन याला अपवाद नाहीं. म्हणून इतर व्यवहाराप्रमाणें यांतहि आत्मत्वाची फाजील जाणीव, स्वार्थीपणा, वेळींअवेळीं आपले हक्क बजावण्याचा लहानपणा, मत्सर, इत्यादि दोष फाजील प्रमाणांत वाढले कीं तो व्यवहार हानिकारक व दुःखमय होतो. ज्या लोकांचें वैवाहिक जीवन एक प्रकारची दुःखांतिका झाली आहे असें आपण म्हणतों, त्यांच्या जीवनाचें पृथक्करण केलें तर या दुःखान्ताच्या बुडाशीं गैरसमज, हटवादीपणा, स्वार्थीपणा किंवा अधिकाराची फाजील हांव यांसारखे घातकी दोष आहेत असें आपणांस खात्रीनें दिसून येईल. यामुळें वैवाहिक जीवनांत 'विसरून जा आणि क्षमा करा' याच्याइतकें बहुमोल सूत्रमय तत्त्व नाहीं असें मला नेहमीं वाटत असतें.

तथापि लग्न, पति, पत्नी, इत्यादि विषयच असे भानगडीचे आहेत, कीं त्याकरितां सर्वांना पटतील व लागूं पडतील अशीं सामान्य तत्त्वें कोणाला काढतां येणार नाहींत. दिवसेंदिवस परिस्थिति पालटत चालली आहे. नवी नीति, नवें स्वातंत्र्य, इत्यादि नावीन्य वातावरणांत खेळूं लागलें आहे. तेव्हां कांहीं काळानें तरी पतिपत्नी किंवा स्त्रीपुरुष यांची परस्परांकडे पाहण्याची दृष्टि व परस्परांचे संबंध कोणत्यातरी प्रकारें बदलणार यांत शंका नाहीं. म्हणून या बाबतींत सर्वसामान्य तत्त्वें न काढणें हेंच बरें. फक्त जातांजातां मला एकदां कुठेंतरी वाचलेलें एक वाक्य आठवतें, तें माझ्या

मित्रांना आठवणीकरिता देऊन व तें माझ्या दृष्टीनें पूर्ण करून मी या भानगडीच्या विषयांतून अंग बाहेर काढणार आहें. तें वाक्य म्हणजे एका प्रसिद्ध आंग्ल राजकारणी पुरुषाच्या पत्नीनें त्याचें व आपलें नातें वर्णन करतांना काढलेले उद्गार. ती म्हणाली, "I mother my husband every minute of the day." मला वाटतें, कीं या वाक्याला पूरक म्हणून कोणीहि समंजस पुरुष "I daughter my wife every second of the day." असेच उद्गार काढील.

स्त्री
नोव्हेंबर १९३८

# वीणा प्रकाशन

---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | समरभूमि ... | प्रो. ना. सी. फडके | ... १॥ | रु. |
| २ | स्वैर विचार ... | श्री. ग. त्र्यं. माडखोलकर ... | १॥ | ,, |
| ३ | दोन मनें ... | ,, वि. स. खांडेकर | ... २ | ,, |
| ४ | कांता ... | ,, ग. त्र्यं. माडखोलकर | ... २ | ,, |
| ५ | आविष्कार ... | गीता साने | ... १॥ | ,, |
| ६ | हेमलता ... | ,, द्वा. वा. घाटे | ... १ | ,, |
| ७ | पांढरे ढग ... | ,, वि. स. खांडेकर | ... २ | ,, |
| ८ | निष्कलंक ... | कु. कमल दिक्षीत | ... १। | ,, |
| ९ | विशाल जीवन | श्री. पु. य. देशपांडे | | |
| १० | उष:प्रभा ... | ,, प्र. शां. मांजरेकर | | |
| ११ | चार भिंती ... | ,, वि. स. खांडेकर | | |

एक रुपया प्रवेश फी भरून कायम ग्राहक होणारास वीणा प्रकाशनचीं सर्व पुस्तकें पाऊणपट किमतींत मिळतील. प्रत्येक पुस्तक घेतलेंच पाहिजे असें बंधन नाहीं.

पत्ता— **वीणा प्रकाशन**
सीताबर्डी, नागपूर.